म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. २६७५

REFBK-0023788

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ९ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

21 MAR 1984
29 APR 1984
20 MAY 1984
27 MAY 1985

(कृ. मा. प.)
५०००-१२-८२


केन्द्रीय संग्रहालय
संग्रह शाखा (स्थल प्रति)

सदर्भ ग्रंथ (वाङ्मय समीक्षा)
2695
23688
9413183

नारायण सुर्वे
यांची
कविता

नारायण सुर्वे यांची कविता

दिगंबर पाध्ये

REFBK-0023788

लोकवाङ्मय गृह प्रा. लि., मुंबई ४०० ००४.

नारायण सुर्वे
यांची
कविता

म / ३०८

प्रथमावृत्ती : ऑगस्ट १९८२

© उमा पाध्ये

मूल्य वीस रुपये

प्रकाशक /
आर. जी. देसाई
लोकवाङ्मय गृह प्रा. लि.,
१९०-बी, खेतवाडी मेन रोड,
गिरगाव, मुंबई ४०० ००४.

मुद्रक /
आर. जी. देसाई
न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
८५, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

मुखपृष्ठ / रचना
प्रकाश विश्वासराव

नारायण सुर्वे
यांची
कविता

ति. अण्णा व सौ. आई यांस

दिगंबर पाध्ये

श्री. नारायण सुर्वे यांच्या कवितेसंबंधीचे हे लेखन करीत असताना प्रा. वसंत दावतर यांच्याशी वारंवार केलेल्या चर्चेचा मला फार उपयोग झाला. (याचा अर्थ त्या चर्चेतील सर्व निष्कर्षांचा मी स्वीकार केला आहे असा नाही.) माझे मित्र श्री. सतीश काळसेकर, श्री. अशोक राजवाडे, श्री. प्रकाश बुरटे यांनीही वारंवार चर्चा करून माझ्या विचारांना चालना दिली. अनेक मित्रांनी या लेखनाविषयी कुतूहल दाखवून प्रोत्साहन दिले. हे लेखन पुस्तकरूपाने येत असताना त्याला पूर्णता यावी म्हणून श्री. नीलकंठ कदम यांनी सुर्वे यांच्या कवितेवरील महत्त्वपूर्ण समीक्षा-लेखनाची सूची करून दिली. ज्यांच्या कवितेसंबंधी हे लेखन आहे त्या श्री. नारायण सुर्वे यांनी मोठ्या जिव्हाळ्याने सर्वतोपरी साहाय्य केले. माझ्या लेखना-संबंधी इतकी आत्मियता दाखविणाऱ्या या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. याचबरोबर या पुस्तकाच्या प्रकाशनाबाबत पुढाकार घेणारी 'लोकवाङ्मय गृह' ही संस्था, पुस्तकाच्या छपाईच्या कामात आत्मियतेने लक्ष देणारे 'न्यू एज प्रिंटींग प्रेस'चे श्री. बाळ देसाई व इतर कामगार वर्ग, तसेच मुखपृष्ठ तयार करणारे श्री. प्रकाश विश्वासराव यांचाही येथे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावासा वाटतो.

५ पद्मरेखा
जयप्रकाश नगर, रोड क्र. ३,
गोरेगाव (पूर्व),
मुंबई ४०० ०६३

— दिगंबर पाध्ये

पृष्ठ ८९ वरील परिच्छेद क्रमांक दोन ही 'पाच' या विभागाची सुरुवात आहे असे समजावे.

नारायण सुर्वे
यांची
कविता

एक

डिसेंबर १९६२ मध्ये 'ऐसा गा मी ब्रह्म' हा नारायण सुर्वे यांचा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झाला आणि त्यामागील वृत्तीने अनेकांचे लक्ष वेधून घेतले. 'मुक्त शैलीने आपल्या वृत्तींचा आविष्कार करणारे नवे काव्य आणि हळुवार सौंदर्यात्मक प्रतिक्रियांनी (Responses) नटलेले नवे काव्य ह्या दोन प्रभावी प्रवृत्तींचा आजचा काळ आहे. नव्याने काव्यनिर्मिती करू पाहणारे संवेदनाशील मन सामान्यतः या दोन गटांत कुठेतरी पडते. हे गट पूर्णपणे परस्परभिन्न आहेत. श्री. नारायण सुर्वे यांची कविता या दोन प्रवृत्तींच्या मधून आपला मार्ग काढीत आहे.'[१] ही 'ऐसा गा मी ब्रह्म'विषयी झालेली प्रतिक्रिया त्या दृष्टीने बोलकी आहे. आधुनिक समाजजीवनातील वेदनेची चित्रे शब्दबद्ध करीत असताना भावी जीवनाविषयी आशावाद जपणारी सुर्वे यांची वृत्ती तेव्हा वेगळी वाटली होती. 'श्री सुर्वे यांची बरीचशी कविता लढाऊ वृत्तीची, समाजक्रांतीची उपासना करणारी, नव्या आनंदवनभुवनाचे स्वप्न पाहणारी आहे'[२] किंवा 'ज्या समाजजीवनाचा हा कवी अपरिहार्य घटक आहे, त्या जीवनाचे असहाय चित्र तो रेखाटतो हे खरे, परंतु जीवन आज ना उद्या आपल्या मनासारखे होणार आहे, त्यासाठी आपल्या सर्वस्व-

---

१. 'आलोचना' ऑगस्ट १९६३, पृ. २६.
२. कुसुमाग्रज 'प्रस्तावना,' 'ऐसा गा मी ब्रह्म', पृ. ५.

त्यागाची गरज आहे, तो केला पाहिजे, या कल्पनेवर त्याचा विश्वास दिसतो '[१] या शब्दांत सुर्वे यांच्या कवितेचे वेगळेपण तेव्हा व्यक्त केले गेले होते. याबरोबरच ' श्री. सुर्वे हे कामगार जीवनाशी केवळ समरस झालेले नव्हे, तर ते जीवन प्रत्यक्षात अनुभवणारे कवी आहेत '[२] हेही आग्रहपूर्वक सांगितले गेले होते.

विशिष्ट जीवनानुभवामुळे सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवाचे स्वरूप वेगळे झाले आहे हेच तेथे सुचवायचे होते. स्वतः सुर्वे यांनीही ' कामगार आहे मी तळपती तलवार आहे ' ' जसा जगत आहे मी तसाच शब्दात आहे ' या शब्दांत हे वेगळेपण ' ऐसा गा मी ब्रह्म ' या संग्रहातील पहिल्याच कवितेत नोंदवून ठेवले आहे. पुढे सुर्वे यांच्या कवितेवर लिहीत असताना सुर्वे यांच्या या वेगळेपणाचा अनेकांनी वारंवार उल्लेख केला आहे. कवितेमागे असणारी वृत्ती व कवितेतून व्यक्त होणारे बाह्यविश्वाचे वेगळेपण ही सुर्वे यांच्या कवितेची वैशिष्ट्ये आज जवळ जवळ सर्वमान्य झाली आहेत.

कोणताही कवी खऱ्या अर्थाने महत्त्वाचा कवी असला म्हणजे त्याचे अनुभव अर्थपूर्ण असतातच. एवढेच नव्हे, तर सूक्ष्म अर्थाने त्याचे अनुभवविश्वही वेगळेच असते. परंतु सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवविश्व वेगळे आहे, असे म्हणताना एवढाच अर्थ अभिप्रेत नसतो हे उघड आहे. सुर्वे यांचे अनुभवविश्व वेगळे आहे असे म्हणत असताना, आजवर मराठी कवितेला अपरिचित असणारे अनुभव सुर्वे यांच्या कवितेतून व्यक्त होत आहेत असे म्हणायचे असते. म्हणूनच या अनुभवांचे वेगळेपण, त्याचे घटक व त्यामधून सुर्वे यांच्या कवितेला प्राप्त होणारे श्रेय एकदा नीट तपासून पाहणे त्यांच्या कवितेच्या अभ्यासाला उपकारक ठरणार आहे.

---

१. ' आलोचना ' ऑगस्ट १९६३, पृ. २७.

२. कुसुमाग्रज, प्रस्तावना, ' ऐसा गा मी ब्रह्म ', पृ. ४.

सुर्वे यांची कविता पाहिली तर त्यांच्या कवितेत येणारे भोवतालचे बाह्यविश्व आजवर मराठी कवितेचा विषय झालेल्या विश्वाहून भिन्न आहे हे सहज जाणवण्यासारखे आहे. हे जग कामगारांचे, कष्टकऱ्यांचे आहे. केवळ जगण्यासाठीच ज्यांना रोज संघर्ष करावा लागतो अशा माणसांचे जग हा सुर्वे यांच्या कवितेतील एक महत्त्वाचा घटक आहे. 'दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दुःखात गेले' असा आयुष्याचा हिशोब मांडून पुन्हा डोईवर किती उन्हाळे राहिले याचेच गणित ज्यांना मांडावे लागते अशा माणसांचे हे जग आहे. म्हणूनच हमाली करणारे, कारखान्यात मजुरी करणारे, पोस्टरं डकवणारे असे नाना प्रकारचे कष्टकरी सुर्वे यांच्या कवितेत पाहावयास मिळतात. या माणसांची खुराड्यासारखी घरं, त्यांचे बकाल भौतिक जीवन यांचे दर्शन सुर्वे यांच्या कवितेतून घडते. म्हणून सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवविश्वच वेगळे आहे तसे प्रथमदर्शनीच म्हणावेसे वाटते.

परंतु या जगाचे वास्तवदर्शन किंवा या जगाचे बाह्य वर्णन हे सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवाचे स्वरूप आहे का? असा प्रश्न विचारला तर थोडे थांबून विचारच करावा लागेल. कारण सुर्वे यांच्या कवितेतून बाह्य जगाचे एक वेगळे चित्र प्रकट होत असले तरी ज्याला वास्तव वर्णन करणारी म्हणावी अशी कविता सुर्वे यांनी लिहिलेली नाही. त्यांची कविता वास्तव वर्णनाच्या मर्यादेशी थांबत नाही. त्या कवितेत त्याहून अधिक काहीतरी आहे. म्हणूनच सुर्वे यांच्या कवितेतून घडणारे बाह्यविश्वाचे वेगळे दर्शन हा त्यांच्या कवितेतील केवळ एक घटक आहे असेच म्हणायला हवे.

ही कविता प्रथम वाचकांसमोर आली तेव्हा कवितेतील या बाह्यविश्वाने वाचकांचे लक्ष वेधून घेतले आणि सुर्वे यांच्या कवितेच्या संदर्भात त्यालाच महत्त्व प्राप्त झाले. परंतु कवितेत येणाऱ्या बाह्यविश्वाचा वेगळेपणा एवढेच सुर्वे यांच्या कवितेचे वैशिष्ट्य नाही. आणि सुर्वे

यांच्या कवितेने लक्षवेधक होण्याचे तेच एक कारणही नाही. कष्टकऱ्यांचे जीवन हलाखीचे असते, बाह्यतः ते बकाल दिसते ही सर्वांनाच ज्ञात असणारी बाब आहे. अब्रुदारांच्या शेजारीच बेअब्रू झालेल्यांची घरे असतात आणि सुखासीन आयुष्याच्या शेजारालाच दारिद्र्य नांदत असते. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर मराठी कवितेच्या वाचकाला कष्टकऱ्यांच्या जगाचे बाह्यरूप अपरिचित होते असे म्हणणे योग्य होणार नाही. मग या वाचकाला अपरिचित काय होते? त्याला अपरिचित होते ते सुर्वे यांच्या कवितेत या जगाचे जे आणि जसे दर्शन घडते ते. या जगाच्या रूपाला येणारे हे वेगळेपण म्हणजे कविदृष्टीचेच वैशिष्ट्य आहे. कवितेत व्यक्त होणारे वास्तव म्हणजे बाह्यविश्वाचे नुसते प्रतिबिंब कधीच नसते. बाह्यविश्व कवीमनाला जसे दिसते, जाणवते, तसे ते काव्यात व्यक्त होत असते. म्हणूनच कवितेतील वास्तव हे कविनिर्मित वास्तव असते. या कविनिर्मित वास्तवाच्या दृष्टीने बाह्यविश्व म्हणजे कवीच्या अनुभवाचे संदर्भविश्व असते. हे संदर्भविश्व आणि कविमन यांच्यातील ताणातूनच कविनिर्मित वास्तवाची निर्मिती होत असते. यातील कोणताही एक घटक बदलला तरी काव्यांतर्गत अनुभवाला वेगळी छटा प्राप्त होते. केवळ संदर्भविश्वाच्या नवेपणामुळे प्राप्त होणाऱ्या वेगळेपणाचा उल्लेख आपण अनेकदा विषयाचे नाविन्य असा करीत असतो. विषयाच्या नाविन्यामुळेही कवीला काही श्रेय प्राप्त होते हे खरेच आहे. परंतु एकाच विषयावर लेखन करूनही अनुभवाच्या वेगळेपणाचा प्रत्यय येऊ शकतो ही ललित साहित्याच्या वाचकांच्या अनुभवाची बाब आहे. असा प्रत्यय येतो तेव्हा ते कवीमनाचेच वेगळेपण असते. म्हणूनच कवितेतील अनुभवाचे स्वरूप पाहताना कवीच्या अनुभवाचे संदर्भविश्व व कवीमन या दोन्ही घटकांचा विचार अपरिहार्य ठरतो. हे संदर्भविश्व व कवीमन यांच्यातील संबंधातून निर्माण होणाऱ्या ताणांचे मूर्तरूप म्हणजे कविता असल्याने हे ताण परिचित आहेत की अपरिचित? सूक्ष्म, व्यामिश्र, गुंतागुंतीचे व म्हणून

वाचकाला अंतर्मुख करणारे आहेत की साधे असूनही तीव्र, उत्कट असल्याने वाचकाच्या मनाला स्पर्श करणारे आहेत? यांसारखे प्रश्न उपस्थित करून कवितेकडे पाहिल्यानेच कवीच्या कवितेतील अनुभवांचे स्वरूप नीट न्याहाळता येण्याची शक्यता असते व अनुभवाचे स्वरूप आकलन झाले म्हणजे त्या अनुषंगाने कवितेसंबंधी काही निष्कर्ष काढता येतात.

या पद्धतीने सुर्वे यांच्या कवितेकडे पाहायचे तर त्यासाठी 'ऐसा गा मी ब्रह्म' या संग्रहातील 'चार शब्द' या पहिल्याच कवितेचा उपयोग होण्यासारखा आहे. सुर्वे यांच्या समग्र कवितेच्या आकलनाला उपयुक्त ठरणारी अशी ही कविता आहे. ही कविता सारस्वतांना उद्देशून आहे. या कवितेतील 'कामगार आहे मी तळपती तलवार आहे' यासारख्या ओळीतून सुर्वे आपले वेगळेपण स्पष्टपणे सुचवीत आहेत. पुढे–

'थोडे साहिलेले, पाहिलेले, जोखिलेले आहे
माझ्या जगाची एक गंधवेणा त्यात आहे
केव्हा चुकलो, मुकलो, नवे शिकलोही आहे
जसा जगत आहे मी तसाच शब्दात आहे'

हे सांगत असताना योजलेला 'जग' हा शब्द निरीक्षण करण्यासारखा आहे. 'कामगार आहे मी तळपती तलवार आहे' या ओळीनंतर जेव्हा 'माझ्या जगाची गंधवेणा' असा शब्दप्रयोग येतो तेव्हा त्याचा अर्थ कामगारांच्या जगाची गंधवेणा असा आहे हे स्पष्टच आहे. पुढे जेव्हा 'जसा जगत आहे मी तसाच शब्दात आहे' असे सुर्वे म्हणतात तेव्हाही कामगारांच्या जगात जसा मी आहे तसाच शब्दात आहे असाच त्याचा अर्थ होतो. म्हणजेच हे शब्दप्रयोग सुर्वे यांच्या कवितेतील बाह्य जगाचे म्हणजेच आपल्या अनुभवाच्या संदर्भविश्वाचे वेगळेपण व्यक्त करतात. त्याच बरोबर या संदर्भविश्वाशी सुर्वे यांचे असणारे संबंध हे सहानुभावाचे, ममत्वाचे, आत्मियतेचे आहेत हेही या शब्दप्रयोगातून व्यक्त होते. परंतु ही कविता एवढेच सुचवीत नाही. ज्यांना उद्देशून ही कविता आहे तो घटकही इथे लक्षात घेण्याजोगा आहे.

'सारस्वतांनो ! थोडासा गुन्हा करणार आहे,' ही पहिल्याच कडव्यातील शेवटची ओळ आणि 'सारस्वतांनो ! थोडासा गुन्हा घडणार आहे' ही कवितेच्या अखेरची ओळ पाहिली तर हे सांगणे सरळ नाही हे सहज लक्षात येते. ते सूक्ष्म उपरोधिक आहे. हे 'सारस्वत' 'माझ्या जगाच्या' बाहेरचे आहेत. तेव्हा कामगारांचे असणारे 'माझे जग' आणि त्याच्या बाहेरील जगात असणारे 'सारस्वत' यांच्यातील एक ताण या कवितेत सहज सूचित होत आहे. हे बाहेरील जग म्हणजे प्रस्थापितांचे, सुसंस्कृत म्हटले जाणाऱ्यांचे जग आहे. तेव्हा कामगारांच्या जगातून बाहेर पाहणाऱ्या सुर्वे यांच्या कवितेतील एक ताण हा असा आहे हे या कवितेतून व्यक्त होत आहे.

परंतु एक ताण असा आहे याचा अर्थ सुर्वे यांच्या कवितेत एकच ताण आहे असा नव्हे. 'चार शब्द' या कवितेची पहिलीच ओळ 'रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे' अशी आहे. इथे हा सवाल रोजचाच म्हणजे रोज पडणारा आहे एवढाच अर्थ नाही, तर रोजीचा रोटीचा सवाल तो काय नेहमीचाच आहे अशीही एक अर्थच्छटा या शब्दांतून व्यक्त होत आहे. पुढे येणाऱ्या 'रोटी प्यारी खरी, आणखी काही हवे आहे' या ओळीमुळे तर ही अर्थच्छटा अधिकच स्पष्ट होत आहे. इथे 'आणखी काही' हे शब्द बराच व्यापक अर्थ सुचवितात. या कवितेतील 'रोजी' 'रोटी' या शब्दांनी केवळ जगण्याचे प्रश्न सूचित होतात असे म्हटले तर 'आणखी काही' या शब्दातून माणसासारखे जगण्याची आकांक्षा व्यक्त होते असे म्हणता येईल. माणसासारखे जगण्याच्या आकांक्षेत केवळ भौतिक नव्हे, तर आत्मिक समृद्धीचाही समावेश होतो. सुर्वे यांच्या मनाला कसली आकांक्षा आहे, ते ज्या जगातील आहेत त्या जगाच्या जगण्याचे कोणते स्वप्न सुर्वे व हे जग मनाशी जपत आहे त्याचा बोध या शब्दातून होत आहे. वस्तुतः ज्या जगात कवी उभा आहे, त्या जगात हे आणखी काही

तर बाजूलाच राहिले पण साधा रोजी रोटीचा सवालही सुटलेला नाही. परंतु अशा जगात जगताना कवीच्या मनात तर ही 'आणखी काही'ची आकांक्षा आहे. साहजिकच कवी मनातील हे स्वप्न व बाह्यविश्व यामधून निर्माण होणारा एक ताण इथे अस्पष्टपणे व्यक्त होत आहे.

कवी मनातील स्वप्न व बाह्यविश्व यांच्यामध्ये असा विरोधी ताण निर्माण झाला की सर्वसामान्यपणे दोन प्रतिक्रिया संभवतात आणि त्या कवीमनाच्या वृत्तिविशेषांवर अवलंबून असतात. कधी कवितेत निराशावादी तर कधी आशावादी सूर प्रकट होतात. एकाच बाह्यविश्वाला कवीमन असे वेगवेगळे प्रतिसाद देऊ शकते. बाह्य वास्तवच माणसाचे मन घडवीत असते असे म्हणून हे श्रेय वास्तवाला देता येईल. ते थोडेसे खरेही आहे, परंतु माणसाच्या वृत्तीनुरूप त्याला जगाचे दर्शन घडते हेही खोटे नाही. बाह्यविश्व आणि मानवी मन यांचे संबंध बरेच गुंतागुंतीचे असतात. मानवी मनाची घडण होण्याचे अंतिम कारण भोवतालचे बाह्यविश्व असते असे म्हणता आले तरी एखाद्या व्यक्तीच्या संदर्भात विचार करताना काही ढोबळ घटनांच्या आधारे त्यासंबंधी काही निष्कर्ष काढणे योग्य ठरत नाही. त्यासाठी बराच सूक्ष्म तपशील तपासणे आवश्यक ठरते. म्हणून आशावादी व निराशावादी असणे हे कवीच्या मनोवृत्तीचेच विशेष आहेत असे गृहित धरणेच इथे पुरेसे ठरणार आहे. 'चार शब्द' या कवितेत कवी शब्दांच्या हाती 'फुले' व 'खड्गे' ठेवण्याची भाषा करतो. 'सावध असा तुफानाची हीच सुरुवात आहे' असे ठणकावून सांगतो. एवढेच नव्हे तर माणसासारखे जगण्याच्या आकांक्षेच्या पूर्तीसाठी आपले जग 'राजमुद्रा घडवीत आहे' असेही स्पष्ट करतो. 'चार शब्द' या कवितेतील हा भाग लक्षात घेतला म्हणजे सुर्वे यांच्या मनोवृत्तीतील आशावाद, संघर्षशीलता, व सौंदर्यप्रेम याचीही साक्ष पटते.

याचा अर्थ असा की, 'ऐसा गा मी ब्रह्म' मधील पहिल्याच

कवितेतून सुर्वे यांच्या अनुभवाचा संदर्भविषय असणारे बाह्यविश्व, या जगाशी सुर्वे यांचे असणारे नाते, सुर्वे यांच्या कवीमनाचे वृत्तिविशेष आणि या सर्वांतून निर्माण होणारे संभाव्य ताण या सर्वांचेच दर्शन घडते.

सुर्वे यांच्या समग्र कवितेचे स्वरूप मूलतः यामध्येच सामावले आहे. 'अमुची दुनिया' 'माफ करा' 'झेप' 'इषारा' यांसारख्या कवितांमधून कष्टकऱ्यांचे जग आणि त्याबाहेरील सुखवस्तू जग यातील ताण सहजच जाणवतो. अशा कवितांमध्ये कष्टकऱ्यांच्या जगात असणारी संघर्षशीलता, वास्तवाला थेट भिडण्याची त्यांची वृत्ती, भविष्यकालीन विजयाचा त्यांना वाटणारा विश्वास व त्याउलट त्याबाहेरील जगातील निराशा, औदासिन्य हे भाव व्यक्त होतात. या परस्परविरोधी भावांमधून कष्टकऱ्यांच्या जीवनाचे झळझळीत रूप व्यक्त होते. कधी कवीमनाला पडणारी भविष्यकाळाची स्वप्ने हाच सुर्वे यांच्या कवितेचा आशय असतो. 'ऐसा गा मी ब्रह्म' या संग्रहातील 'ऐसे दिसे चित्र' ही कविता या स्वप्नाचे अगदी साधे रूप आहे. 'उद्याच्या युगाची। दिसे नवसृष्टी। आनंदाची वृष्टी। चोहीकडे' अशी सुरुवात करून उद्याचे जग कसे असेल याचे सरळ केलेले वर्णन या कवितेत पाहावयास मिळते. तर 'तेवढ्या दर्शनाने' 'माझे शब्द' यांसारख्या कवितांमधून अशा भविष्यकालाच्या स्वप्नांचे भास अनुभवाला येण्यासारखे आहेत.

परंतु या दोहोंहून सुर्वे यांच्या कवीमनाचे वृत्तिविशेष व भोवतालचे बाह्यविश्व यामधून निर्माण होणाऱ्या ताणांनीच सुर्वे यांची कविता व्यापली आहे. कष्टकऱ्यांच्या जगाशी सुर्वे एकरूप झाले आहेत एवढेच नव्हे, तर या जगाच्या आत्मिक समृद्धीचे स्वप्न पाहणाऱ्या या कवीला या जगातील मानवी भावांविषयीच विलक्षण आत्मियता आहे. 'माझे विद्यापीठ' या कवितेत 'माणसासारखा सृजनात्मा मला भेटलाच नाही' असे सुर्वे म्हणतात. या शब्दांतून व्यक्त होणारे माणसाविषयीचे कुतूहल, ममत्व हा सुर्वे यांच्या मनाचा वृत्ती-विशेष आहे. भोवतालच्या गर्दीतील

माणसांचे माणूसपण शोधण्याचा सुर्वे यांना ध्यास आहे. हे माणूसपण म्हणजे अर्थातच मानवी भाव. 'ऐसा गा मी ब्रह्म' मधील 'आई' ही कविता घेतली तर त्यातून एका बाजूने कामगारांच्या जगाचे दर्शन घडत असले तरी त्या कवितेतून मनावर तीव्र संस्कार होतो तो निवेदकाच्या मनात असणाऱ्या आईविषयक भावनेचाच. 'माझे विद्यापीठ' या कवितेतील याकूब, चंद्रा, आफ्रिकन चाचा, 'पोष्टर' मधील ती पोष्टरं डकविणारी मुले, 'पाणी घे' मधील वेश्या, 'शीगवाला' मधील दाउदचाचा यासारख्या व्यक्ती केवळ त्यांच्या लकबींमुळे नव्हे तर त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या मानवीभावांमुळे आपल्या स्मरणात राहतात. मुलाला मारल्यानंतर 'आपण असे कसे दगड झालो' याचा विचार करणारा, मुलांना कृष्णफुले म्हणून त्यांच्या भविष्याविषयी सचिंत होणारा बाप सुर्वे यांच्या कवितेत भेटतो (दगड, मुंबई) स्त्रीविषयक मृदु भावना, श्रृंगाराच्या गोड कल्पना मनात जपणारा प्रियकर त्यांच्या कवितेत भेटतो. (क्षण माघारी गेले, थांब) स्त्री-पुरुष प्रीतीची, सहजीवनाची, परस्पर-सामंजस्याची मधुर रूपे सुर्वे यांच्या काही कवितांतून पाहावयास मिळतात. (येतेस दमून, गलबलून जातो तेव्हा, सत्य इ.) सुर्वे यांच्या कवितेतून व्यक्त होणारे हे मानवी भावच वाचकाच्या मनावर संस्कार करीत असतात. सुर्वे यांच्या कवितेतील कष्टकऱ्यांचे जग हे मूर्त बाह्यविश्व म्हटले तर त्यांच्या कवितेत घडणारे हे मानवीभावांचे दर्शन म्हणजे या बाह्यविश्वाचे अमूर्त रूप होय. हे अमूर्त रूप जाणवणे ही कविमनाची किमया आहे. मूर्त बाह्यविश्व आणि कविमनाला जाणवणारे बाह्यविश्वाचे हे अमूर्त रूप यातूनच सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवविश्व साकारले आहे. सुर्वे यांच्या कवितेत त्यांच्या भोवतालच्या बाह्यविश्वाचे रेखीव तपशील पाहावयास मिळतात हे खरे आहे. (उदा. कष्टकऱ्यांच्या जगाचे वर्णन, विशिष्ट व्यक्तींच्या लकबी इ.) पण त्यामुळे कष्टकऱ्यांच्या विश्वाच्या अमूर्त रूपालाच रूप मिळत असते. कष्टकऱ्यांच्या जगातील मानवी

भावांना देह प्राप्त होत असतो. उलट सुर्वे यांना जाणवलेल्या या मानवीभावांमुळेच कष्टकऱ्यांच्या बाह्यविश्वाला चैतन्य प्राप्त होत असते. एक स्वप्न जपणारे कवीमन केवळ आपल्या स्वप्नांशी रुंजी न घालता बाह्यविश्वाशी कसे सहकंप होऊ शकते याचेच हे दर्शक आहे. (यामुळेच सुर्वे यांची बरीचशी कविता आत्मनिष्ठ असूनही ती बहिर्मुख वृत्तीची आहे असे म्हणता येते.) परंतु सुर्वे यांच्या कवितेचा संस्कार लक्षात घेतला तर बाह्यविश्वामागे असणारा मानवी भाव हाच सुर्वे यांच्या कवितेतील अनुभव असतो, असे म्हणायला हवे. अशा अनुभव संघटनेच्या प्रक्रियेतच सुर्वे यांच्या सामाजिक जाणीवेचे दर्शन वाचकाला घडत असते.

सुर्वे यांची कविता मराठी कवितेच्या क्षेत्रात आजही पृथगात्म वाटते ती केवळ या कवितेतील अनुभवाचे संदर्भविश्व भिन्न आहे किंवा सुर्वे व्यक्त करीत असलेले मानवी भाव मराठी वाचकाला आजवर अज्ञात होते म्हणून नाही. तर, रूढ अर्थाने बकाल वाटणाऱ्या जगातील मानवीभाव व्यक्त करणारी ती कविता आहे म्हणून. यामुळेच या जगाचे नवे दर्शन घडल्याचा वाचकाला प्रत्यय येतो. आणि हा नवेपणा हे कवीमनाच्या निर्मितीचे श्रेय आहे.

कष्टकऱ्यांच्या जगाचे झळझळीत रूप, भविष्यकाळातील स्वप्नांचे आभास व कष्टकऱ्यांच्या जगातील मानवी भावांचे दर्शन हे सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवाचे स्वरूप आहे.

सुर्वे यांच्या कवितेतून व्यक्त होणाऱ्या अनुभवाचे हे स्वरूप लक्षात घेतले म्हणजे त्यामधून सुर्वे यांच्या कवितेचे सामर्थ्य व मर्यादा या दोहोंचेही दर्शन घडते. सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवांचे संदर्भविश्व असणारे कष्टकऱ्यांचे जग आणि या जगातील अनुभवांशी सहकंप होण्याचे त्यांचे सामर्थ्य यामुळे मराठी कवितेला फारशी परिचित नसणारी अशी सामाजिक जाणीवेची वेगळी कविता सुर्वे लिहू शकले. सामाजिक

जाणिवेची कविता मराठीला अपरिचित नव्हती. आधुनिक मराठी कवितेचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या केशवसुतांच्या कवितेपासून ती मराठीला परिचित होती. परंतु केशवसुत, रविकिरण मंडळातील कवी, कुसुमाग्रज, अनिल, मुक्तिबोध इ. कवींनी लिहिलेली कविता ही अमूर्त व्यापक सामाजिक जाणीवेची कविता होती. केशवसुतांची 'तुतारी', अनिल यांची 'मानवता' किंवा कुसुमाग्रजांची 'अहि-नकुल' ही अशा कवितांची प्रसिद्ध उदाहरणे आहेत. विंदा करंदीकर यांची 'स्वेदगंगा' ही कविताही याच प्रकारची. परंतु अमूर्त व्यापक सामाजिक जाणीवेची कविता लिहिणारे हे कवी जेव्हा एखाद्या साक्षात् सामाजिक अनुभवाला शब्दरूप देऊ पाहतात तेव्हा काय होते ते पाहायचे असेल तर केशवसुतांच्याच 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' किंवा 'मजुरावर उपासमारीची पाळी' या कवितांकडे लक्ष द्यावे लागेल. 'तुतारी', 'गोफण', 'नवा शिपाई' यांसारख्या अमूर्त व्यापक सामाजिक जाणीव व्यक्त करणाऱ्या कवितांमध्ये केशवसुत जितके यशस्वी होतात तेवढे यश त्यांना वास्तव सामाजिक अनुभवांना शब्दरूप देताना प्राप्त होत नाही. कुसुमाग्रजही 'अहि-नकुल', 'आगगाडी आणि जमीन', 'पाचोळा' यांसारख्या कवितेत जे यश मिळवतात ते यश त्यांना 'लिलाव', 'बळी' यांसारख्या कवितेत मिळत नाही. याचा अर्थ असा की, सुर्वे यांच्या कवितेआधी मराठी कवितेच्या क्षेत्रात अमूर्त व्यापक सामाजिक जाणीवेची कविता लिहिण्याची जशी यशस्वी परंपरा होती, तशी विशिष्ट सामाजिक अनुभवांना शब्दबद्ध करण्याची परंपरा नव्हती. बाह्यविश्वातील विशिष्ट अनुभवांशी सहकंप होण्याच्या सुर्वे यांच्या वृत्तीमुळे सुर्वे यांना हे साध्य करता आले. कष्टकऱ्यांच्या जगातील अनेक अनुभव त्यांच्या कवितेतून मूर्त झाले. त्यामुळे सामाजिक जाणीवेची वेगळी कविता मराठीला प्राप्त झाली. आज या प्रकारच्या कवितेची एक परंपराच सिद्ध होऊ पाहत आहे. सुर्वे यांच्या कवितेचे हे श्रेय आहे.

परंतु बाह्यविश्वातील विशिष्ट अनुभवांशी सहकंप होण्याच्या या वृत्तीमुळेच अमूर्त व्यापक सामाजिक जाणिवेची कविता सुर्वे लिहू शकले नाहीत हेही तितकेच खरे आहे. तशी लिहिण्याचा त्यांनी जेव्हा प्रयत्न केला तेव्हाही प्रत्यक्ष अनुभवाचे संदर्भ ते विसरू शकले नाहीत. (उदा. 'जाहीरनामा', 'माझ्या देशाच्या नोंदवहीत माझा अभिप्राय') सहाजिकच विशिष्ट सामाजिक वास्तवातून निर्माण होणाऱ्या अमूर्त समस्यांना सुर्वे यांच्या कवितेत स्थान मिळाले नाही. परिणामी, सुर्वे यांची कविता साधी राहिली. साधेपणाने ती समृद्ध होत गेली, परंतु काही अपवाद मान्य करता ती कधीही व्यामिश्र (Complex) होऊ शकली नाही.

सुर्वे यांच्या कवितेच्या साधेपणाचे एक कारण बाह्यविश्वातील वास्तवाशी सहकंप होण्याच्या त्यांच्या वृत्तिविशेषात आहे तसेच ते बाह्यविश्व व सुर्वे यांचे कविमन यांच्या नात्यामध्येही सामावले आहे. बाह्यविश्व व कवीमन यांच्यातील ताणांतूनच कवितेतील वास्तव साकारत असते असे मागे म्हटले होते, हे ताण कवीमन व बाह्यविश्व यांच्यातील नात्यावरच अवलंबून असतात. आपल्या भोवतालच्या बाह्यविश्वाकडे कवी कुठून व कसा पाहत आहे यावरच ते अवलंबून असते. कवीच्या अनुभव घेण्याच्या पद्धतीचे स्वरूपही कवीच्या अनुभवाचे संदर्भविश्व व कवीमन यांतील संबंधांतूनच समजावून घेता येते. सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवाचे संदर्भविश्व कष्टकऱ्यांचे जग आहे. या जगाशी सुर्वे एकरूपच झालेले आहेत. या जगाविषयी त्यांना ममत्व, आत्मियता आहे. साहजिकच वेगवेगळ्या अंगांनी या जगाकडे पाहणे सुर्वे यांना शक्य झालेले दिसत नाही. परिणामी, सुर्वे यांचे कवीमन व त्यांच्या अनुभवाचे संदर्भविश्व यांतील ताण सतत एकाच प्रकारचे राहिले आहेत. तसेच कामगारांचे जग व त्याबाहेरील प्रस्थापितांचे जग यातील ताणही विविधतापूर्ण झालेले दिसत नाहीत. सुर्वे यांच्या कवितेत काहीवेळा

अनुभव (म्हणजे कवितेतील तपशील नव्हे) पुनरावृत्त होताना दिसतात याचे कारण हेच आहे. कामगारांचे जग व इतर बाह्यविश्व यांतील ताणातून सुर्वे यांची आव्हानात्मक, आक्रमक कविता निर्माण होते, हे ताण परिचित असले तरी तीव्र असल्याने ते वाचकाला अनेकदा कविता वाचल्याचा अनुभव देतात. परंतु काव्यांतर्गत अनुभव साधाच असतो. त्यामानाने कष्टकऱ्यांच्या जगातील मानवीभाव व्यक्त करणाऱ्या कवितांमधील ताण सूक्ष्म, उत्कट व वाचकाला अनपेक्षित असतात. या ताणांच्या जोमदारपणामुळे सुर्वे यांची कविता जोरदार व परिणामकारक ठरते. परंतु तिथेही हे ताण एकाच स्तरावरील व म्हणून साधे व सरळ असतात. म्हणूनच सुर्वे यांच्या कवितेचे स्वरूप साधे व सहज आकलनीय राहते. सहज आकलनीय असणे ही काही कवितेची मर्यादा नव्हे. परंतु कविता सहज आकलनीय असते; कारण कवितांतर्गत ताण साधे असतात व हे ताण साधे असतात याचा अर्थ कवितेतील अनुभव साधा असतो ही संगती लक्षात घेतली म्हणजे कवीमनाच्या विशिष्ट वृत्तीमुळे सुर्वे यांच्या कवितेला स्वाभाविकपणे काही मर्यादा आहेत हे जाणवल्यावाचून राहत नाही.

सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवांचे संदर्भविश्व हे कष्टकऱ्यांचे, उपेक्षितांचे, अन्यायाविरुद्ध बंड करणाऱ्यांचे जग आहे. जेव्हा एखादा कवी आपल्या कवितेतील अनुभवांचे संदर्भविश्व मर्यादित ठेवतो तेव्हा तीच त्या कवीची व कवितेची मर्यादा आहे असे म्हणता येईल. परंतु काव्याच्या संदर्भात असे निरीक्षण फारसे उपयुक्त ठरणारे नाही. कारण प्रत्येक कवीच्या अनुभवांच्या संदर्भविश्वाला अशी काही तरी मर्यादा असतेच. सर्वगामी व सर्वसाक्षी प्रतिभा ही साहित्याच्या क्षेत्रातील एक आदर्श कल्पना आहे. हे लक्षात घेतले तर सुर्वे यांना सर्वसाक्षी-सर्वगामी प्रतिभावंताचे श्रेय देता येत नाही असे म्हणण्यात काही स्वारस्य उरत नाही. तेव्हा सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवाला मर्यादा आहेत असे म्हणत असताना त्यांच्या कवितेतील अनुभवाचे संदर्भविश्व मर्यादित आहे असे म्हणायचे नसते तर

या संदर्भविश्वातून निर्माण होणारे सर्व संभाव्य ताण ते व्यक्त करू शकले नाहीत एवढेच सुचवायचे असते. याचाच अर्थ आपल्या संदर्भविश्वाला ते सर्वांगाने न्याहाळू शकले नाहीत. साधे उदाहरण द्यायचे तर असे म्हणता येईल की, कष्टकऱ्यांच्या जगात जसे मानवी भाव आहेत तशीच अमानुषताही आहे, संघर्षवृत्ती आहे तसाच दुबळेपणाही आहे, क्रांतिकारक वृत्ती असेल तर त्याबरोबरच क्रांतिविरोधी वृत्तीही आहे. या सर्वांमधून विविध ताण जाणवण्याची शक्यता आहे. या सर्वांशी सहकंप होणाऱ्या कविमनाला त्यांचाही अर्थ करून त्या जगाचे व्यामिश्र स्वरूप व्यक्त करता येणे असंभवनीय नाही. परंतु सुर्वे यांची कविता वाचीत असताना असा प्रत्यय येत नाही. म्हणजेच कष्टकऱ्यांच्या जगातील विशिष्ट वास्तव अनुभवांशी सुर्वे सहकंप पावू शकत असले तरी काही अनुभवांशी त्यांचे मन सहकंप होऊच शकत नाही. ही त्यांच्या कवीमनाची मर्यादा आहे. निसर्गसौंदर्याविषयी तीव्र संवेदनशीलता असूनही ज्या प्रमाणे बालकवींचे मन निसर्गाच्या विशिष्ट रूपाशीच प्राधान्याने सहकंप होऊ शकत होते त्याचप्रमाणे भोवतालच्या जगाविषयी उत्कट संवेदनशीलता असूनही सुर्वे यांचे मन काही विशिष्ट अनुभवांशीच सहकंप पावू शकते असे म्हणता येईल.

सुर्वे यांच्या कवितेत असे घडते याचे कारण त्यांचे विशिष्ट तत्त्वज्ञान आहे असे अनेकदा सुचविले गेले आहे. परंतु एखाद्या कवी-वरील विशिष्ट विचारसरणीचे सर्व परिणाम पाहिल्याशिवाय असे विधान करणे अर्थपूर्ण ठरणार नाही. त्याऐवजी सुर्वे यांच्या कवितेच्या आधारे असे म्हणता येईल की त्यांची जीवनविषयक जाणीव साधी आहे. साधी जाणीव हा वृत्तिविशेषच म्हणायला हवा. त्यामुळे भोवतालच्या जगातील गुंतागुंत त्यांना जाणवत नसावी. त्याच बरोबर मानवी जीवनातील अनुभवाचे अनेक स्तर त्यांच्या जाणीवेच्या कक्षेत येत नसावेत आणि याचा परिणाम म्हणून त्यांच्या कवितेला मर्यादा पडली असावी.

परंतु असे म्हटले तरी सुर्वे यांच्या कवितेचे श्रेय उणे ठरत नाही. स्वतःच्या अनुभवांचे वेगळे विश्व सुर्वे यांनी आपल्या कवितांच्या रूपाने साकारले आहे. हे विश्व साधे असले तरी आपल्या रसरशीतपणामुळे ते वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहे. कदाचित सुर्वे यांच्या ज्या मर्यादांचा वर उल्लेख केला त्यामुळेच मराठी कवितेत स्वतःचे स्थान निर्माण करणारी वेगळी कविता ते लिहू शकले असेही म्हणता येईल. म्हणूनच आज सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवांचे वेगळेपण आणि ते साकार करण्यात त्यांनी मिळविलेले यश हेच मराठी कवितेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

दोन

बाह्यविश्वातील अनुभवांशी सहकंप होण्याच्या सुर्वे यांच्या वृत्तीचा व त्यांची कविता सहज आकलनीय असल्याचा उल्लेख मागे आला आहे. ही कविता सहज आकलनीय का होते तर कवितांतर्गत अनुभव एकाच स्तरावरील असल्यामुळे सोपा असतो, कवितांतर्गत अनुभवातील ताण साधे असतात म्हणून, असे मागे म्हटले होते. यातूनच सुर्वे यांच्या कवितेच्या घाटाचे स्वरूपही सूचित होते. कारण अशा ताणांचे संघटन म्हणजेच कवितेचा घाट असतो. कवितेच्या या विशिष्ट घाटामुळेच वाचकाला कवितांतर्गत अनुभवाचा प्रत्यय येत असतो. कवीच्या अनुभवानुरूप कवितेचा घाट निश्चित होत असतो. उदा. मर्ढेकरांच्या कवितेचा घाट व्यामिश्र आहे असे म्हणत असताना त्यांच्या अनुभवातील अर्थसघनता व व्यामिश्रता यांचाच विचार करावा लागतो. त्या विशिष्ट घाटामुळेच त्यांची कविता विशिष्ट अनुभवाचा प्रत्यय देत असते. कोणत्याही चांगल्या कवितेत कवितेचा घाट व आशय हे असे एकरूपच असतात. म्हणुनच कोणत्याही कवितेचा आशय पाहताना विशिष्ट शब्दरचनेतून निमाण होणाऱ्या अर्थाच्या विविध छटा व त्या अर्थच्छटांतून होणाऱ्या एकात्म अर्थाचाच विचार करावा लागतो. (खरं म्हणजे त्या अर्थच्छटांच्या संघटनेतून एकात्म अर्थ वाचकाला जाणवतो तोच काव्यार्थ असतो.) कधी कधी काही महत्त्वपूर्ण सांगूनही एखादी रचना कविता

म्हणून वाचकापर्यंत पोहोचत नाही, अशावेळी त्या अनुभवाला रूप प्राप्त झाले नाही असे म्हणतात. तर कधी कधी कवितेची रचना सुंदर असूनही कवीजवळ सांगण्यासारखेच काही नाही असाही वाचकाला अनुभव येतो. अशा रचनेची कारागिरी म्हणून संभावना केली जाते. याचा अर्थ कवितेचा आशय व घाट यांच्या एकरुपतेमध्येच कवितेचे यश सामावलेले असते.

सुर्वे यांची कविता मनाला भिडते. सहज आकलनीय असूनही पुनःपुन्हा वाचाविशी वाटते. याचा अर्थच ती यशस्वी कविता आहे असा होतो. आणि म्हणूनच त्यांच्या कवितेतील अनुभव साधे सहज आकलनीय आहेत असे म्हटले की त्याचा अर्थ, त्यांच्या कवितेचा घाट साधा, सहज आकलनीय आहे असा होतो. परंतु सुर्वे यांच्या कवितेचा घाट साधा आहे म्हणजे कसा आहे? त्या साधेपणातही काही वेगळेपणा आहे का? त्यातून सुर्वे यांनी काही साध्य केले आहे काय? या प्रश्नांचा विचार स्वतंत्रपणे करणे शक्य आहे.

सुर्वे यांची कविता पाहिली तर असे लक्षात येते की, स्वतःला जाणवलेला जीवनाशय ते बहुधा निवेदन करीत असतात. ते निवेदन असल्यामुळे साहजिकच ते कोणाला तरी उद्देशून असते. कधी 'तू', कधी समाज, कधी ज्या समाजगटाविषयी त्यांना आत्मीयता आहे असा कष्टकऱ्यांचा वर्ग, कधी क्रांतिकारक तर कधी या कष्टकऱ्यांची पिळवणूक करणारा प्रस्थापितांचा वर्ग तर कधी देश. एकंदरीत कोणाला तरी उद्देशून आपला अनुभव निवेदन करणे ही सुर्वे यांची प्रधान प्रवृत्ती आहे. या निवेदनातून प्रकट होणाऱ्या जीवनविषयक प्रतिक्रिया व त्यातून निर्माण होणाऱ्या भावांची संघटना हे सुर्वे यांच्या कवितेचे स्वरुप आहे. तसेच बाह्यविश्वातील वास्तव अनुभवाशी सहकंप होण्याकडे त्यांच्या वृत्तीचा कल असल्याने अशा अनुभवांना मूर्तरूप देणे, गोष्टरूपाने अनुभव सांगणे हे मार्ग सुर्वे यांनी अनेकदा स्वीकारले आहेत. परिणामी,

त्यांची कविता ही वाचकाशी, श्रोत्याशी प्रत्यक्ष संवाद करणारी कविता झाली आहे. असा संवाद करणे हा या कवितेचा स्वभाव आहे. सुर्वे यांच्या कवितेचा हा स्वभाव म्हणजे त्यांच्या कवितेतील अनुभवाच्या प्रकटीकरणाची पद्धत झाली. त्यांच्या कवितेच्या घाटाचे स्वरूप पाहण्यासाठी ही पद्धत लक्षात घेणे आवश्यक असले तरी ही पद्धत म्हणजे घाट नव्हे. ते पाहायचे तर या पद्धतीद्वारे सुर्वे यांच्या अनुभवाला घाट कसा प्राप्त होतो ते प्रत्यक्षच पहायला हवे. हे पाहण्याची एक सोय म्हणून सुर्वे यांच्या कवितांचे काही गट कल्पिता येतील.

१ केवळ जीवनविषयक प्रतिक्रिया वा भावावस्था व्यक्त करणाऱ्या कविता.

२ लोकगीतांच्या धर्तीवरील कविता.

३ गोष्टरूप असणाऱ्या कविता.

४ समूहचित्रण असणाऱ्या कविता.

५ दीर्घ निवेदनपर कविता.

सुर्वे यांच्या कवितेत जीवनविषयक प्रतिक्रिया व त्याद्वारे विशिष्ट भावावस्था व्यक्त करणाऱ्या कविता सर्वांत अधिक आहेत. म्हणून हाच गट प्रथम विचारात घेऊ.

'ऐसा गा मी ब्रह्म' या संग्रहातील 'क्षितिज रुंद होत आहे' 'युगस्वामी' 'आज मला उसंत नाही' यांसारख्या कविता म्हणजे विशिष्ट भावावस्था व्यक्त करणाऱ्या कविता आहेत तर 'दोन दिवस' 'क्षण माघारी गेले' 'माफ करा' यासारखा कविता म्हणजे जीवनविषयक प्रतिक्रियांद्वारे विशिष्ट वृत्तीचा प्रत्यय देणाऱ्या कविता आहेत. अशा कवितांमध्ये अनुभव संघटित कसा होतो हे पाहिले तर सुर्वे यांच्या कवितेच्या घाटाचे एक स्वरूप लक्षात येण्यासारखे आहे.

'क्षितिज रुंद होत आहे' या कवितेची सुरुवात

आज माझ्या वेदनेला
अर्थ नवा येत आहे
आणि मेघांच्या डफावर
थाप बिजली देत आहे

या ओळींनी होते तेव्हाच 'वेदना' व 'नवा अर्थ,' 'मेघांचा डफ' आणि 'बिजलीची थाप' या शब्दांतून निर्माण होणाऱ्या भावांच्या विरोधी ताणातून विपरीत वास्तवातही उल्हसित होणारी, वेदनेतही नवा अर्थ पाहणारी कवीची मनोवस्था व्यक्त होते. या कवितेतील पुढील वीस ओळी पाहिल्या तर त्यामध्येही शुष्क फांद्यांवर येणारा बहर, भूमीच्या गर्भातून हुंकार देणारे बीज, काळोखाच्या तबकडीत गजर करणारा सूर्य अशा परस्पर विरोधी कल्पनांतून ताण व्यक्त होत राहतात. आणि कवीच्या मनोवस्थेचे गतिशील रूप प्रकट होत रहाते. अखेरीस

'आज माझ्या कोरड्या गा
शब्दात आग येत आहे
आणि नव्या सृजनाचे
क्षितिज रुंद होत आहे

अशा शब्दांनी कविता संपते. कवितेतील शेवटच्या दोन ओळी व त्यापूर्वीच्या दोन ओळी यातून विरोधी ताण व्यक्त होत असला, तरी त्या ओळींतून व्यक्त होणारे भाव कवितेतील पहिल्या दोन ओळींशी संवादी आहेत. एवढेच नव्हे, तर एकापरीने वेदनेचा नवा अर्थच त्यातून स्पष्टपणे व्यक्त होत आहे असे दिसते. म्हणूनच ही कविता योग्य ठिकाणी पूर्ण झाली असे म्हणता येते. परंतु परस्परविरोधी कल्पनांतून निर्माण होणारे भाव व त्यातील ताण यांची संघटना असेच या कवितेचे स्वरूप आहे. हे ताण एकाच प्रकारचे असल्याने ते परस्पर संवादी आहेत. म्हणून या कवितेचा घाट सोपा व सहज आकलनीय झाला आहे. मूळ अनुभव तसा असल्यानेच हे घडले आहे. मूळ

अनुभव जोमदार व रसरशीत असल्याने ही कविता प्रत्ययकारी होते असे म्हटले, तरी कवितेचा घाट सोपा, सहज आकलनीय आहे हे मान्य करावेच लागेल.

मराठी कवितेत धृपद व कडवे अशी रचना असणाऱ्या काही कवितांमध्ये धृपदातील मूळ अनुभवाच्या स्पष्टीकरणाचे वा त्याला विविधांगाने फुलविण्याचे कार्य कडव्यांद्वारे होत असते. ज्या ठिकाणी मूळ अनुभवाचे असे स्पष्टीकरण कडवी करीत असतात, तेथे कवितेचा घाट सोपा होतो. सुर्वे यांची 'क्षितिज रुंद होत आहे' ही कविता घाटदृष्ट्या त्या कुळातली कविता आहे असे म्हणावेसे वाटते. 'ऐसा गा मी ब्रह्म' या संग्रहात अशा कविता पाहावयास मिळतात. परंतु पुढील काळात सुर्वे यांनी या प्रकारची कविता लिहिलेली दिसत नाही.

आता 'ऐसा गा मी ब्रह्म' याच संग्रहातील 'दोन दिवस' ही प्रसिद्ध कविता पाहा :

'दोन दिवस वाट पाहाण्यात गेले, दोन दुःखात गेले
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे'

या ओळींनी ही कविता सुरू होते. इथे आधीच्या कवितेसारखे परस्पर विरोधी कल्पनांतील ताण नाहीत. तर 'दोन दिवस वाट पाहाण्यात गेले' या शब्दांतून जी जाणीव वा भाव व्यक्त होतो, तोच पुढे येणाऱ्या 'दोन दुःखात गेले' व 'हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे' या शब्दांमुळे अधिक तीव्र होत आहे हे लक्षात येते. या पुढील चार ओळींत येणाऱ्या शेकडो वेळा येणारे चंद्र, तारे व भाकरीचा चंद्र शोधण्यात बरबाद झालेली जिंदगी, सर्वस्व असणारे पण दारिद्र्याकडेच गहाण राहिलेले हात यांसारख्या विरोधी कल्पनांतून निर्माण होणारे भाव पहिल्या दोन ओळींशी संवादी आहेत. अशा रीतीने कवितेच्या या पहिल्या सहा ओळीतून कष्टकऱ्यांच्या जगातील वेदनेचा

अनुभव संघटित होत आहे. पुढे–

हरघडी अश्रू वाळविले नाहीत, पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन सहाय्यास धावून आले
दुनियेचा विचार हरघडी केला; अगा जगमय झालो
दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो
झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहाण्यात गेले, दोन दुःखात गेले.

अशा ओळी येऊन कविता संपते. पहिल्या सहा ओळींतून संवादी भावांनी जो वेदनेचा अनुभव संघटित होतो, त्या वेदनेला पेलणारे असे भाव या पुढील सहा ओळींतून निर्माण होतात व वेदनेला अधोरेखित करून ही कविता पूर्ण होते.

या कवितेतील दोन ओळींचे कडवे ही एक प्रतिक्रिया आहे असे म्हटले, तर पहिल्या तीन प्रतिक्रियांतील भाव वेदनेचा आहे. पुढील तीन प्रतिक्रियांमधील भाव त्या वेदनेला पेलून धरतात व त्यामधून वेदना असूनही आर्त न होणारा व वेदना पेलण्याचे सामर्थ्य असूनही आक्रमक न वाटणारा असा एक संयमित व समतोल अनुभव या कवितेतून व्यक्त होतो. तो खोल व गंभीर वाटतो. परंतु या अनुभवातील ताण व त्यांची संघटना साधीच आहे हे सहज लक्षात येते.

'क्षितिज रुंद होत आहे' व 'दोन दिवस' या कवितांबरोबरच 'ऐसा गा मी ब्रह्म' याच संग्रहातील 'क्षण माघारी गेले' या कवितेचा विचार केला तर सुर्वे यांच्या या प्रकारच्या कवितेच्या घाटाचे स्वरूप लक्षात येण्यासारखे आहे.

'क्षण माघारी गेले' या सोळा ओळींच्या कवितेतील पहिल्या चौदा ओळींतून प्रणयाचे एक सुंदर स्वप्न व्यक्त होत आहे.

मलाही वाटते तिला हात धरून न्यावे
निळ्या सागराच्या कुशीत बिलगुन बसावे

अशा शब्दांनी या कवितेची सुरुवात होते. इथे 'मलाही' या

पहिल्या शब्दामुळेच पुढील सुंदर स्वप्नात एक सूक्ष्म ताण निर्माण होतो. तथापि, पुढील चौदा ओळींतील कल्पना परस्परांशी संवादि राहून एक सुंदर स्वप्न निर्माण करीत आहेत. परंतु या चौदा ओळींनंतर येणाऱ्या

असे कैकदा वाटूनहि क्षण माघारी गेले
वाटेतच निरोप घेऊन लोकल धरावी

या कवितेच्या शेवटच्या दोन ओळींनी आधीच्या स्वप्नाविरोधी ताण निमार्ण होतो व कविता पूर्ण होते. परिचित भाषेत म्हणायचे तर या ओळींमुळे कवितेला एक कलाटणी मिळते. त्यामुळे कवितेतील प्रेमानुभवाला एका वेदनेचे परिमाण प्राप्त होते. संवादी भाव संघटित होत असताना, त्याला एकदम विरोधी छेद मिळाल्याने कवितांतर्गत अनुभवाला अशी कलाटणी मिळाल्याचा अनुभव सुर्वे यांच्या काही कवितांमध्ये येतो. (' दोन दिवस ' या कवितेचे प्रत्येक कडवे दोन ओळींचे आहे. तर ' क्षण माघारी गेले ' ही कविता सुर्वे यांनी चार ओळींच्या कडव्यात लिहिली आहे. वस्तुतः ही कविता दोन ओळींचे एक कडवे असे समजून वाचली तरी काही फरक पडत नाही.)

विशिष्ट भावावस्था वा जीवनविषयक प्रतिक्रियांच्याद्वारे विशिष्ट वृत्ती यांचा अनुभव देणाऱ्या दिवसांच्या घाटाचे केलेले हे विश्लेषण पाहिल्यावर या कवितांचा घाट साधा आहे, तो सहज आकलनीय आहे, म्हणजे काय ते स्पष्ट होण्यासारखे आहे.

' क्षितिज रुंद होत आहे ' यासारखी कविता सुर्वे यांनी ' ऐसा गा मी ब्रह्म ' या संग्रहानंतर लिहिली नसली तरी ' दोन दिवस, ' ' क्षण माघारी गेले ' यांसारख्या कविता ' माझे विद्यापीठ ' व ' जाहिरनामा ' या संग्रहातही पाहावयास मिळतात. 'कठीण होत आहे' ' विझता विझता स्वतःला ' ' बेअब्रु खूपच झाली ' यांसारख्या ' माझे विद्यापीठ ' मधील कविता किंवा ' काय करावे ' ' पुढच्या युगाची

सर्व दुःखे ' ' एका नव्या संघर्षात ' यांसारख्या ' जाहीरनामा 'मधील कविता त्यासाठी उदाहरण म्हणून सांगता येतील. यातील ' कठीण होत आहे ' व ' एका नव्या संघर्षात ' या कवितांमधील ' कठीण होत आहे ' व ' तर काय करावे ' या शब्दांच्या उच्चारांच्या मोडणीतून वेगवेगळ्या सूक्ष्म भावच्छटा व्यक्त होत असल्याने, अशा कवितांतील अनुभवाचा घाट अधिक समृद्ध आहे असे म्हणता येईल. तथापि, याप्रकारच्या सर्व कवितांचा घाट सारखाच आहे.

या कवितांमधील कडवे दोन ओळींचे आहे, म्हणून रचनादृष्ट्या या कवितांना गझलसदृश कविता असेही म्हणता येईल. सुर्वे यांच्या या गझलसदृश कविता क्रमाक्रमाने अधिक सफाईदार झाल्या असे दिसते. तथापि. त्यातील अनुभवाचा घाट ' ऐसा गा मी ब्रह्म ' मधील कवितांसारखाच राहिला आहे. रचनादृष्ट्याच पाहायचे तर या कवितांमधील दोन ओळींचे प्रत्येक कडवे म्हणजे एकाप्रकारे स्वयंपूर्णच आहे. ती एकेक प्रतिक्रिया आहे व कधी सहा, कधी सात तर कधी आठ कडव्यांतून सुर्वे यांची कविता संघटित होत आहे असे दिसते. ही रचना गझलसदृश आहे; परंतु तिला गझल म्हणता येणार नाही. कारण गझलच्या रचनेत असणारी सफाई, सूचकता, भावनात्मक ताणांची सूक्ष्मता व एकंदरीत असणारी तंत्रशुद्धता यांचा या रचनेत अभाव आहे. किंबहुना ते साध्य करणे हे सुर्वे यांचे उद्दिष्टच नसावे अस वाटते. सुर्वे यांच्या या अशा कवितांमधील अनुभवांकडे पाहता असे म्हणता येईल की, आपल्या प्रतिक्रिया मालारूप करून सांगण्यासाठी सुर्वे यांना ही रचना सोयीची ठरली आहे. या विशिष्ट रचनेतून एक प्रकारच्या ठाम जोरकसपणाचा अनुभव येतो. एक प्रकारची बेदरकार, कणखर वृत्ती जाणवते व त्यामुळे वेदना व कारुण्य असूनही हळवेपणा टाळण्यासाठी ही रचना उपयुक्त झाली आहे. आपल्या अनुभवांना, वृत्तीला अनरूप म्हणूनच सुर्वे यांनी ही रचना स्वीकारली आहे.

' ऐसा गा मी ब्रह्म ' या संग्रहात सुर्वे यांनी जी गीते लिहिली आहेत, तिथेही त्यांच्या अनुभवाचा घाट कमीअधिक प्रमाणात त्यांच्या गझलसदृश रचनेप्रमाणे साधाच राहिला आहे आणि ते स्वाभाविक आहे. ' डोंगरी शेत ' हे सुर्वे यांचे गाजलेले गीत पाहिले तरी त्याची साक्ष पटण्यासारखी आहे. गीत हे म्हणण्यासाठी असल्यामुळे त्यादृष्टीने येणारी खटकेबाज शब्दरचना, ग्रामीण ढंग व कल्पना यामुळे या रचना आकर्षक होतात. परंतु या गीतातील अनुभवाचा घाट साधाच आहे. अशा स्वरुपाची कविता सुर्वे यांच्या पहिल्या संग्रहातच पाहवयास मिळते. लोककलांशी सुर्वे यांच्या असणाऱ्या संबंधातून व संस्कारातून या गीतांची निर्मिती झाली आहे. परंतु या शाहिरी रचनेसाठी शब्दांचे खेळ करावे लागतात. सुर्वे यांना त्यात स्वारस्य वाटत नसावे. म्हणूनच रंजन वा प्रचार किंवा मनोरंजनातून प्रचार यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या या गीत-रचनेकडे सुर्वे पुन्हा वळलेले दिसत नाहीत.

गझलसदृश रचना व गीते यांमधून सुर्वे यांच्या कवितेच्या घाटाचे जे स्वरूप दिसते तेच त्यांच्या सर्व कवितेच्या घाटाचे स्वरूप आहे असे मात्र नाही. त्यांची कविता वाचीत असताना ' ऐसा गा मी ब्रह्म ' ते ' जाहीरनामा ' या प्रवासात सुर्वे यांचे कवितांतर्गत अनुभव समृद्ध होत चालल्याच्या खुणा दिसतात. अर्थात त्यातून ते व्यामिश्र होत नाहीत. ते साधेच राहतात; पण अधिक समृद्ध वाटतात. साहजिकच त्यांच्या कवितेचा घाटही अधिक समृद्ध होतो. सुर्वे यांच्या अशा अनुभवांचे घाट पाहायचे तर त्यांच्या गोष्ट रूपाने व्यक्त होणाऱ्या, समूह चित्रण करणाऱ्या व दीर्घ निवेदनपर कविता पाहायला हव्यात.

वाचकांशी वा श्रोत्यांशी संवाद करणे हा सुर्वे यांच्या कवितेचा स्वभाव असल्याचे मागे म्हटले आहे. त्यातूनच गोष्टरूपाने अनुभव कथन करण्याची पद्धत सुर्वे यांनी स्वीकारली असावी. ' ऐसा गा मी ब्रह्म 'मधील ' माझी आई ' ही अशा प्रकारची पहिली कविता. ही

कविता म्हणजे भूतकाळातील अनुभवाचे कथन आहे. सुरुवातीपासून शेवटपर्यंत कष्टकरी जीवनातील वेदना, आईचे वात्सल्य व आईच्या मृत्यूतील कारुण्य हे परस्पर संवादी भाव संघटित करून शेवटी

आधीचे नव्हतेच काही
आता आई देखील नाही
अश्रूंना घालीत अडसर
जागत होतो रात्रभर
झालो पुरते कलंदर

या शब्दांतून तीव्र भावनात्मक ताण निर्माण करून ही कविता पूर्ण झाली आहे. भावनेच्या पातळीवर राहणारा उत्कट अनुभव हे या कवितेचे स्वरूप असल्याने, ती कविता घाटदृष्ट्या साधी राहिली आहे. परंतु पुढे सुर्वे यांनी गोष्टरूपाने व्यक्त केलेले अनुभव पाहिले तर ते 'माझी आई' सारखे साधे नाहीत हे लक्षात येते. 'नेहरू गेले त्यावेळची गोष्ट' ही 'माझे विद्यापीठ' या संग्रहातील प्रसिद्ध कविता हे त्याचे एक उत्तम उदाहरण आहे. 'माझी आई' या कवितेत जशा घटना आहेत तशाच याही कवितेत आहेत; परंतु कवितेतील सूचक शब्दरचनेतून निर्माण होणारे ताण येथे अधिक सूक्ष्म असल्याचे जाणवते.

पाठी शेकवीत बसलेली घरे कलकलली
शहर कसे करडे होत गेले
नंतर अंजीरी
पुढे....काळोखाने माणिक गिळले

या सुरुवातीच्या ओळींतून खिन्न, उदासीनतेचे सूक्ष्म भाव व्यक्त होतात. तर पुढे येणाऱ्या या ओळींतून निर्माण होणारे भाव सुरुवातीच्या

दगडी गाऊन घातलेले कारखाने
चिरूट शिलगावीत
विचारांत बुडाले

नंतर....ओलेच खमीस खांद्यावर टाकून
खुराड्याकडे वळले

ओळीतील भावांशी संवादी राहून, ती उदासीनता अधिक गडद करतात. इथे शब्दरचनेतून निर्माण होणारे भाव संवादी आहेत. परंतु हा संवाद पूर्वी पाहिला तसा साधा नाही. या संवादामुळे निसर्ग, जडजग व माणसे या सर्वांनाच ग्रासून टाकणारे असे उदासीनतेचे एक समृद्ध चित्र शब्दांनी निर्माण केलेल्या भावातून व्यक्त होत आहे. या उदासीनतेच्या पार्श्वभूमीवर–

'क्या हुवा ए सुद्रे....!
'आज लोबन मत जला!....नेहरू गये!!'
'सच, तो चलो आज छुट्टी!....'

हा संवाद येतो. या संवादाचा स्वर सहाजिकच उंच आहे.

आधीची निःशब्द उदासीनता व उंच स्वरातील हा संवाद यातील विरोधातून इथे एक ताण निर्माण होतो तर 'सच चलो आज छुट्टी!...' या शब्दांतून जो भाव व्यक्त होतो त्यामुळेही आधीची उदासीनता व हा भाव यांच्या विरोधातूनही इथे एक ताण निर्माण होत आहे. म्हणजे इथे पहिल्या दहा ओळींतील संवादी भाव जसे साधे नाहीत, तसेच पहिल्या दहा ओळी व पुढील तीन ओळी यातील विरोधी भावातून निर्माण होणारे ताणही साधे नाहीत. यानंतर येणारी -

'शीण पेलणारे जग खाटेवर कलले'

ही ओळ या दुसऱ्या जगालाही पहिल्या दहा ओळींतून व्यक्त होणाऱ्या जगाशी संवादी करते. परंतु हा संवाद असला तरी उदासीनतेतून निर्माण झालेली निःशब्दता व विश्रांतीतून निर्माण होणारी निःशब्दता अशा विरोधातून निर्माण होणारा सूक्ष्म ताण इथेही आहेच. यानंतर कागदी खोळीत उजेड घेऊन जाणारा हातगाडीवाला येतो आणि त्याचा व कवितेतील 'मी'चा संवाद होतो.

'हा प्रकाश आता कशाला घेऊन चालला आहेस ?'
' वा राव;
पुढे काळोख दात विचकीत असेल'

या संवादातही विरोधी भावातून निर्माण होणारे ताण आहेत. पण एवढेच नाही तर कवितेतील सुरुवातीच्या शब्दांमधून निर्माण होणारे उदासीनतेचे भाव व हातगाडीवाल्याच्या कागदी खोळीतील प्रकाशाच्या रूपाने व्यक्त होणारी जिद्द व आशा या भावातही विरोधी ताण व्यक्त होत आहे. शेवटी...

'नेहरू गेले त्यावेळची गोष्ट'

असे म्हणून ही कविता पूर्ण होते. अखेरीस येणाऱ्या या ओळीमुळे आधीच्या सर्व अनुभवाला एक संदर्भ प्राप्त होतो व त्यामुळेच या कवितेत खरा अर्थ भरला जातो. अशा रीतीने ' नेहरू गेले त्यावेळची गोष्ट ' या कवितेतील ताणांची सूक्ष्मता व त्यांची गुंफण पाहिली म्हणजे या कवितेचा घाट कसा समृद्ध आहे ते लक्षात येते.

' माझे विद्यापीठ ' याच संग्रहातील ' बरं का रे पोरा ' ही कविताही अशीच पहाण्यासारखी आहे. या कवितेत एक कष्टकरी बाप भूतकाळातील आपल्या पराक्रमाची गोष्ट घरातील, चाळीतील तरुणांना सांगत आहे. या प्रसंगाचे वर्णन करताना पार्श्वभूमी म्हणून सुरुवातीलाच

' चाळीसमोरच्या खाचरातील पाणी नहात होते प्रकाशपुरात '

अशी ओळ आली आहे. येथे ' खाचरातील पाणी ' व ' प्रकाशपूर ' या शब्दातील सूचक भावांमध्ये असणाऱ्या विरोधातून एक ताण निर्माण होत आहे. पुढे कथेतील कष्टकरी बाप व त्याने सांगितलेली शौर्यकथा यामधून निर्माण होणारा सूचक ताण पहिल्या ताणाशी संवादीच आहे. (खरं म्हणजे ' खाचरातील पाणी ' व ' प्रकाशपूर ' यांना या कवितेत प्रतीकांचे रूप येणे सुसंगत होते. सुर्वे यांना तसे अभिप्रेतही असावे, परंतु प्रत्यक्षात केवळ वातावरणाच्या पातळीवरच हे घटक राहतात.

सुर्वे यांच्या कवितेचा घाट साधा होतो तो असा.) कष्टकरी बापाने सांगितलेल्या शौर्यकथेत पुन्हा आणखी ताण आहेतच. बाहेरच्या जगात शौर्य गाजविणारा, 'माणसांचा समुद्र घेऊन येणारा' हा आत्म्याचा बापुस चाळीकडून वळतो तेव्हा आपल्या पत्नीला दारात उभी पाहून मनात उगीच मोहरतो. अखेरीस कैदी होऊन चाळीवरून जातो तेव्हा आईच्या कडेवर पदर पांघरून असलेल्या मुलाकडे पाहून हात हलवतो. या प्रसंगाच्या निवेदनातून संवादीविरोधी भाव निर्माण होतात. या कवितेत बोलल्यासारखी व बोली अशा दोन्ही प्रकारची भाषा येते, त्यातून हे भाव उत्कटपणे व्यक्त होतात. एक कष्टकरी म्हणून शौर्य गाजवीत असताना, अन्यायाशी झुंजत असताना कणखर असणाऱ्या व्यक्तीचे पती व पिता म्हणून जाणवणारे मृदू रूप यातील विरोध या कवितेतील निवेदनातून जाणवत राहतो. कवितेतील शब्दातून कणखरपणा, प्रेम व वात्सल्य यांतील विरोधी ताण जाणवत रहातात, व त्यामुळे या शौर्यकथेला मृदू भावनात्मकतेची जोड मिळते. एकाच व्यक्तीचे अन्यायाविरुद्ध झुंजणारा सैनिक, पती व पिता असे तिहेरी पण एकात्म दर्शन या कवितेत घडते. एका भाबड्या व झुंजार अशा समृद्ध व्यक्तिमत्वाचा अनुभव ही कविता देऊन जाते. कवितेतील 'बरं का रे पोरा' या शब्दांची होणारी पुनरावृत्तीही इथे पाहण्यासारखी आहे. 'बरं का रे पोरा' या कवितेत कष्टकऱ्यांच्या संघर्षाचा एकेरी अनुभव सांगण्याऐवजी कष्टकऱ्याला एकाच प्रसंगात वेगवेगळ्या भूमिकांतून येणारा अनुभव या कवितेत संघटित झाला आहे. म्हणून या कवितेचा घाट अधिक समृद्ध आहे असे म्हणता येते.

'जाहीरनामा' या संग्रहातील 'कार्ल मार्क्स' ही कविताही अशीच गोष्टरूपाने व्यक्त होत आहे.

माझ्या पहिल्या संपातच
मार्क्स मला असा भेटला

अशा निवेदनाने या कवितेची सुरुवात होते. नंतर -

जानकी अक्का म्हणाली, 'वळिखलंस ह्याला -
ह्यो आमचा मार्कसबाबा
जर्मनीत जलमला, पोताभर ग्रंथ लिवले
आणि इंग्लंडच्या मातीला मिळाला
संन्याशाला काय बाबा
सगळीकडची भूमी सारखीच
तुझ्यासारखी त्यालाही चार कच्चीबच्ची होती.'

असे जानकीअक्काचे निवेदन येते. मार्क्सच्या जीवनाविषयीची ही साधी माहिती आहे. परंतु या निवेदनातील शब्दांतून व्यक्त होणाऱ्या भावांमुळे सामान्य कामगार स्त्रीला मार्क्सचे एक माणूस म्हणून जाणवणारं रूप व मार्क्सविषयीच्या तिच्या असणाऱ्या जिव्हाळ्याच्या भावना त्यातून सहजपणे व्यक्त होतात. यानंतर एकदा कवितेतील 'मी' सभेत बोलत असताना मार्क्स भेटल्याचा प्रसंग येतो व

तर या मंदीचे कारण काय ?
दारिद्र्याचे गोत्र काय ?
पुन्हा मार्क्स पुढे आला, मी सांगतो म्हणाला,
आणि धडाधडा बोलत गेला

अशा ओळी येतात. या शब्दातून मार्क्स या व्यक्तीचे विचारवंत म्हणून असणारे व्यक्तिमत्व प्रकट करणारे भाव व्यक्त होतात. यामध्ये 'मी'ला वाटणाऱ्या कौतुकमुक्त आदराचे भावही आहेतच. पण याचबरोबर मार्क्स आणि कामगारांचे जग यामधील नाते व्यक्त करणारे जिव्हाळ्याचे भावही या ओळीतून जाणवत राहतात. पहिल्या प्रसंगातील भावांशी संवादी असे हे भाव आहेत. परंतु त्याचबरोबर त्यामध्ये एक सूक्ष्म विरोधी छटाही आहे. पहिल्या प्रसंगातील भावांतून व्यक्त होणारी मार्क्सची संसारी वृत्ती व दुसऱ्या प्रसंगातून जाणवणारी बौद्धिकता हा तो विरोध आहे. शेवटी 'मी' एका सभेत बोलत असताना मार्क्स पुन्हा भेटतो.

'आता इतिहासाचे नायक आपणच आहोत,
या पुढच्या सर्वच चरित्रांचेही'

या 'मी' च्या वाक्यावर तो 'मोठ्याने टाळी वाजवतो आणि 'खळ-खळून हसत. पुढे म्हणतो–

'अरे कविता-विविता लिहितोस की काय?
छान, छान
मलासुद्धा गटे आवडायचा.'

तिसऱ्या प्रसंगातील 'मी'चे शब्द फार वरच्या सुरातील व घोषणेच्या स्वरूपाचे आहेत. कवितेतील मार्क्स त्याला टाळी वाजवतो. (इथे कौतुक व सहमत असल्याचे, मैत्रीचे भाव आहेत.) परंतु त्या ताणलेल्या अवस्थेत तसाच न राहता 'खळखळून हसतो', कवितेसंबंधी बोलतो. या सर्वांतून विरोधी भावांची निर्मिती होते व मार्क्सच्या व्यक्तिमत्वाचे एक प्रसन्न व मृदूरूप साकार होते.

कवितेतील हे तीन प्रसंग, त्यातून निर्माण होणारे भाव पाहिले म्हणजे संसारी असूनही विरक्त असणारे, धारदार बुद्धिमत्ता असूनही सामान्य कष्टकऱ्यांशी सहानुभावाचे नाते ठेवणारे व कलाविषयक आस्था बाळगणारे मृदू आणि प्रसन्न असे मार्क्सच्या तिहेरी रूपाचे एकात्म दर्शन ही कविता घडवून जाते असे म्हणता येईल.

जानकीअक्कासारख्या सामान्य कष्टकरी स्त्रीच्या पातळीवरून व 'मी'च्या थोड्या जाणकार भूमिकेवरून येणारा मार्क्सच्या व्यक्ति-मत्वाचा अनुभव या कवितेत संघटित होत आहे. त्याचबरोबर मार्क्स आणि कष्टकरी यांच्यातील नातेही त्यातून व्यक्त होत आहे. खांद्यावर असलेल्या बॅनरमधून जणू काही मार्क्स जिवंत होऊन यावा असा अनुभव ही कविता देते. मार्क्ससारख्या विचारवंताचे एक विलोभनीय रूप ही कविता सिद्ध करते. कवितेतून व्यक्त होणाऱ्या मार्क्सच्या व्यक्ति-मत्वाच्या तीन रुपांमध्ये सूक्ष्म विरोध असूनही एकात्मता आहे हे लक्षात

घेतले तर या कवितेतील ताण सूक्ष्म आहेत हे जाणवते. परंतु त्याच-बरोबर जानकीअक्का व 'मी' यांच्या प्रतिक्रियांतून व्यक्त होणारे भाव जवळजवळ एकाच पातळीवरून व्यक्त झाले आहेत हेही येथे जाणवल्या-वाचून राहत नाही. आणि म्हणूनच ही एक चांगली व समृद्ध अनुभव व्यक्त करणारी कविता असली तरी तिचा घाट साधाच आहे. (मार्क्सच्या व्यक्तिमत्वांचा वेगवेगळ्या पातळ्यांवरून जाणवणारा एकात्म अनुभव व्यक्त झाला असता तर कवितेचा घाट व्यामिश्र झाला असता.)

'जाहीरनामा' या सग्रहातील 'शीगवाला' या कवितेतही दाऊदचाचा अनुभव कथन करीत आहे. परंतु दाऊदचाचाचे कसाई असणे, मुसलमान असून काशीबायला वाचविण्यासाठी त्याने पाय गमावणे, यांसारख्या घटनांमधील विरोधी ताणच या कवितेला अर्थपूर्णता आणून देतात. पूर्वी उल्लेखिलेल्या कवितांच्या तुलनेने या कवितेतील अनुभवाचा घाट साधा असूनही बोलीभाषेच्या उपयोजनांमुळे या अनु-भवालाही समृद्धता प्राप्त झाली आहे.

'जाहीरनामा' या संग्रहातील 'डेकवर' या कवितेतही अशाच घटना आहेत. आंतरराष्ट्रीय घटनांचा संदर्भ असणाऱ्या या कवितेतील निसर्ग व घटना यांमधून निर्माण होणाऱ्या विरोधी सूक्ष्म ताणातून एक नाट्यपूर्ण अनुभव व्यक्त होत आहे.

या सर्व विवेचनाचा अर्थ असा की, सुर्वे यांच्या सर्व कवितांचा घाट साधा आहे असे एकाच अर्थाने म्हणता येणार नाही. सुरुवातीच्या काळात साधे-सरळ अनुभव (खरं म्हणजे प्रतिक्रिया) व्यक्त करणारी कविता सुर्वे यांनी लिहिली असली तरी क्रमाक्रमाने त्यांच्या अनुभवात समृद्धता येत गेली व त्यांच्या कवितांचे घाटही समृद्ध झाले असेच म्हणावे लागेल. 'नेहरू गेले त्यावेळची गोष्ट' किंवा 'डेकवर' या-सारख्या कविता तर या संदर्भात उल्लेखनीय आहेत. गोष्टरूपाने व्यक्त होणाऱ्या या कवितांकडे पाहताना असे लक्षात येते की सुर्वे आपल्या

अनुभवाकडे थोडे तटस्थपणे (म्हणजे त्रयस्थपणे नव्हे) पाहू लागले. आपल्या अनुभवाची सूक्ष्मता त्यांना जाणवू लागली. आणि हे व्यक्त करण्यासाठी त्यांना गोष्टरूप रचनाबंध संवादी वाटला. या गोष्टीरूपातून वाचकाशी संवादही साधता येतो त्याचबरोबर अनुभवाशी एक अंतर ठेवून तो व्यक्तही करता येतो. त्यामुळे अनुभवाला एक प्रकारची समृद्धता येते. कवितेतील विशिष्ट भाषा,* व्यक्तिरेखा यामुळेही अनुभव समृद्ध होतो. गोष्टीरूपाने अनुभव कथन करणारा हा रचनाबंध सुर्वे यांनी विकसित केला आहे असे त्यांच्या कवितांच्या आधारे म्हणता येईल.

अशा कवितांमधील अनुभव समृद्ध असूनही त्या कविता सहज आकलनीय कशा राहतात ? किंवा अनुभव समृद्ध असूनही घाट साधा कसा राहतो असा प्रश्न इथे उपस्थित करता येईल. अर्थात याचे उत्तर या कवितांच्या आधारे देता येणे शक्य आहे. एक तर गोष्टरूप असल्याने या कवितांमध्ये घटना असतात. घटना मूर्त असल्याने साहजिकच एका स्तरावर या कविता आकलनीय होतात. पुन्हा या घटनांमधून व्यक्त होणारे भाव बहुधा एकाच स्तरावरील व स्थिर असल्याने ते देखील अनाकलनीय वा गूढ राहत नाहीत. वाचकाच्या वा श्रोत्याच्या जाणीवेच्या कक्षेत ते सहजपणे येतात. आता ' नेहरू गेले त्यावेळची गोष्ट ' ही कविता सहज आकलनीय आहे अस म्हटले तर ते एका स्तरापुरतेच खरे आहे. या कवितेतील शब्दांतून व्यक्त होणारे सर्व भाव व त्यातून निर्माण होणारे ताण सहज आकलनीय आहेत हे वाच्यार्थाने खरे नव्हे. परंतु हा अपवाद आहे. ' डेकवर ' या कवितेमागे असणाऱ्या आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमीमुळे ही कविताही सर्वार्थाने सहज आकलनीय नाही हे खरे आहे. परंतु गोष्टरुपाने व्यक्त होणाऱ्या कवितांसंबंधी सर्वसाधारण विधान करायचे तर त्यातील शब्दांतून व्यक्त होणारे भाव त्यातील ताण एकाच स्तरावरील असल्याने या कवितांचा घाट साधा

---

* भाषेचा विचार पुढे स्वतंत्रपणे आला आहे.

राहतो. वास्तवाचे तपशील या कवितांना समृद्ध करीत असले तरी त्यांचा घाट व्यामिश्र होत नाही. म्हणून घाटाचा साधेपणा हेच सुर्वे यांच्या कवितेचे वैशिष्ट्य राहते.

गोष्टरूपाने व्यक्त होणाऱ्या या कवितांप्रमाणेच समूह चित्रण करणाऱ्या सुर्वे यांच्या कविताही लक्षणीय आहेत. 'माझे विद्यापीठ' या संग्रहातील 'पाणी घे' व 'पोस्टर' या अशा कविता. या दोन्ही कविता प्रसिद्ध आहेत.

'पाणी घे' या कवितेत वेश्यावस्तीचे एक चित्र सुर्वे यांनी शब्दांकित केले आहे. परंतु हे चित्र म्हणजे कविता नव्हे. या चित्रातून व्यक्त होणाऱ्या भावांतून जो अर्थ व्यक्त होतो तोच खरा काव्यार्थ आहे. आणि त्यासाठी ही भावांची संघटना कशी होते हे पाहिले म्हणजे या कवितेचा घाट स्पष्ट होण्यासारखा आहे. वेश्यांच्या जगातील भाषेत व्यक्त होणाऱ्या कवितेतील :

--खाली....
खिडक्यातून विटका प्रकाश
आवरतो टांगेवाला, उतरे
अलबेला, छेलछबेला
खुडबुडती खोकी क्षणभर
उडती स्वर-
'आयी मिलन की बेला'

या सुरुवातीच्या ओळीतील 'विटका प्रकाश' तिथे उतरणारा 'अलबेला छेलछबेला' खुडबुडणारी खोकी व त्यातून उडणारे स्वर यामधून जे भाव व्यक्त होतात त्यातून या वस्तीचे बकालपण जाणवत राहते. पुढेही एकेक तपशील सांगणाऱ्या शब्दांतून व्यक्त होणारे सर्व भाव हे सुरुवातीच्या भावांशी संवादीच आहेत. परंतु एवढेच नाही तर इथे येणाऱ्या 'आयी मिलन की बेला' किंवा पुढे येणारे 'दिल लगा के प्यार कर' यांसारख्या शब्दांतून त्यामागे असणारे मूळ नाजुक भावं व

या विश्वातील शब्दांमागे असणारे भाव यामधील एक सूक्ष्म विरोधी ताणही जाणवल्यावाचून रहात नाही. सबंध कवितेत येणाऱ्या 'किती दिसांनी आला इंदीचा राजा' 'परत कधी येणार तू प्राणप्रिया रे' यासारख्या ओळी पाहिल्या तर या ओळीतील शब्दांतून व्यक्त होणाऱ्या भावांत एक सूक्ष्म ताण आहे. म्हणजेच एका बाजूने हे शब्द वेश्यावस्तीच्या वास्तव चित्राला जिवंत करतात आणि त्याच पार्श्वभूमीवर शब्दांतर्गत भाव एक ताण निर्माण करतात. यातूनच वास्तवचित्रणाबरोबर कारुण्याचा स्तर असणारा एक उत्कट अनुभव या कवितेत व्यक्त होतो. कवितेतील शब्दांतून सुसंस्कृत जगातील प्रेमानुभव व वेश्यावस्तीत त्याला येणारी कळा या विरोधी ताणातून हा अनुभव वाचकाला जाणवतो. आणि त्यामुळेच एक समृद्ध अनुभव देणारी कविता वाचल्याचे वाचकाला जाणवते.

'पोष्टर' या कवितेत म्हटलं तर एका घटनेचेच निवेदन आहे. परंतु तिथेही हणम्या, इसल्या व शिंदे यांच्या संवादातून वर वर जाणवणारे भाव व त्यातून येणाऱ्या गमतीदारपणाबरोबरच त्यामागे असणाऱ्या कोमल मानवीभावांची जाणीव होते. या दोन प्रकारच्या भावांमधील ताणातूनच हा अनुभव संघटित झाल्याचे दिसते. बोली-भाषेच्या उपयोजनामुळे हा अनुभव अधिक समृद्ध होतो.

समूह चित्रण करणाऱ्या सुर्वे यांच्या या कविता पाहिल्या तर बाह्यवैशिष्ट्यामुळेच त्या मराठी कवितेच्या क्षेत्रात वेगळ्या वाटतात. बाह्यवास्तवातील हे अनुभव व त्यामागे असणारे मानवीभाव इतक्या प्रभावीपणे मराठी कवितेत पूर्वी कधीच व्यक्त झाले नव्हते. म्हणून या कविता महत्त्वाच्या आहेत. या कवितांमधून व्यक्त होणारे भाव सूक्ष्म सूचक आहेत. म्हणून या कवितांचा घाट रूढ अर्थाने साधा आहे असे म्हणता येत नाही. परंतु येथेही बाह्यवास्तव व त्यातून निर्माण होणारे सूचक भाव हे सरळ साधे असल्याने व ते सुसंगतपणे एकाच पातळीवर रहात असल्याने कवितेचा घाट साधाच आहे. या कवितांमध्येही सुर्वे

यांनी अनुभवापासून काही अंतर राखले आहे. गोष्टीरूपाने व्यक्त होणाऱ्या कवितांप्रमाणेच या कविताही त्यामुळे अधिक समृद्ध अनुभव व्यक्त करणाऱ्या झाल्या आहेत. आपल्या या अनुभवांच्या घाटाला अनुरूप अशी समूहचित्रणाची ही रचना सुर्वे यांनी सिद्ध केली आहे.

अनुभवांचा घाट पाहाण्याच्या दृष्टीने सुर्वे यांच्या दीर्घ कविताही पहाण्यासारख्या व वैशिष्ट्यपूर्ण आहेत. वक्तृत्वपूर्णशैली, आघातयुक्त शब्दरचना याद्वारे व्यापक सामाजिक जाणीवेतून निर्माण होणारा उत्स्फूर्त अनुभव व्यक्त करणारी दीर्घ कविता मराठीला अपरिचित नाही. त्या कविता निवेदनपरच होत्या. परंतु सुर्वे यांनी दीर्घ निवेदनपर कविता लिहून आपला अनुभव व वृत्ती यांना अनुरूप अशा वेगळ्या वाटणाऱ्या दीर्घ निवेदनपर कविता लिहिल्या आहेत असे दिसते. या कविता अधिक भरदार असा अनुभव व्यक्त करीत आहेत. 'माझे विद्यापीठ' ही जीवनाविषयीचे विचार संयमाने व्यक्त करणारी कविता, 'मुंबई' ही मुंबईला उद्देशून आत्मकथन करणारी कविता, 'जाहीरनामा' ही विसाव्या शतकातील माणसाला उद्देशून लिहिलेली तर 'माझ्या देशाच्या नोंदबुकात माझा अभिप्राय' ही देशाला उद्देशून लिहिलेली कविता यांचा या संदर्भात विचार करावा लागेल-

'माझे विद्यापीठ' या कवितेची सुरुवात

'ना घर होते, ना गणगोत, चालेन तेवढी पायाखालची जमीन होती. दुकानांचे आडोसे होते, मोफत नगरपालिकेची फूटपाथ खुलीच होती.

अशा संथ लयीतील निवेदनाने होते. या शब्दांतून व पुढे येणाऱ्या 'उठवळ आयुष्याची ऊठबस' '– टोपलीखाली माझ्यासह जग झाकीत दररोज अंधार येत जात होता' यांसारख्या शब्दांतून व्यक्त होणारे भाव भोवतालच्या वास्तवाचे बकालपण व्यक्त करीत रहातात. यानंतर याकूब नालबंदवाल्याचा प्रसंग येतो. या निवेदनातील-

"ले पकड र स्सी–हाँ खेच, डरता है ? क्या बम्मनका बेटा है रे तू साले. मजदूर है अपन, पकड घोडें को; हाँ; यह, वाद रे मेरे छोटे नालवाले याकूब नालबंदवाला हसे, गडगडें; पत्रीवाला घोडा धूळ झटकीत उभा होई.

'अपने को काला कांडी तेरे को जिलेबी खा.' म्हणत दुसरा अश्व लोळवला जाई.

या ओळीतील याकूबचे शब्द, त्याचे गडगडून हसणे या सर्वांतून सुरुवातीच्या उदास बकाल भावांशी विरोधी असे मृदु भाव व्यक्त होतात. भोवतालच्या बकाल जगात असणारी माणुसकीच त्यातून प्रकट होते. मनाला जाणवते. त्या बकाल जगाच्या संदर्भात ती उठावदार होते, आणि लगेच ओळी येतात–

याकूब मेला दंग्यात, नव्हते नाते, तरीही माझ्या डोळ्याचे पाणी. खळले नाही.

उचलले प्रेत तेव्हा 'मिलाद-कलमा'च्या गजरांत मिसळल्याशिवाय राहिलो नाही

या ओळीतील शब्दांतून कारुण्याचे भाव व्यक्त होतात. याकूबविषयीचे माणुसकीचे भावही त्यातून व्यक्त होत असल्याने 'मी' व याकूब यांच्यातील नातेही या भावातून अर्थपूर्ण होते. या प्रसंगानंतर येणाऱ्या

त्याच दिवशी मनाच्या एका कोऱ्या पानावर लिहिले "हे नारायणा" अशा नंग्यांच्या दुनियेत चालायची वाट, लक्षात ठेव सगळ्या खाणाखुणा.

या प्रतिक्रियेने या कवितेचा पहिला भाग पूर्ण होतो. पहिल्या भागातील हे निवेदन पाहिले तर त्यातील प्रसंगामुळे बाह्यविश्व सजीव होते, एक वास्तव दर्शन घडते; परंतु त्याचबरोबर या शब्दांतून व्यक्त होणाऱ्या भावांमधून जीवनविषयक जाणीवेचा जो प्रत्यय येतो त्यामुळे या कवितेला एक आत्ममग्नतेची डूबही मिळते.

कवितेच्या दुसऱ्या भागात केवळ जीवनाविषयीच्या प्रतिक्रिया येतात. परंतु त्यातील शब्दांमधून जीवनविषयक जाणीव समृद्ध होत असल्याचा प्रत्यय देणारे भाव व्यक्त होत राहतात. तिसऱ्या भागात युद्धावर गेलेल्या मुलाचा ध्यास घेतलेल्या चंद्राचा प्रसंग येतो. तर शेवटच्या भागात आफ्रिकन चाचाचा प्रसंग येतो. आणि अखेरीस—

आता आलोच आहे जगात, वावरतो आहे या उघड्यानागड्या वास्तवात जगायलाच हवे, आपलेसे करायलाच हवे, कधी दोन घेत, कधी दोन देत

या शब्दांनी ही कविता पूर्ण होते.

'माझे विद्यापीठ' ही कविता म्हणजे जीवनविषयक जाणीवेच्या घडणीचा अनुभव आहे. साहजिकच या कवितेतील अनुभव अधिक भरदार आहे. ही कविता एखाद्या प्रदीर्घ स्वगतासारखी वाटते. या कवितेतील शब्दांतून बकाल बाह्यवास्तव, त्यातील माणुसकीचे दर्शन घडविणारे प्रसंग, त्यातून निर्माण होणाऱ्या विविध जीवनविषयक प्रतिक्रिया व या सर्वातून निर्माण होणारे उदासीनतेचे, पश्चात्तापाचे, स्वतःच्या अपूर्णतेचे, दुबळेपणाचे व अपरिहार्यतेचे भाव यांमधून कवितांतर्गत अनुभव समृद्ध होत राहतो. कवितेत येणाऱ्या तीन घटना धर्मभेद, युद्ध व राज्यकर्त्यांची दमनयंत्रणा यांची प्रतीके बनतात. आणि कविमनाला पडणाऱ्या प्रश्नांतून, तद्विषयक विचारांतून प्रत्यक्ष भाष्य न करताच कवीचा सामाजिक दृष्टिकोन व्यक्त होतो. म्हणूनच 'माझे विद्यापीठ' ही एक वैशिष्ट्यपूर्ण कविता ठरते.

'मुंबई' ही देखील एक आत्मकथाच. परंतु या कवितेतील अनुभव कसा घाट धारण करतो ते पाहण्यासारखे आहे.

पटकूर खांद्यावर टाकून; सह्याद्रि घाट उतरून
माझा बाप तुझ्या दारावर उभा राहिला श्रम घेऊन

अशा शब्दांनी ही कविता सुरू होते. हे आत्मकथनच आहे. कवितेतील

'मी' इथे व्यक्तिशः च बोलतो आहे. पुढे येणाऱ्या ओळीतून 'मी' आपल्या बालपणापासूनचे अनुभव सांगत आहे असे दिसते. त्यामधून कष्टकरी पिता-पुत्राचे नाते व त्याचबरोबर त्या जीवनातील वेदनेचाही प्रत्यय येतो. या पहिल्या भागाच्या अखेरीस येणाऱ्या

इथेच, या सागरतीरी झुंजतच त्यानेही देह ठेवला
त्याच्याच साक्षीवर दमेकरी मुकादमाने मला नेमला

या ओळींनी ही कथा एका टप्प्यावर येते. या पहिल्या भागात हे सर्व निवेदन 'मी' ने केले आहे. परंतु पुढे दुसऱ्या भागात येणाऱ्या–

तोच मी, तेच आम्ही ह्या तुझ्या वास्तुशिल्पाचे शिल्पकार
तुझ्या सौंदर्यात हे नगरी! दिसोदिस घालीत असतो भर
नरकासम चाळीत राहूनच स्वच्छ करतो तुझे रस्ते
उठवले जातो कधी, दंडुकेवाले जसे उठवतात फिरस्ते
पुन्हा उचलतो संसार थाटतो दुज्या बाजूच्या खाचरात
जगत आहोत ह्या संस्कृतीच्या सडत आलेल्या वारशांत
असे आम्ही लक्षावधी नारीनर दिवस असेतो वावरतो
राबता, खपता आयुष्य मेणबत्तीसम विझवून घेतो

या ओळी पाहिल्या की निवेदक 'मी' ऐवजी आम्ही झालेला दिसतो. पहिल्या भागातील शब्दातून व्यक्त होणारे भाव 'मी' चा जीवनार्थ व्यक्त करीत होते. या दुसऱ्या भागातील शब्दांतून व्यक्त होणारे भाव कष्टकरी वर्गाचा जीवनार्थ व्यक्त करतात. हे भाव व अर्थ परस्परांशी संवादी राहून अनुभवाला व्यापक करतात.

सुरुवातीपासून ही कविता मुंबईला उद्देशून आहे. परंतु तिसऱ्या भागातील –

'या क्षणी मनाच्या धर्मशाळेत जमलेत सोबतीचे प्रवासी
लिही आम्हावर म्हणत रांग लावून उभे हृदयाच्या दाराशी
मित्र हो! तुम्हीच मुंबईच्या घडणीतील अमृत अक्षर
माझ्यावर, या शहरावर तुमचेच हरघडी संस्कार

यासारख्या ओळींमुळे ही कविता कामगारांना उद्देशून असल्यासारखी वाटते. पुढे पुन्हा 'मी'ची व्यक्तिगत कथा म्हणून निवेदन केले जाते व अखेरीस

'ओलंडून पाहतो आहे हृदयघट, सांग कुठे करू रिता
घडवुन गेला माझा बाप तुजसम स्फूर्तिशाली कविता

अशा ओळींनी ही कविता पूर्ण होते. तेव्हा शेवटच्या ओळीतील 'माझा बाप' हा शब्दप्रयोग केवळ व्यक्तिगत 'मी'च्या संदर्भातील की मागील पिढ्यांचा दर्शक असा प्रश्न पडतो.

या कवितेतील निवेदक स्वतःची जीवनकथा सांगायला सुरुवात करतो. ही कथा म्हणजे कष्टकरी समाजातील व्यक्तीची कथा आहे. परंतु ही कथा सांगत असताना हा 'मी' इतर कष्टकऱ्यांशी एकरुप होऊन त्यांच्या मुखाने बोलू लागतो. पुन्हा त्यांच्यापासून वेगळा होऊन व्यक्तिकथा सांगू लागतो म्हणजेच या कवितेत निवेदकाच्या भूमिका बदलतात. या बदलत्या भूमिकांमुळे ही कविता म्हणजे केवळ व्यक्ति-कथा न राहता त्या अनुभवाला तीन पिढ्यांच्या कथेचे व कष्टकरी-वर्गाच्या कथेचे परिमाण प्राप्त होते. त्यामुळे हा अनुभव व्यापक व समृद्ध होतो.

मुंबईला उद्देशून असणारी ही कविता जेव्हा कष्टकऱ्यांना उद्देशून बोलू लागते तेव्हा त्यामुळे मुंबई आणि कष्टकरी यांच्यातील एकरूपतेचा प्रत्यय येतो. वर वर पाहता हे निवेदन सलग वाटते, ते वास्तव जीवनातील प्रसंग व त्यातून निर्माण होणाऱ्या प्रतिक्रियांच्या पातळीवर राहते म्हणून या कवितेचा घाट साधा वाटत असला तरी व्यक्ती व कष्टकरीवर्ग अशा दोन भूमिकांमधून घेतलेला अनुभव या कवितेत एकात्म होत आहे. म्हणून तो रूढ अर्थाने साधा नाही. परंतु या दोन भूमिका परस्परांशी संवादी असल्याने व त्यामधून निर्माण होणारे भाव एकाच स्तरावरील असल्याने कवितेचा घाट व्यामिश्र होत नाही, हेही तितकेच खरे आहे. 'मुंबई' ही कविता एक व्यापक व समृद्ध

अनुभव व्यक्त करते. या कवितेत संवादी भावांच्या सूक्ष्म छटांची संघटना आहे. म्हणून ही एक चांगली कविता ठरत असली तरी तिचा घाट साधाच राहतो. मात्र या कवितेने दीर्घ निवेदनपर कवितेचा एक वेगळा नमुना मराठी कवितेला दिला आहे.

' माझे विद्यापीठ ' व ' मुंबई ' या दोन्ही कवितांतील अनुभवांकडे पाहिले तर या दोन्ही कवितांमध्ये येणाऱ्या प्रत्यक्ष घटनांमधून बाह्यविश्व मूर्त होते तर त्याविषयीच्या प्रतिक्रियांमधून व्यक्त होणारे अमूर्त भाव या विश्वाशी एकरूप होतात असे दिसते. यामुळे प्रत्यक्ष मूर्त वास्तव व अमूर्त सामाजिक जाणीव यातील द्वंद्व मिटते. वास्तवाशी सहकंप होण्याच्या वृत्तीतून या कवितांची निर्मिती झाली आहे. या दोन्ही कविता ' माझे विद्यापीठ ' या संग्रहातील आहेत. या संग्रहाकडून ' जाहीरनामा ' या संग्रहाकडे वळले म्हणजे मात्र वेगळा अनुभव येतो. या संग्रहातील ' जाहीरनामा ' आणि ' माझ्या देशाच्या नोंदबुकात माझा अभिप्राय ' या कवितांकडे पाहिले तर अमूर्त व्यापक सामाजिक जाणीवेतून त्यांची निर्मिती झाली आहे असे दिसते.

' जाहीरनामा ' ही कविता म्हणजे विसाव्या शतकातील माणसांना उद्देशून कवीने केलेले आवाहन आहे. एका उत्स्फूर्त उद्रेकाने भारलेली अशी ही कविता आहे.

आजच्या नावाने आणि
आजच्या दुःखांच्या नावाने
संथपणे प्रकाशात येत असलेला भू-भाग त्याच्या नावाने

अशा धीर-गंभीर व वजनदार शब्दांनी ही कविता सुरू होते. या कवितेतील पुढे येणाऱ्या ओळी पाहिल्या तर त्यामधून एक भव्य चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. ही भव्यता दुहेरी आहे.

धूत असेल पाऊस डेकसारखे एखादे शहर
घातलीही असेल एखाद्या खेड्यावर बर्फाने चादर

किंवा,

उत्तर ध्रुवावरून सरकणारी हिमलाट
पॅरिसचा बाजार गरम असेल

यांसारख्या ओळींमुळे विस्तीर्ण प्रदेश डोळ्यासमोर येतो. तर

हॅम्लेट बावरला असेल

या ओळीमुळे कालदृष्ट्या भव्यतेचेही परिमाण जाणवते. शिवाय या ओळीमधील शब्दांमधून एक गंभीर भाववृत्तीही निर्माण होते. या सर्व पार्श्वभूमीवर–

खुंटीवर स्वप्ने टांगून मान मोडून काम करणाऱ्या वास्तवाच्या
पोलाद वितळवून मनासारखा आकार देणाऱ्या झोतभट्ट्यांच्या
चहाच्या मळ्यातील पत्ती खुडून शिणलेल्या दळदार बोटांच्या
भार पेलून मोकळी होऊ पाहणाऱ्या गर्भवती कवितेच्या नावाने
गर्भार गतीच्या नावाने

या ओळी आल्यामुळे सुरुवातीच्या शब्दांमधून निर्माण झालेल्या विराटतेच्या पार्श्वभूमीवर येणारे हे प्रत्यक्ष वास्तवाचे उल्लेख एक ताण निर्माण करतात. पुढे हे शतक इतिहासात जमा झाल्यावर काय होईल हे सांगणाऱ्या शब्दांतून जाणवणारी एक प्रकारची रुक्षता व त्यानंतर येणाऱ्या–

पण कुणी सांगेल काय? ह्या शतकात चंद्र महागला होता.
कलकत्त्याच्या रस्त्यावर घोडा होऊन माझा आत्मा बग्गी
ओढत होता.

या ओळी पाहिल्या तर इतिहासात अक्षर होणारे वास्तव व प्रत्यक्ष जिवंत वास्तव यांतील ताण व्यक्त होताना जाणवतो. तर यानंतर येणारे 'पण एवढे पुरे;' हे शब्द वास्तवातील वेदनेचा ताण पेलून धरतात व आत्मपरीक्षणाला सुरुवात होते.

कितीं वेळा आपण जमा झालोत मारवाड्याच्या पोथीत
कितीदा आयुष्य निघाले होते मोडीत
कितीं वेळा हाकारे गेले रान उठवीत
कितीं घरघरली विमाने धाक दाखवित
आपण फक्त लिप्या बदलीत राहिलो
सोयीनुसार दरवाजे बदलीत राहिलो
उडालेली कौले शाकारीत राहिलो

या शब्दांतून व्यक्त होणाऱ्या भावांमुळे वास्तव बदलण्याचे मनःपूर्वक प्रयत्न न केल्याची खंत संयमितपणे व्यक्त होते. आणि–

'दोस्त हो ! ह्या शतकाची संध्याकाळ सुरू होत आहे.

या शब्दांतून भय व गांभीर्य हे भाव व्यक्त होऊन विसाव्या शतकाची भयग्रस्त अवस्था सूचित होते. या पार्श्वभूमीवर कवीचे आत्मकथन सुरू होते. या आत्मकथनातील शब्दांशब्दातून भयग्रस्त वातावरणाला चिरत जाणारे भाव उत्स्फूर्तपणे व्यक्त होत राहतात. औदासिन्याच्या पार्श्वभूमीवर आशेचे स्फूलिंग प्रकट करणारे भाव हे शब्द व्यक्त करतात व शेवटी

रक्त माझे, ठिबकत ठिबकत पसरते
दोन्ही इरुवांच्या मध्यातून
आणि दोस्तहो !
मी पाहतो आहे
एक क्षुब्ध नवागत गतीचे टोक धरून
लिहितो आहे,
हे शब्द हटवा..... हे पुतळे.....स्थितिस्थापक
हवा आहे मनासारखा नवा जाहीरनामा म्हणून
नवा जाहीरनामा म्हणून.

अशा शब्दांनी कविता संपते तेव्हा विराट जगाशी सहकंप होणारी, जगातील वास्तवाला बदलू पाहणारी कवीची जाणीव व्यक्त झाल्याचा

प्रत्यय येतो. या कवितेची रचना व त्यातील भाषेचे उपयोजन यातून दीर्घ निवेदनपर कवितेचा एक वैशिष्ट्यपूर्ण रचनाबंध सिद्ध होतो.

' जाहीरनामा ' या कवितेचा हा प्रचंड आवाकाच वाचकाला, श्रोत्याला भारून टाकतो. परंतु कवितेतील शब्दांतून व्यक्त होणारे संवादी, विरोधी भावांचे स्वरूप पाहिले तर त्यातील सरळ साधेपणा जाणवल्यावाचून राहत नाही. भोवतालचे बाह्यविश्व व कवीच्या मनातील आशावादी झुंजारवृत्ती यातून ते सरळपणे व्यक्त होतात आणि म्हणूनच या कवितेचा घाट साधाच राहतो. (अमूर्त व्यापक सामाजिक जाणीव व्यक्त करणाऱ्या या कवितेत कवीमन बाह्यविश्वातील प्रत्यक्ष अनुभवाकडे झेपावत राहिल्यामुळेही या कवितेला मर्यादा पडतात.)

' माझ्या देशाच्या नोंदबुकात माझा अभिप्राय ' ही कविताही ' जाहीरनामा ' या कवितेसारखीच असल्याने त्या कवितेचा स्वतंत्रपणे विचार करण्याची आवश्यकता नाही.

सुर्वे यांच्या कवितेच्या घाटांचे हे स्वरूप पाहिले म्हणजे असे लक्षात येते की, घाटदृष्ट्या सुर्वे यांची कविता फारशी विविधतापूर्ण झालेली नाही. कवीमन व बाह्यविश्व यांच्या ताणातून स्फुरणारी जाणीव हे या कवितेतील अनुभवांचे केंद्र आहे असे म्हटले तर या केंद्राशी समांतर अशा बाह्य विश्वातील संदर्भांनी त्यांच्या कवितेतील अनुभव सिद्ध होत असतो असे दिसते. या संदर्भांची विविधता व सूक्ष्मता यामुळे या अनुभवांना समृद्धता येते. परंतु हे संदर्भ एकाच पातळीवरील असल्यामुळे ते सहजपणे वाचकाच्या जाणीवेच्या कक्षेत येतात. साहजिकच सुर्वे यांच्या अनुभवाचा व पर्यायाने कवितेचा घाट साधा राहतो. मात्र कवितेतील अनुभवाच्या केंद्रस्थानी असणारी जाणीव व त्याला समांतर असणारे बाह्यविश्वाचे संदर्भ हे दोन्ही घटक रूढ मराठी कवितेच्या संदर्भात वेगळे असल्याने सुर्वे यांची कविता वेगळी वाटते.

सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवांची घडण पाहताना आणखीही एक गोष्ट जाणवते व ती म्हणजे त्यांच्या कवितेत परस्परविरोधी अनुभव एकमेकासमोर आणल्याने निर्माण होणाऱ्या ताणांचे संघटन आढळत नाही. त्यांच्या कवितेत एका अनुभवाच्या पार्श्वभूमीवर दुसरा अनुभव आल्याने निर्माण होणारे ताण जाणवतात. म्हणजे कधी बाह्य वास्तवाच्या पार्श्वभूमीवर कवीमनाचे स्वप्न, तर कधी सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या जगाच्या पार्श्वभूमीवर कष्टकरी जगाचे अनुभव अशा स्वरूपात सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवांचा प्रत्यय येतो. अशा ठिकाणी या विरोधी अनुभवातून ताण निर्माण होतात व त्यामुळे कवितांतर्गत अनुभवाला अर्थ प्राप्त होतो. परंतु त्यामुळेच परस्परविरोधी अनुभव समोरासमोर आल्याने निर्माण होणारी व्यामिश्रता सुर्वे यांच्या कवितेत येऊ शकत नाही. सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवाचेच हे वैशिष्ट्य आहे. यामुळेच त्यांची कविता घाटदृष्ट्या साधी राहते.

कवितांतर्गत अनुभवांच्या या विशिष्ट स्वरूपामुळेच सुर्वे यांची कविता रचनादृष्ट्या विविधतापूर्ण होत नाही. निवेदन करू शकणारे रचनाबंध या अनुभवांशी संवादी होत असल्याने रचनात्मक विविधता येण्यावर स्वभावतःच बंधने पडतात. शिवाय जाणीवपूर्वक रचनेकडे लक्ष पुरविण्यापेक्षा अनुभवाशय प्रकटीकरणाकडे सुर्वे यांचा कल असल्यामुळेही त्यांची कविता रचनादृष्ट्या विविधतापूर्ण होत नाही.

सुर्वे यांच्या कवितेच्या घाटाचे हे स्वरूप म्हणजे एका प्रकारे कवी म्हणून असणारी त्यांची मर्यादाच आहे असे म्हणता येईल. परन्तु या मर्यादेत सुर्वे यांनी जे यश मिळविले, आपल्या कवितेद्वारे त्यांनी ज्या वैशिष्ट्यपूर्ण अनुभवांची निर्मिती केली; ती मराठी कवितेच्या संदर्भात लक्षणीय आहे. त्यांच्या कवितेमुळे मराठी कवितेच्या क्षेत्रात निवेदनपर कवितेचे वेगळे रूप सिद्ध झाले आहे.

नारायण सुर्वे
यांची
कविता

तीन

आपण कविता कविता म्हणतो ते प्रत्यक्षात शब्दच असतात. या शब्दाद्वारेच शब्दांपलिकडील कवीचे अनुभव वाचकापर्यंत पोहोचत असतात. कवितेतून व्यक्त होणारे कवीचे व्यक्तिमत्त्व, त्यांची जीवन-विषयक जाणीव, काव्याकडे पाहण्याची त्याची दृष्टी यासंबंधीच्या सर्व विधानांचा खरा आधार कवीचे शब्द हाच असतो. म्हणूनच कोणत्याही कवीच्या कवितेचा विचार करताना 'कवितेच्या भाषेचा' विचार अपरिहार्य ठरतो.

कवीच्या 'कवितेच्या भाषेचा' विचार करताना कवीने योजलेली अर्थपूर्ण विशेषणे, शब्दांच्या अपरिचित रूपांचा त्याने केलेला वापर किंवा कवीने घडविलेली नवी शब्दरूपे, जुन्या शब्दरूपांना दिलेले नवे अर्थ, त्याने योजलेल्या प्रतिमा इ.च्या म्हणजेच ज्या योगे कवीची कल्पकता व्यक्त होईल अशा शब्दरचनांचा विचार अनेकदा केला जातो. अशा विचारातूनच बालकवींची शब्दकळा नाजुक व नादमयी आहे किंवा माधव जूलियन यांची 'सुधारक' सारख्या काव्यातील शब्दकळा मिश्र व विक्षिप्त आहे, यासारखी विधाने करता येतात. काही वेळा कवीची वा कवितेची भाषा कशी असावी यासंबंधीचे काही आदर्श मनात धरून विचार केल्याने शब्दरचनेच्या विशिष्ट गुण-विशेषांनाच काव्याच्या निकषाचेही स्वरूप प्राप्त होऊ शकते. कवीच्या

'कवितेच्या भाषेचा' असा विचार करतानाही कवीच्या सृजनशीलतेचे रहस्य काही प्रमाणात आकलन होते हे खरे आहे. परंतु अशा पद्धतीने विचार करून येणारे निष्कर्ष काही वेळा योग्य ठरत असले तरी कवी आणि कविता यांना ते नेहमीच न्याय देणारे असतात असे नाही. उदा., केशवसुतांची कवितेची भाषा खडबडीत आहे, या निष्कर्षातून केशवसुतांचे वा त्यांच्या कवितेचे कोणतेच रहस्य प्रकट होत नाही, किंवा सावरकरांच्या कवितेची भाषा संस्कृतप्रचुर आहे असे म्हटल्याने सावरकरांच्या कवितेच्या कोणत्याही रहस्याचे आकलन होत नाही. म्हणूनच कोणत्याही कवीच्या 'कवितेच्या भाषेचा' विचार करताना केवळ शब्दप्रयोगाची वैशिष्ट्ये न नोंदविता त्या शब्दप्रयोगांची परिणामकारकता, अनुभवाच्या घडणीमधील त्यांची अर्थपूर्णता लक्षात घेणे आवश्यक ठरते.

कवितेद्वारे कवी विविध प्रकारचे अनुभव सिद्ध करीत असतात. नाजुक, हळवे, तीव्र, कोमल, केवल भावनात्मक, चिंतनशील, वैचारिक अशा अनेक प्रकारच्या अनुभवांची निर्मिती कवी शब्दांद्वारे करीत असतो. प्रत्येक प्रकारच्या अनुभवाचे वैशिष्ट्य कवितेतील विशिष्ट शब्दप्रयोगांनी -कवितेच्या विशिष्ट भाषेने- रेखीव झालेले असते. उदा. केवलभावनात्मक, तरल असा अनुभव असेल तर त्या अनुभवाची उत्कटता, तरलता विशिष्ट शब्दयोजनेमुळेच वाचकाला प्रतीत होत असते. भाषेच्या विशिष्ट स्वरूपामुळेच ती उत्कटता, तरलता, टिकविलेली असते. अनुभव विविध पातळ्यांवरील व म्हणून व्यामिश्र व गुंतागुंतीचा असेल तर कवीने केलेल्या भाषेच्या नवनवीन प्रयोगामुळेच त्या अनुभवाच्या एकात्मतेचा प्रत्यय येत असतो. त्याचप्रमाणे सामाजिक, राजकीय स्वरूपाचे अनुभव व्यक्त करणाऱ्या कवितेत अनुभवाचे स्वरूप अबाधित राहून त्याला गद्याची कळा येत नाही, याचेही कारण विशिष्ट प्रकारचा भाषेचा उपयोग हेच असते. म्हणूनच कवितेच्या संदर्भात 'कवितेच्या

भाषेला ' महत्त्व असते.

काही वेळा ' कवितेच्या भाषेचे ' वेगळेपण चटकन जाणवणारे असते. उदा. मर्ढेकरांच्या कवितेची भाषा वैशिष्ट्यपूर्ण आहे म्हणजे काय हे सांगण्यासाठी समीक्षकाची गरज भासली तरी त्या भाषेचे वेगळेपण वाचकाला सहज जाणवणारे आहे. बालकवी, कुसुमाग्रज, बोरकर यांसारख्या कवींची भाषा अशी सहजपणे वाचकांचे लक्ष वेधून घेणारी आहे. याचा अर्थ असा की, जाणवण्यासारखी नादानुकूलता, अपरिचितता, कल्पकता इ.मुळे कवीच्या भाषेचे वेगळेपण चटकन् ध्यानात येते. साहजिकच अशा भाषेची वैशिष्ट्ये सहजपणे एकत्रित करता येतात, आणि त्यांच्या अनुषंगाने त्या भाषेच्या परिणामकारकतेचा विचार ओघानेच करता येतो. परंतु कवीची भाषा नेहमीच असे वाचकाचे लक्ष वेधून घेणारी असते असे नाही. अशा वेळी ' कवीची भाषा साधी व परिणामकारक आहे, असे म्हणून कवितेच्या भाषेच्या विचाराचा प्रारंभ व समारोप केला जातो. वस्तुतः ही भाषा साधेपणानेच परिणाम साधते म्हणजे काय करते ? कवीच्या अनुभवांना या भाषेमुळे कशी वैशिष्ट्यपूर्णता प्राप्त होते ? कवितेच्या संदर्भात ही भाषा कशी अर्थपूर्ण ठरते ? या प्रश्नांचा विचार होणे आवश्यक असते. सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेचा विचार करताना ही दृष्टी ठेवून विचार करणे उपयुक्त ठरणार आहे.

सुर्वे यांची कविता मराठी कवितेच्या क्षेत्रात वेगळी उठून दिसते; कारण या कवितेतून प्रत्ययाला येणारे अनुभव वेगळे आहेत. परंतु अनुभवांच्या या वेगळेपणाचा वाचकाला प्रत्यय येतो तो त्या कवितेतील शब्दांद्वारेच. म्हणजे सुर्वे यांच्या कवितेतील शब्दरचना, प्रतिमा यांमधून व्यक्त होणाऱ्या भावांच्या संघटनेतूनच या अनुभवाची घडण होत असते. म्हणूनच सुर्वे यांची कविता साधी-सरळ आहे असे म्हटले की पर्यायाने त्यांच्या कवितेची भाषा साधी-सरळ आहे हे ओघानेच

येते. ती रोखठोक आहे. आशय सरळ व्यक्त करणारी आहे, असेही अनेकदा म्हटले जाते. परंतु कवितेची भाषा रूढ अर्थाने साधी-सरळ असू शकते का? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. सुर्वे यांच्या कवितेत अवघड शब्द येत नाहीत, अपरिचित शब्दप्रयोग करण्याची सुर्वे यांना गरज भासत नाही किंवा शब्दांची मोडतोड करणे, नवे शब्द घडविणे असे भाषेचे नवनवे प्रयोग सुर्वे प्रत्यक्षपणे करीत नाहीत, या अर्थाने त्यांच्या कवितेची भाषा साधी आहे हे खरे असले तरी ते संपूर्ण सत्य नव्हे. ज्या अर्थी या भाषेतून काव्याचा प्रत्यय येतो त्या अर्थी ती भावसूचक असलीच पाहिजे. हे लक्षात घेऊन सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेकडे-शब्दरचनेकडे पाहिले पाहिजे. यासाठी सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेसंबंधीच्या आपल्या प्रतिक्रिया आपण नीट तपासून पाहिल्या पाहिजेत.

सुर्वे यांची बरीचशी कविता कोणाला तरी उद्देशून असते, वाचकांशी संवाद करणे हा सुर्वे यांच्या कवितेचा स्वभाव आहे असा उल्लेख मागे आला आहे. सुर्वे यांच्या कवितेचा हा स्वभाव त्यांच्या भाषेतून, शब्दरचनेतूनच वाचकाला जाणवत असतो. दैनंदिन व्यवहारात योजतो तशी भाषा सुर्वे यांच्या कवितेतून ऐकल्याचा भास होतो.

'रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे'
'दोन दिवस वाट पहाण्यात गेले, दोन दुःखात गेले'
'दररोज स्वतःला धीर देत जगणे कठीण होत आहे'
'तुमच्या त्या उदास रात्री आता मला नकोत'

किंवा,

'जेव्हा कधी या कवितांवरचे प्रयोग होतील
तेव्हाच्या मित्रांना हा एक अनाहूत सल्ला
तो अशासाठी—'

यांसारख्या ओळी पाहिल्या तर हे सहज जाणवण्यासारखे आहे. या

ओळींतील सर्व शब्द अगदी रोजच्या परिचयाचे आहेत. साहजिकच सुर्वे यांच्या कवितेची भाषा रोजच्या बोलण्यातल्या भाषेसारखी आहे असे म्हणावेसे वाटते. परंतु सुर्वे यांच्याच कवितेतील काही शब्दप्रयोग पाहिले तर हे म्हणणे तितकेसे खरे नाही असे लक्षात येते. उदा., 'रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे' अशी ओळ असणाऱ्या कवितेतच 'माझ्या जगाची गंधवेणाही त्यात आहे' किंवा 'इथूनच शब्दांच्या हाती खड्गे मी देत आहे' अशा ओळी येतात. इथे येणारे गंधवेणा, खड्गे हे शब्द काही रोजच्या बोलण्याच्या भाषेतील नाहीत. 'माझी आई' या साध्या कवितेत येणाऱ्या

'दसऱ्याच्या आदल्या दिनीं
जाई पांचासह घेऊनी'

अशा ओळी येतात. तिथेही दिनी, पांचासह हे शब्दप्रयोग बोलण्याच्या भाषेतील नाहीत हे उघड आहे. 'माझे विद्यापीठ' या कवितेत येणाऱ्या 'खूप सोयरीक करतो आता ग्रंथांची वाटते, तेही आपणासारखेच बाटगे निघाले, हवे होते थोडे परिचारिकेसम कामगारासम निर्मिती-क्षम, पण दुबळेच निघाले,' या ओळी पाहिल्या तर तेथेही परिचारिकेसम, कामगारासम ही शब्दांची रूपे उघड उघड ग्रांथिक आहेत हे सहज लक्षात येते. याचबरोबर सुर्वे यांच्या कवितेत रूपके, प्रतिमा, प्रतीके यांचीही निर्मिती होत असते. अशी निर्मिती नेहमीच्या बोलण्याच्या भाषेत होतेच असे नाही. तेव्हा सुर्वे यांच्या कवितेची भाषा नेहमीच्या बोलण्याच्या भाषेसारखी वाटते हे खरे असले तरी ती तशी नाही हेही खरे आहे. तथापि बोलण्याच्या भाषेसारखे वाटण्यातच या भाषेचे वैशिष्ट्य व सामर्थ्य सामावले आहे. म्हणूनच सुर्वे यांच्या कवितेत या बोलण्याच्या भाषेचा आभास कां व कसा निर्माण होतो हे पाहिले तर या भाषेची वैशिष्ट्ये लक्षात येतील व या वैशिष्ट्यांचा काव्यार्थाशी असणारा संबंध लक्षात घेतला म्हणजे सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेचे वेगळेपण व अर्थ-पूर्णता लक्षात येईल.

या दृष्टीने सुर्वे यांच्या कवितेकडे पाहिले तर प्रथम लक्षात येते ती आघातयुक्तता. बोलण्याच्या भाषेत असतात तसे आघात सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेत जाणवतात.

ना घर होते, ना गणगोत, चालेन तेवढी पायाखालची जमीन होती.

किंवा

'आकाशाच्या मुद्रेवर अवलंबून राहिलो नाही
उगीच कुणाला सलाम ठोकणे जमलेच नाही'

किंवा

ख्रुश्चोव, केनेडी नासेर वगैरे वगैरे.

यांसारख्या ओळींतून हे आघात जाणवण्यासारखे आहेत. अशा आघातयुक्त शब्दरचनेमुळे सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेला एक प्रकारचा जोरकसपणा प्राप्त होतो. अशी शब्दरचना हा वक्तृत्वपूर्ण शैलीचाच एक गुणधर्म आहे. आघातांच्या पुनरावृत्तीमुळेच सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेला एक लय प्राप्त होत असते व साध्या शब्दांच्या लयबद्ध रचनेतून त्यांची भाषा अनेकदा परिणाम साधीत असल्याचा प्रत्यय येतो.

परंतु या आघातयुक्त शब्दरचनेपेक्षा सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेत जर कशाला महत्त्व असेल तर ते उच्चारांच्या मोडणीला. (modulation ला) वक्तृत्वात किंवा आपल्या रोजच्या बोलण्यात उच्चारांच्या या मोडणीला फार महत्त्व असते. उच्चारांची मोडणी बदलली तर शब्दांच्या अर्थाच्या छटाही बदलल्याचा प्रत्यय आपल्या नेहमीच्या बोलण्यात कधी कधी येत असतो. साधे शब्द त्यामुळेच परिणामकारक बनत असतात. सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेत असे अनेकदा घडते. उच्चारांच्या मोडणीचा विविध प्रकारचा वापर सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेत अनुभवाला येतो. उच्चारांच्या मोडणीमुळे अर्थभेद कसा होऊ शकतो याचे उत्तम व साधे उदाहरण 'ऐसा गा मी ब्रह्म' या

संग्रहातील 'चार शब्द' या पहिल्याच कवितेत पाहावयास मिळते. या कवितेतील.

सारस्वतांनो! थोडासा गुन्हा करणार आहे
सारस्वतांनो! थोडासा गुन्हा घडणार आहे

या ओळी सरळ उच्चारल्या तर साहित्याच्या क्षेत्रात पहिले पाऊल टाकीत असताना कवी हे नम्रतेने बोलत आहे असे वाटेल. परंतु या ओळीतील शब्दांच्या उच्चारांची मोडणी बदलली तर याच ओळीमध्ये सूक्ष्म उपरोध असल्याची जाणीव होते. कवितेतील इतर ओळींच्या संदर्भात हा उपरोधिक अर्थच सुसंगत आहे हे सहज पटण्यासारखे आहे. 'ऐसा गा मी ब्रह्म' मधील 'शद्बांचे ईश्वर' या कवितेतील– 'चला बरे झाले, आम्हालाच कवितेत खराब व्हायचे होते' ही ओळ देखील या संदर्भात अशीच पाहण्यासारखी आहे. अर्थात् उच्चारांच्या मोडणीची ही अगदी साधी उदाहरणे आहेत.

परंतु या उच्चारांच्या मोडणीतूनच सुर्वे यांच्या कवितेतील साध्या शद्बांतून विविध भाव कसे व्यक्त होतात ते पाहायचे असेल तर, 'ऐसा गा मी ब्रह्म' मधील 'चार शद्ब' व 'जाहीरनामा' या संग्रहातील 'पुढच्या युगांची सर्व दुःखे' या कविता समोरासमोर ठेवून पाहाव्या.

रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे
कधी फाटकाबाहेर कधी फाटकाआत आहे

या 'चार शब्द' या कवितेतील ओळी आणि

आपण विसरू म्हणावे सगळे, विसरता येत नाही
रोजच कथन करावा लागतो वृत्तांत; हे टळत नाही

या 'पुढच्या युगाची सर्व दुःखे' या कवितेतील ओळी पाहिल्या तर या ओळी एकाच पद्धतीने उच्चारणे अशक्य नाही हे लक्षात येते.

परंतु कविता वाचीत असताना ' चार शब्द ' मधील ओळींचा उच्चार जोरकसपणे केला जातो, तर 'पुढच्या युगाची सर्व दुःखे' या कवितेतील ओळी जरा खालच्या स्वरात व संथपणे उच्चाराव्या लागतात. त्या ओळींचा तसा उच्चार केल्यानेच त्या ओळींतील शब्दांमागे असणाऱ्या भावांची प्रतीती येते.

' माझे विद्यापीठ ' या कवितेतील -

निळ्या छताखाली नांगरून ठेवल्या होत्या साहेबांच्या बोटी
दुखत होत्या खलाशांच्या माल चढवून उतरून पाठी

या ओळींचा ज्या पद्धतीने उच्चार होतो त्याच पद्धतीने

टरकावले घामेजले खमीस, त्याचा क्रेनवर बावटा फडफडला

ही ओळ उच्चारून चालत नाही. इथे आवाज वरच्या पट्टीत न्यावा लागतो. शब्दांचे उच्चार अधिक गतीने करावे लागतात. तेव्हाच या शब्दामागील उद्रेकाचा, त्वेषाचा भाव भरीवपणे व्यक्त होतो. आफ्रिकन चाचाचा हा प्रसंग निवेदन करून झाल्यानंतर येणाऱ्या -

कुठे असेल माझा गुरू, कोणत्या खंदकात, कां? बंडवाला बंदीशाळेत
अजून आठवतो आफ्रिकन चाचाचा पाठीवरून फिरलेला हात

या ओळीतील शब्दांचा उच्चार संथपणे व थोड्या खालच्या स्वरात करावा लागतो. एका उद्रेकानंतर येणाऱ्या या संथपणामुळे एका गंभीर भाव-वृत्तीचा प्रत्यय येतो. तर त्यानंतर येणाऱ्या -

आता आलोच आहे जगात, वावरतो आहे या उघड्या–
नागड्या वास्तवात
जगायलाच हवे, आपलेसे करायलाच हवे, कधी दोन घेत
कधी दोन देत

या ओळींतील शब्दांच्या उच्चारात खालची पट्टी व संथपणा ठेवल्यानेच

कवितेत व्यक्त होणाऱ्या सर्व अनुभवांमधून येणाऱ्या अपरिहार्यतेची उत्कटपणे प्रतीती येते.

'माझे विद्यापीठ' याच संग्रहातील 'कर्जपुत्र' ही कविता पाहा...

पुढे काढले लगीन अमुचे बा बापानेच
ताशे वाजंत्री वाजली मिरवलो कर्जातच....
छान बाहुली शेजारी काळे हुरुपले खांदे
दोघे निस्तरा निस्तरा झाले जगण्याचे बांधे

अशा शब्दांतून ही कविता व्यक्त होते. या कवितेत एक उपरोधिक सूर आहे. अति झाले आणि हसू आले म्हणतात तशा वृत्तीने या कवितेतील अनुभव प्रकट होत आहे. या कवितेतील अनुभवात आहे वेदनाच; पण वेदनेचा हळवेपणा टाळून इथे ती वेगळ्या वृत्तीने व्यक्त झाली आहे. या कवितेतील अनुभवामागे असणाऱ्या वेगळ्या वृत्तीचा प्रत्यय येतो तो कवितेतील प्रत्यक्ष शब्दांपेक्षा त्या शब्दांच्या उच्चार-वैशिष्ट्यातून; हे लक्षात घेतले तर सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेतील उच्चारांच्या मोडणीचे वैशिष्ट्य स्पष्ट होईल. 'जाहीरनामा' या संग्रहातील 'तुमच्या त्या उदास रात्री आता मला नकोत' या कवितेतही उदासीनतेचा वीट आल्याचा कवीमनातील भाव या शब्दांच्या विशिष्ट उच्चारातूनच प्रत्ययकारी होतो. कवितेच्या अखेरीस येणाऱ्या–

तुमच्या त्या उदास रात्री आता खरोखरच मला नकोत
खरोखरच नकोत--

या शब्दांमुळे तो भाव मनावर अधिक ठसतो. परंतु तिथेही त्या शब्दांची उच्चारवैशिष्ट्येच लक्षात घ्यावी लागतात.

सुर्वे यांनी जी थोडी प्रेमकविता लिहिली आहे ती हळूवार आहे. मृदु भाव व्यक्त करणारी आहे. परंतु तिथेही काही अपवाद वगळता शब्द नाजूक आहेत असे म्हणता येत नाही. त्या कवितांतून जो हळूवारपणा जाणवतो तो तेथील शब्दांच्या उच्चारांच्या मोडणीतूनच.

'बेतून दिलेले आयुष्य' या कवितेत बेतून दिलेल्या आयुष्याविषयीची, बेतलेल्या रस्त्याने गेल्यावर मिळणाऱ्या स्वर्गाविषयीची जी एक तुच्छता व्यक्त होते, ती शेवटच्या 'थूः' या एका शब्दाच्या विशिष्ट उच्चारातून. सुर्वे यांच्या कवितेत अशी कितीतरी उदाहरणे दाखविता येतील.

सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेत उच्चारांच्या मोडणीला असणारे हे महत्त्व लक्षात घेण्याच्या दृष्टीने विशिष्ट शब्दांची पुनरावृत्ती हो णाऱ्य कविता अधिक महत्त्वाच्या आहेत. 'माझे विद्यापीठ' या संग्रहातील 'कठीण होत आहे' ही कविता पाहा–

दररोज स्वतःला धीर देत जगणे; कठीण होत आहे
किती आवरावे आपणच आपल्याला; कठीण होत आहे
भोकांड पसरणाऱ्या मनास थोपटीत झोपवून येतो
भूसा भरलेले भोत दिसूनही; थांबणे; कठीण आहे
तडजोडीत जगावे. जगतो; दररोज कठीण होत आहे
आपले अस्तित्व असूनही नाकारणे; कठीण होत आहे.
समजून समजावतो, समजावूनही नच मानलो
कोठारात काडी न पडेल, हमी देणे; कठीण होत आहे.

या कवितेतील 'कठीण होत आहे' या शब्दांच्या उच्चारांच्या वेगवेगळ्या मोडणीतून असहाय्यता, उद्वेग, चीड, संताप, अशा विविध छटा व्यक्त होण्यासारख्या आहेत. पहिल्या दोन ओळींतील 'कठीण होत आहे' मधून एक असहायतेची जाणीव व्यक्त होते. चौथ्या ओळीतील 'कठीण आहे' या शब्दप्रयोगातून त्या असहायतेच्या जाणीवेतील तीव्रता जाणवते; तर पुढील 'कठीण होत आहे' या शब्दांच्या पुनरावृत्तीतून उद्वेग, संतापाच्या छटा तीव्र होत जातात. अखेरच्या 'कठीण होत आहे' या शब्दांतून तर धुमसणाऱ्या सामर्थ्याचाच हुंकार जाणवतो. 'कठीण होत आहे' या एका शब्दप्रयोगाच्या उच्चा-

रांच्या मोडणीतूनच या कवितेत ही भावसूचकता आली आहे. 'माझे विद्यापीठ' याच संग्रहातील 'बरं का रे पोरा...' या कवितेतील 'बरं का रे पोरा...' या शब्दांची होणारी पुनरावृत्ती अशीच पहाण्यासारखी आहे. 'जाहीरनामा' या संग्रहातील 'एका नव्या संघर्षात' या कवितेतील 'तर काय करावे' या शब्दांची होणारी पुनरावृत्तीही उच्चारांच्या मोडणीमुळेच भावसूचक होणारी आहे.

भाषा ही मूलतः बोलण्यासाठीच असल्यान शब्दांच्या नादाची जाणीव कोणत्याही कवीच्या चांगल्या कवितेत असतेच. विशिष्ट शब्द विशिष्ट पद्धतीने उच्चारले तर त्यातील भाव अधिक समर्थपणे व्यक्त होतात हे कवितेच्या संदर्भातील सार्वत्रिक सत्य आहे. तथापि, सर्वच कवींच्या काव्यात उच्चारांच्या मोडणीला इतके महत्त्व नसते. उदा. कुसुमाग्रजांच्या 'बळी' या कवितेतील–

मानवांच्या संस्कृतीची काय लागे ही ध्वजा
तीस कोटी दैवतांच्या की दयेचे हे मढे !

या ओळींमध्ये उपरोध आहे. उच्चारांच्या विशिष्ट मोडणीतून तो तीव्र होईल हेही खरे आहे. परंतु उपरोध जाणवण्यासाठी उच्चारांची मोडणी अपरिहार्य नाही. तो त्या शब्दरचनेतच सामावलेला आहे हे सहज लक्षात येण्यासारखे आहे. परंतु 'सारस्वतांनो ! थोडासा गुन्हा करणार आहे' या ओळीतील उपरोधिक छटा अशी शब्दरचनेत सामावलेली नसून, ती त्या शब्दांच्या उच्चारांच्या मोडणीत सामावली आहे हे लक्षात येते. अनेक कवितांना संगीताची जोड देणे शक्य असले, तरी भावगीतातील काव्यार्थाचे प्रकटीकरण संगीताच्या साथीमुळे अधिक प्रभावी होते असे म्हणतात; त्याचप्रमाणे सुर्वे यांच्या कवितेची भाषा उच्चारांच्या मोडणीमुळे अधिक समर्थ होते. एवढेच नव्हे, कवितेतील अनुभव या उच्चारांच्या मोडणीमुळे अधिक समृद्ध होतात. उदासीनता, त्वेष, गांभीर्य, हळू-

वारपणा, असहाय्यता असे विविध भाव सुर्वे यांच्या कवितेतील केवळ शब्दांतून नव्हे तर त्या शब्दांच्या उच्चारांच्या मोडणीतून प्रत्ययाला येतात. म्हणून सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेचे ते एक महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते.

नेहमीची बोलण्याची भाषा अशा उच्चारांच्या मोडणीमुळेच वैशिष्ट्यपूर्ण ठरत असते. बोलण्याच्या भाषेतील जिवंतपणा व सर्जनशीलता त्यामध्येच सामावलेली असते. सुर्वे यांनी आपल्या कवितेच्या भाषेत बोलण्याच्या भाषेतील या वैशिष्ट्यांचा अतिशय समर्थपणे उपयोग करून घेतला आहे. त्यांच्या कवितेची भाषा कवितेच्या रूढ भाषेहून वेगळी वाटण्याचे ते एक महत्त्वाचे कारण आहे.

उच्चारांची मोडणी हे सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेचे एक वैशिष्ट्य असले, व कवितेच्या रूढ भाषेहून सुर्वे यांच्या कवितेची भाषा वेगळी वाटण्याचे ते एक कारण असले, तरी ते एकमेव कारण नाही. सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेत जसा बोलण्याच्या भाषेचा ढंग आहे, तसेच बोलीभाषेचे रंग आहेत. 'ऐसा गा मी ब्रह्म' या संग्रहानंतरच्या सुर्वे यांच्या कवितेत अनेकदा बोलीभाषा आलेली दिसते. 'माझे विद्यापीठ' या कवितेतील याकूब, चंद्रा व आफ्रिकन चाचा या तीनही व्यक्ती बोलीभाषेमधूनच जिवंत झाल्या आहेत.

'ले, पकड रस्सी-हां, खेच डरता है ? क्या बम्मनका बेटा है रे तू साले मजदूर है अपन, पकड घोडे को, हां, यह, बाह रे मेरे छोटे नालवाले

किंवा **'अपने को कालाकांडी तेरे को जलेबी खा.'**

या याकूबच्या भाषेतूनच याकूबची व्यक्तिरेखा जिवंत होते. त्याचा उमदा स्वभाव, लहान मुलाविषयीचा त्याचा कौतुकाचा भाव, मुलाविषयी याकूबच्या मनात असणारी वात्सल्याची भावना हे सारे याकूबच्या शब्दांमधूनच सूचित होते. 'खडे आसारे माझो झील, ह्या मेरेर का त्या रे' या चंद्राच्या प्रश्नातून तिच्या मनातील भावांचे दर्शन घडते.

आफ्रिकन चाचाच्या 'काम नही करेगा' या ठाम शब्दांमधून अन्यायाविरुद्ध घुमसणारे त्याचे मन व्यक्त होते. 'नेहरू गेले तेव्हाची गोष्ट' या कवितेतील -

'आज लोबन मत जला! नेहरू गये!'
'सच, तो चलो आज छुट्टी!'

या संवादामुळे नेहरू गेले या घटनेसंबंधीचे वेश्यांच्या जगातील भाव व्यक्त होतात. 'पाणी घे–' या कवितेतून वेश्यांच्या जगाचे दर्शन घडते ते बोलीभाषेच्या उपयोजनातूनच. 'पोष्टर' ही कविता बोलीभाषेमुळेच प्रत्ययकारी झाली आहे. 'जाहीरनामा' या संग्रहातील 'शीगवाला' ही कविता दाऊदचाचाच्या बोलीभाषेतून प्रकट झाली आहे. हिंदी-उर्दू मिश्रित अशा मराठी भाषेमुळे या कवितेतील दाऊदचाचाची व्यक्तिरेखा जिवंत होत आहे. 'कार्ल मार्क्स' या कवितेतील–

जामकीअक्का म्हणाली 'वळिखलंस याला
ह्यो आमचा मार्कसबाबा ....'

हा भाग बोलीभाषेचे रंग दाखविणाराच आहे. किंवा 'तुमच्या त्या उदास रात्री आता मला नकोत' या कवितेत येणारा—

'जिवबा रे.... जागरणा रे कितीसी करतल्हस'
'हां हां आग खावान् इंगळे हगणारे आमी
आमका असल्यो गजाली नको; हां.'

हा संवाद बोलीभाषेतच आला आहे.

एकंदरीत संवादासाठी बोलीभाषेचा होणारा वापर हे सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेचे एक सहज जाणवण्यासारखे वैशिष्ट्य आहे.

परंतु सुर्वे यांच्या कवितेत बोलीभाषा ही संवादासाठीच आली आहे. तथापि, बोलीभाषेबरोबरच बोलण्याच्या भाषेत योजले जाणारे अनेक शब्दप्रयोग सुर्वे यांच्या कवितेत सतत पाहावयास मिळतात.

हिंदी-उर्दू भाषेतील अनेक शब्द त्यांच्या कवितेत वारंवार येतात. उदा. ('भेटला हरेक रंगात माणूस,' 'एक आम्हीच असे निघालो वेइमान झालो नाही,' 'स्वतःलाच शोधण्यात अर्धी उमर हरवून बसलो,' 'उगीच कुणाला सलाम ठोकणे जमलेच नाही' 'हमेशाच जमवून घेणे कठीण गेले,' 'झूठ बोलून आयुष्य कुणालाही सजवता येते' 'प्रयोग करणारे तेव्हा खुशहालीतले असतील' इ.) हे शब्दप्रयोग म्हणजे बोलीभाषेतले शब्दप्रयोग नाहीत. परंतु कष्टकऱ्यांच्या बोलण्याच्या भाषेत असे शब्द-प्रयोग येतात हेही तितकेच खरे आहे. या अशा शब्दप्रयोगांबरोबरच सुर्वे यांच्या कवितेतील अनेक शब्दांची रूपे बोलण्याच्या भाषेतील असतात.

उदा० **'झपाझप उचलीत पाय**
मागे वळून बघीत जाय'

'छान पाऊस पडतोय
पुन्हा त्यात भिजूया....नंतर
किमान आपापली वळचणी आहेतच आपल्याला'

'सर्व काही नाकारून माझे शब्द केव्हाच निघालेत.'
'सव्वीसाव्या पानावर गुलाबाचे फूल ठेवून
मी सुरुवात करतोय....'

सुर्वे यांच्या कवितेत येणारे बोलण्याच्या भाषेतील शब्दप्रयोग व ही शब्दरूपे म्हणजे बोलण्याच्या भाषेच्या लकबी होत. या अशा लकबींचा सुर्वे यांच्या कवितेत सतत आढळ होतो.

म्हणूनच वस्तुतः बोलण्याची भाषा नसूनही, कवितेच्या भाषेतील आघात, उच्चारांची मोडणी व बोलण्याच्या भाषेच्या विविध लकबी यामुळे सुर्वे यांच्या 'कवितेची भाषा' बोलण्याच्या भाषेचा सतत अनुभव देत राहते.

सुर्वे यांच्या कवितेतील कल्पना, प्रतिमा या देखील निरीक्षण करण्यासारख्या आहेत. आपल्या कवितेतील प्रतिमांविषयी बोलताना

सुर्वे यांनी स्वतः म्हटले आहे 'प्रतिमा मात्र मी आजूबाजूच्या वातावरणातून व स्वतःच्या अनुभवातून उचलल्या आहेत. ज्या प्रतिमांमधून बोलकेपणा असेल, सजीवता असेल आणि ज्या त्या कवितेच्या विकासाला जिवंत आकार देतील त्याच प्रतिमा मी निवडतो. माझे जग एवढे सजीव, निर्मितीक्षम व संपन्न आहे की ह्या जगात मला अफाट प्रतिमा दिसतात.' कवितेतील प्रतिमा विषयीच्या या निवेदनाची साक्ष सुर्वे यांच्या कवितेत पदोपदी पटण्यासारखी आहे. कवितेतील प्रतिमा हा कवीचा अनुभव असल्यामुळे सर्वच चांगल्या कवींची प्रतिमासृष्टी त्यांच्या भोवतालच्या वातावरणातून निर्माण होत असली तरी, सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवाचे संदर्भविश्व असणारे बाह्य जग व त्यांचा अनुभव भिन्न असल्यामुळे साहजिकच त्यांच्या कवितेतील प्रतिमासृष्टी * रूढ मराठी कवितेतील प्रतिमासृष्टीहून भिन्न झाली आहे. या प्रतिमासृष्टीत तसा अपरिचितपणा नाही. भोवतालच्या दैनंदिन जीवनातील अनेक परिचित घटक, घटना, अनुभव यांनाच सुर्वे यांच्या कवितेत भावदर्शक प्रतिमांचे रूप येते. उदा—

आईची मायाच समजून
घेतली चादर ओढून ('माझी आई,')
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली. (दोन दिवस)
मन ढोर झाले होते घराजवळ येऊन भानावर आलो. (पाहुणे)
लुटुलुटु चालणारी ती
पाडसे सोबती घेऊन (थोडी ठेव)
प्रकाशाचे छाटून हात
अंधार खाई दूधभात (आज मला उसंत नाही)

---

* वस्तुतः सुर्वे यांच्या कवितेत काटेकोर अर्थाने प्रतिमा कमी आहेत. उपमा, रुपके, प्रतीके यांची निर्मिती अधिक आहे. परन्तु प्रस्तुत विवेचनात कवीची कल्पकता व्यक्त करणाऱ्या या सर्व प्रकारांना उद्देशून प्रतिमासृष्टी असा शब्दप्रयोग केला आहे.

आवडीने रांधलेला भात
खावयास मी नसेन घरात (थरकु नको)
ह्या कथा : कढ आलेल्या भाताने अलगत झाकण उचलावे तशा
उचलतात,
रात्रभर उबळणाऱ्या अस्थम्यासारखा अख्खा जीव हल्लक करून
सोडतात. (माझे विद्यापीठ)

त्या रात्री पापण्या मिटत नाहीत. काळोख कोरीत जीव जळत रहातो.
चुलाण्यात फटफटावे लाकुड तसा आत्मा चरफडू लागतो (मुंबई)

इथल्या वस्त्यांना हुंगणारा केवळ कातळाचा काळोख
कंदील खोपटास खोवून वावरू नये; तर काय करावे ?
(एका नव्या संघर्षात)

या उदाहरणातील ' चादर ' ' भाकरीचा चंद्र ' ' ढोर ' ' पाडसे ' ' दूधभात ' ' आवडीने रांधलेला भात ' ' कढ आलेल्या भाताने अलगद् उचलणारे झाकण ' ' चुलाण्यात फटफटणारे लाकुड ' ' खोपटास खोवलेला कंदील ' या प्रतिमा पाहिल्या तर त्या रूढ अर्थाने काव्यपूर्ण म्हणावे अशा नाहीत. परंतु कष्टकऱ्यांच्या जीवनानुभवाशी संबंधित अशा या प्रतिमांमधून होणारे भावदर्शन लक्षात घेतले म्हणजे काव्यदृष्ट्या त्यांचे असणारे सामर्थ्य लक्षात येते. ' चादर ' या प्रतिमेतून वात्सल्याच्या उबदारपणाचा जो भाव व्यक्त होतो त्यामुळे ही प्रतिमा काव्यपूर्ण होतेच; परंतु त्याच बरोबर यापूर्वी येणाऱ्या–

' त्याच रात्री आम्ही पांचांनी
एकमेकांस बिलगुनी
आईची मायाच समजून '

या ओळी लक्षात घेतल्या तर भेदरलेपण, अगतिकता यांच्या संदर्भाने ' चादर ' या शब्दाला कितीतरी अर्थपूर्णता आलेली जाणवते आणि या सर्वांमधून आईच्या मृत्यूने निर्माण झालेली मनःस्थिती कष्टकऱ्यांच्या जगाचा संदर्भ घेऊन व्यक्त होते. ' भाकरीचा चंद्र '

या साध्या प्रतिमेतील चंद्र या कल्पनेशी निगडित असणारे काव्य-जगतातील मृदुभाव व भाकरीच्या उल्लेखामुळे व्यक्त होणारा कष्टकऱ्यांच्या जीवनातील भुकेच्या वेदनेचा भाव या दोहोंच्या ताणातून जी तीव्र जाणीव व्यक्त होते त्यामुळे ही प्रतिमा कष्टकऱ्यांच्या जीवनातील वेदनेचा एक तीव्र अनुभव देण्यास समर्थ होते. याशिवाय भाकरी आणि चंद्र या दोन कल्पनांना एकत्र आणल्याने रूढ अर्थाने सुंदर नसणाऱ्या भाकरीला सौंदर्याचे वरदान मिळते ते वेगळेच. 'लुटु लुटु चालणारी ती पाडसे सोबती घेऊन' या ओळीमधून गोंडस मुलांचे, एक वात्सल्यपूर्ण गतिमान चित्रच डोळ्यांपुढे उभे राहाते.

'प्रकाशाचे छाटून हात । अंधार खाई दूधभात'

या ओळीतील अमानुषता व निरागसता यांच्यातील विरोधामुळे त्या अर्थपूर्ण होतात हे खरे; परंतु 'दूधभात' या घरगुती प्रतिमेतून निरागसतेचा प्रत्यय अधिक उत्कट होतो. 'आवडीने रांधलेला भात' या उल्लेखामुळे घरगुती जिव्हाळ्याच्या भावनेचा जो प्रत्यय येतो त्यामुळे हा शब्दसमूह एक भावदर्शक प्रतिमाच ठरतो. अशा जिव्हाळ्याचा प्रत्यय देणारे 'मला भरपूर वाढून स्वतः अर्धपोटी राहून' किंवा 'पदराने घाम टिपताना नजरेला नजर भिडते' असे अनेक उल्लेख सुर्वे यांच्या कवितेत येतात. आणि हे साधे घरगुती अनुभव कष्टकऱ्यांच्या जगातील प्रेमभावनेचा प्रत्यय देतात तेव्हा त्या भावनेच्या दर्शक प्रतिमांचेच रूप त्यांना आलेले असते. वर दिलेल्या उदाहरणातील 'कढ आलेल्या भाताने अलगद उचलले जाणारे झाकण' 'चुलाण्यात फटफटणारे लाकूड' किंवा 'खोपटास खोवलेला कंदील' या प्रतिमा पाहिल्या तर त्याद्वारे होणारे भावदर्शन कवितेच्या संदर्भात महत्त्वाचे असल्याचा प्रत्यय येतो. या प्रतिमा म्हणजे सुर्वे यांना जो अनुभव व्यक्त करावयाचा आहे त्याची सजावट नव्हे तर या प्रतिमा म्हणजे त्यांच्या अनुभवाचा, जीवनविषयक जाणीवेचा एक अपरिहार्य

घटक आहे. कवितांतर्गत अनुभवाशी त्या प्रतिमा पूर्णपणे एकजीव झाल्या आहेत. दैनंदिन घरगुती अनुभवातून निर्माण होणाऱ्या या अशा प्रतिमांमुळे सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवांना त्यांचा असा खास वेगळेपणा प्राप्त होतो. या प्रतिमांमुळेच कष्टकऱ्यांच्या भावजीवनाचे अनेक रंग सुर्वे यांच्या कवितेतून जाणवत राहतात.

या अशा घरगुती अनुभवांबरोबरच कष्टकऱ्यांशी संबंधित असे यंत्रयुगातील अनेक घटक सुर्वे यांच्या कवितेत भावदर्शनाचे कार्य करीत असतात. उदा.—

झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
(दोन दिवस, 'ऐसा गा मी ब्रह्म')

का नाही घेतले झोकवून स्वतःला जसे
झोकतो फायरमन फावडे इंजिनात. (माझे विद्यापीठ; माझे विद्यापीठ)

कळु आले तेव्हापासून डबा घेऊन साच्यावर गेलो
घडवतो लोहार हातोड्याला तसाच घडवला गेलो
(मुंबई, माझे विद्यापीठ)

हे आपले प्रचंड नगर
धडाडत्या बॉयलरसारखे...
(माझ्या देशाच्या नोंदवुकात माझा अभिप्राय 'जाहीरनामा')

हे आणि असे कितीतरी आठवून, अंतःकरणात
पेट्रोलसारखे साठवून चाललोत.
(माझ्या देशाच्या नोंदवुकात माझा अभिप्राय 'जाहीरनामा')

यांसारख्या काव्यपंक्तीतून याचा प्रत्यय येतो. इथेही या प्रतिमा रूढ अर्थाने काव्यपूर्ण नाहीत. परंतु ज्या संदर्भात त्या येतात तिथे त्यामधून अनुभवाची निर्मिती झाल्याचा प्रत्यय येतो. 'झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले' यामधून भोवतालच्या जीवनाची दाहकता व्यक्त होतेच, पण त्याचबरोबर त्या दाहकतेमुळे जीवनसंघर्षात सामर्थ्यही प्राप्त होते; हा भावही प्रकट होतो. कष्टकऱ्यांच्या जीवनातील केवळ वेदना नव्हे तर या वेदनामय जीवनाच्या गतिशील प्रक्रियेचा

अनुभव ही प्रतिमा देऊन जाते. शहराच्या संदर्भात येणाऱ्या 'धडाडत्या बॉयलरसारखे' या कल्पनेमुळे अजस्र शहराच्या पोटात उसळणाऱ्या सर्व असंतोषाचा भाव साक्षात् मूर्त होतो. अशा रीतीने कष्टकऱ्यांच्या जगाशी संबंधित असे हे यंत्रयुगातील घटक सुर्वे यांच्या कवितेत अनुभवदर्शक प्रतिमा होतात. परंतु या अशा प्रतिमा केवळ एवढाच प्रत्यय देत नाहीत तर आपल्या कवितेद्वारे सुर्वे ज्या वास्तवाची निर्मिती करीत आहेत; त्या वास्तवनिर्मितीला त्या उपकारक ठरतात.

या दृष्टीने सुर्वे यांच्या कवितेतील निसर्गही लक्षात घेण्यासारखा आहे. ज्याला निसर्ग कविता म्हणावे अशी कविता तर सुर्वे यांनी लिहिलेली नाहीच; परंतु सुर्वे यांच्या कवितेतील निसर्ग प्रतिमा पाहिल्या तर त्यामध्ये एक विलक्षण साधेपणा आहे असे जाणवते. तथापि, हा साधेपणाच जिवंत वाटतो व काहीवेळा मनाला भारावून टाकतो. तारे, वारे, ऋतु, सूर्य, चंद्र इ. चा सुर्वे यांच्या कवितेत अनेकदा आढळ होतो. सौंदर्य, काव्य, मृदुभाव यांचा दर्शक म्हणून कवितेत चंद्र येतो, तर भविष्यकाल, तेज, सामर्थ्य यांचा दर्शक म्हणून सूर्य त्यांच्या कवितेत येताना दिसतो. (सूर्य ही प्रतिमा या अर्थाने व इतक्या विपुलतेने सुर्वे यांच्याच कवितेत प्रथम येत असावी.) तारे, वारे, ऋतु या सर्व केवळ मुक्त मोकळ्या सौंदर्याच्या दर्शक प्रतिमा म्हणून सुर्वे यांच्या कवितेत येतात. म्हणजे निसर्गसौंदर्य व्यक्त करणे, किंवा अपरिचित सूक्ष्म भावच्छटांचा प्रत्यय देणे हे कार्य सुर्वे यांच्या कवितेतील निसर्ग करीत नाही, तर या निसर्गप्रतिमाही मानवी भावांचाच प्रत्यय देतात आणि त्यामुळेच सुर्वे यांच्या कवितेला एकप्रकारचा खुलेपणा प्राप्त होतो. निसर्गातील एकाद्या साध्या अनुभवातून सुर्वे कसा मानवीभाव व्यक्त करतात हे पाहायचे असेल तर उदाहरण म्हणून–

कोंडवाड्यात कोंडलेला आपला सोनेरी देश
पानाफुलांनी ही पालखी सजवीत असेल

खळखळत फुटत राहिल हास्य झुंडीचे
नुकतीच सर झडावी अशा आपलेपणाचे
(जर तुम्हाला, माझे विद्यापीठ)

या ओळी पाहाव्यात. येथे पावसाच्या सरीचा उलेख आहे. झुंडीचे हास्य व पावसाची प्रसन्न सर यामधील समतानतेमधून झुंडीच्या हास्यातून प्रसन्न मोकळेपणाचा भाव प्रकट होतो तर पावसाच्या सरीला एकप्रकारचे मानवीपण प्राप्त होते. या प्रक्रियेमुळे ही साधी प्रतिमा काव्यात्म अनुभव देण्यास समर्थ होते. सुर्वे यांच्या कवितेतील निसर्ग प्रतिमांच्या संदर्भात नेहमी असे घडत असल्याचा प्रत्यय येतो. म्हणूनच या प्रतिमांचा साधेपणा जाणवण्यापेक्षा त्यांचे कवितेच्या संदर्भातील सौंदर्यच अधिक जाणवते.

सुर्वे यांच्या कवितेत येणारे निसर्गातील रंग पाहिले तर तेही अगदी साधे आहेत असे जाणवते. 'ऐसा गा मी ब्रह्म' या संग्रहातील 'क्षणात जिंकीन' या कवितेत 'माझ्या मायदेशी यावेच सर्वांनी' हे सांगत असताना सुर्वे यांनी जे महाराष्ट्राचे वर्णन केले आहे त्यातील काही ओळी या संदर्भात पहाण्यासारख्या आहेत. तिथे सुर्वे यांनी लिहिले आहे

'नटली नगरी
रंगाने गडद'

महाराष्ट्राच्या वर्णनात आलेले हे शब्द सुर्वे यांच्या कवितेच्या संदर्भातही खरे आहेत. त्यांच्या कवितेत फिक्या रंगांच्या विविध छटा येत नाहीत. येतात ते गडद रंग. उदा.

नटलं शिवार अवंदा हळदीवानी जार (सराई, ऐसा गा मी ब्रह्म !)
हिरव्या पिवळ्या डोंगरी माथा
खेटून झुलते आकाश फूल (धरती महाराष्ट्राची, ऐसा गा मी ब्रह्म)
नटली नगरी
रंगाने गडद
पिवळ्या शेतांची

लावून हळद क्षणात जिंकिन, (ऐसा गा मी ब्रह्म)
उनाड पोराने कलंडावी दौत तसा हा निळा सागर
(मुंबई, माझे विद्यापीठ)

ही नगरातून उभी राहिलेली महानगरे
त्यांची उघडझाप करणारी अंधार उजेडाची दारे
सभोवारची हिरवीगार खेडी
(माझ्या देशाच्या नोंदवुकात माझा अभिप्राय, जाहीरनामा)

या गडद रंगातून एक सजीवतेचा प्रत्यय येतो हे एक आणि या डोळ्यात भरणाऱ्या रंगांनी कवितांतर्गत अनुभवाला वेगळेपणा येतो हे दुसरे, यामुळे सुर्वे यांच्या कवितेत येणारे हे मोजके रंगही वैशिष्ट्यपूर्ण ठरतात. या रंगांचा सुर्वे यांच्या जाणीवेशीही संबंध आहे. त्यांच्या कवितेतील आशावादी वृत्तीशी हे रंग संवादी होतात. आणि त्यामुळेच कवितांतर्गत वास्तव निर्मितीत ते अर्थपूर्ण ठरतात.

सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेचे हे स्वरूप पाहिले म्हणजे मराठी कवितेच्या रूढ भाषेहून ते कसे वेगळे आहे हे स्पष्ट होण्यासारखे आहे. अनेक ठिकाणी ही कवितेची भाषा आहे असे जाणवूही नये इतकी ती साधी वाटते. ज्यांना सुंदर शब्द म्हणावे असे शब्द सहसा या भाषेत येत नाहीत. नादानुकूलता, चमत्कृती, सहज जाणवण्यासारखी कल्पकता हे या भाषेचे सामर्थ्य नाही. परंतु असे असूनही ती काव्याचा अनुभव देण्यास समर्थ होते हे 'भाषेचे' वेगळेपण आहे. व्यवहारातील साधी भाषा व कवितेची कल्पक भाषा हे द्वंद्व या 'भाषेने' जणू मिटवून टाकले आहे. व्यवहारातील साध्या भाषेच्या जिवंतपणाचा, निर्मितीशीलतेचा प्रत्यय देणारी अशी ही 'भाषा' आहे. 'भाषेच्या' या वेगळेपणामुळेच सुर्वे यांची कविता आपल्या वैशिष्ट्यपूर्ण अनुभवांची प्रतीती वाचकाला देऊ शकते.

ही कविता वाचीत असताना वा ऐकत असताना आपण कविता वाचीत वा ऐकत आहोत अशी जाणीवही अनेकदा होत नाही. सुर्वे यांच्या कवितेचे हे वेगळेपण आहे. सर्वच कवींच्या कवितेच्या संदर्भात

असा अनुभव येत नाही. तेथे कवितांतर्गत अनुभवाकडे वाचक दुरून पहात असतो. तो अनुभव आपल्याला अप्राप्य आहे, तो कवीचा, केवळ कवीला येणारा व त्यामुळे कवितेतच अनुभवाला येणारा असा अनुभव आहे असे वाचकाला कुठेतरी जाणवत असते. या अर्थाने तो अनुभव अ-लौकिक वाटत असतो. उदा. बालकवींच्या कवितेतील निसर्गसौंदर्याचा अनुभव हा अ-लौकिक आहे असे जाणवत असते. बालकवींसारखी तीव्र संवेदनक्षमता असणाऱ्या कवीमनालाच तो शक्य आहे हे वाचक विसरु शकत नाही. परिणामी त्या सौंदर्याला दिलेला प्रतिसाद हा अ-लौकिक सौंदर्याला दिलेला प्रतिसाद ठरतो. मर्ढेकर यांच्या कवितेतील बौद्धिकताही वाचकाला अनेकदा असेच भारावून टाकते. तिथेही मर्ढेकर आणि त्यांच्या कवितेचे वाचक यांच्यातील अंतर कायम राहाते. या अर्थाने कवी व कविता यांच्या संदर्भात कवितांतर्गत अनुभव अ-लौकिक भासत असतो. कवींचे काव्यरचना कौशल्य, भाषेची वैशिष्ट्यपूर्णता, कल्पकता यांसारख्या काव्यांतर्गत वैशिष्ट्यांमुळे असे घडत असते. सुर्वे यांची कविता वाचत असताना वेगळा प्रत्यय येतो. बोलण्याच्या भाषेचा आभास, दैनंदिन घरगुती प्रतिमा, साधा खुला रसरशीत निसर्ग या त्यांच्या 'कवितेच्या भाषेच्या' वैशिष्ट्यांमुळे सुर्वे यांची कविता वाचकाशी सरळ संवाद करते. कविता वाचण्याच्या प्रक्रियेत कवी व वाचक एकाच पातळीवर आल्यासारखे वाटतात. परिणामी कवीच्या अस्तित्वाची स्वतंत्र जाणीव रहात नाही. सुर्वे यांच्या कवितेतील अनुभव अलौकिक, आपल्या जाणीवेच्या कक्षेपलिकडे आहेत असे वाचकाला वाटत नाही. कवितांतर्गत अनुभवातून सतत आपल्या भोवतालच्या वास्तवाचा उबदार स्पर्श जाणवत रहातो. दैनंदिन जीवनानुभवानाच एकप्रकारचे सौंदर्य प्राप्त झाल्यासारखे वाटते. आणि ही कविता सरळ प्रत्यक्ष जीवनाशी नाते जोडून वैशिष्ट्यपूर्ण होते. याचा अर्थ यांच्या कवितेमुळे प्राप्त होणारा अनुभव लौकिक

असतो किंवा सुर्वे यांच्या कवितेतील कवीचे व्यक्तिमत्व सामान्य माणसासारखे आहे असा नाही. वाचक व कवी यांच्यातील अंतर सुर्वे यांच्या कवितेतही आहेच. त्यांच्या कवितेतील अनुभव कवीमनाचे व म्हणूनच वैशिष्ट्यपूर्ण आहेत. म्हणून कविता वाचत असताना तसे न जाणवणे हा एक आभासच आहे. सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेमुळे हा आभास निर्माण होतो एवढेच. सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेमुळे हे असे घडते. या भाषेमुळेच कष्टकऱ्यांच्या जगाच्या वास्तवाचा स्पर्श त्यांच्या कवितेतून जाणवत रहातो. (सुर्वे यांच्या अनुभवाला वेगळेपणा येण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे) या जगाचा रसरशीत राकटपणा व त्याचबरोबर या जगातील मृदु भाव यांच्या तोलदार दर्शनाचा प्रत्यय सुर्वे यांची कविता देऊ शकते. या भाषेच्या संथ, गद्य लयीतून या जगाचा साधा सरळपणा तर प्रतीत होतोच पण त्याचबरोबर या जगाच्या सामर्थ्याचा, त्यांच्या जीवन जगण्याच्या व वेदना सहन करणाच्या सहनशीलतेचा प्रत्यय ती देत रहाते. सुर्वे यांच्या कवितेत हळूवार भावनात्मकता व तीव्र वेदना असूनही त्यांची कविता हळवेपणाकडे सहसा झुकत नाही. याचेही कारण सुर्वे यांच्या कवितेच्या या 'भाषा'-वैशिष्ट्यातच सामावले आहे. संघर्षशील वृत्तीमुळे कवितांतर्गत अनुभवात स्फोटकता येत असली तरी त्या स्फोटकतेला तोलणाऱ्या माणुसकीचा स्पर्श त्यांच्या कवितेत सतत जाणवत राहतो, याचेही रहस्य सुर्वे यांच्या 'कवितेची भाषा' हेच आहे. एकापरीने कणखर पण लोभस, आक्रमक पण संयमित, स्फोटक असूनही पूर्णपणे मानवी, सुंदर व हळूवार असूनही सहज व स्वाभाविक असे त्यांच्या कवितेचे व्यक्तिमत्व त्यांच्या कवितेच्या भाषेने निर्माण केले आहे.

एका स्तरावर दैनंदिन वास्तवाशी नाते ठेवून पुन्हा व्यवहारातील भाषेहून वेगळे होण्याची व अर्थपूर्ण अनुभवांची निर्मिती करण्याची जी क्रिया या 'भाषेतून' प्रत्ययाला येते त्यामध्येच या 'भाषेचे' व सुर्वे यांच्या कवितांतर्गत अनुभवाचे वैशिष्ट्य सामावले आहे.

चार

'ऐसा गा मी ब्रह्म' हा संग्रह डिसें. १९६२ मध्ये प्रकाशित झाला असला तरी 'मी काव्यलेखनास सुरुवात केली ती १९५८ साली' असे श्री. सुर्वे यांनीच म्हटले आहे.[१] आपण प्रथम गाणी लिहायला सुरुवात केली. 'डोंगरी शेत माझं' हे गाणं म्हणजे माझं पहिलं काव्यलेखन. ते मी १९५४ मध्ये लिहिलं...पण गाण्यात मी रमलोच नाही. कविता लिहायला खरी सुरुवात १९५८ नंतर झाली.' असेही श्री. सुर्वे यांचेच निवेदन आहे.[२] म्हणून १९५४ हा सुर्वे यांच्या लेखनाचा प्रारंभकाल मानायला हवा. १९५४ पासून आजतागायत २७ वर्षे सुर्वे आपल्या संथगतीने काव्यलेखन करीत आहेत. सातत्याने काव्यलेखन करणाऱ्या कवीच्या कवितेत काही बदल होणे स्वाभाविकच असते. कवीचे अनुभवविश्व विस्तारणे शक्य असते; कवीच्या जाणीवा प्रगल्भ होण्याची शक्यता असते. एवढेच नव्हे तर आपल्या अनुभवांच्या नेमक्या आकलनामुळे प्रतिमासृष्टी, शब्दरचना यामध्येही बदल होण्याची शक्यता असते. म्हणजेच काळाच्या ओघात खऱ्या कवीची कविता कोणत्या ना कोणत्या प्रकारे बदलत असते. १९५४ पासून आजपर्यंत काव्यलेखन करणाऱ्या सुर्वे यांच्या कवितेच्या संदर्भात असे काही घडले आहे का? जर घडले

---

१. 'कविता आणि मी' जाहीरनामा, पृ. ५५

२. 'चौकशा' ललित, मार्च १९७२,

असेल तर त्याची दिशा कोणती? याचा शोध त्यांच्या कवितांच्या आधारे घेता येणे शक्य आहे. आणि त्यामधून येणाऱ्या निष्कर्षांच्या आधारे सुर्वे यांच्या कवितेसंबधी काही विधाने करणे शक्य होणार आहे.

'डोंगरी शेत माझं' हे सुर्वे यांचे पहिले गाणे १९५४ मधले आणि त्यांच्या काव्यलेखनाची सुरुवात १९५८ नंतर हा क्रम पाहिला म्हणजे १९५४ ते १९५८ या काळात सुर्वे यांनी गाण्यांची रचना केली असावी असे म्हणता येते. यापैकी काही गाणी 'ऐसा गा मी ब्रह्म'मध्ये संग्रहित झाली आहेत.

गाणे आणि कविता यांचा एकत्र विचार करताना कवितेच्या तुलनेत गाण्यांना दुय्यम समजून विचार करता येतो. गाण्यांची रचना कृत्रिम असते. त्यांची निर्मितीप्रक्रिया कारागिरीला जवळ असते असे समजून गाणी आणि कविता यामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठता दाखविता येते. साहजिकच गाण्यांकडून कवितेकडे हा प्रवास विकासाचा दर्शक ठरतो. या दृष्टीने सुर्वे यांच्या गाण्यांकडे पाहिले तर या गाण्यांमधून अनुभव संघटित करण्यापेक्षा विशिष्ट आवाहन करण्याकडे कवीचे अधिक लक्ष आहे (उदा. 'डोंगरी शेत,' 'सराई') किंवा शब्दरचना व त्यामधून निर्माण होणाऱ्या रंजकतेकडे कवी अधिक लक्ष पुरवीत आहे (उदा. 'मेघ बरसे,' 'गाडी आणा बुरख्याची' आणि म्हणून त्या अक्षरशः रचना आहेत असे म्हणता येईल. १९५४-५८ काळातील या रचना म्हणजे काव्यलेखन नव्हे असे सुर्वे यांनीच सुचविले आहे. 'कवितेच्या मागे सतत जागृत मन असते. त्या मनाच्या घालमेली असतात' या सुर्वे यांच्या काव्यविषयक कल्पनेनुसार ही गाणी म्हणजे खरी कविता नव्हे, हे अगदी खरे आहे. म्हणूनच या गाण्यांकडून खऱ्या काव्यलेखनाकडे वळणे, आपल्या जाणीवेतून जगाकडे पहात वेगळ्या अनुभवविश्वाची निर्मिती करण्याचा प्रयत्न करणे हा बदल म्हणजे सुर्वे यांच्या काव्यलेखनाच्या प्रवासातील विकासदर्शक बदल ठरतो.

परंतु सुर्वे यांच्या लेखनात झालेल्या बदलाकडे एका वेगळ्या दृष्टीनेही पहाता येणे शक्य आहे. गाणे आणि कविता यामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठभाव कल्पिण्यापेक्षा त्या दोन भिन्न प्रकारच्या निर्मिती आहेत असे मानणे अधिक योग्य ठरेल. गाण्यांच्या रचनेत शब्द स्वरांच्या अनुषंगाने येत असतात. गाणे ही स्वरांच्या माध्यमातून केलेली निर्मिती असते. उलट कवितेत शब्द हेच सर्वस्व असते. सुर्वे यांचा कलापथकांशी व लोककलांशी संबंध आल्याने त्यांनी प्रथम गाणी लिहायला सुरुवात केली. या गाण्यातील शब्दरचना स्वरानुकूल आहे. ही रचना कनिष्ठ प्रकारची नव्हे तर वेगळ्या प्रकारची आहे. या रचनेतही सुर्वे यांच्या स्वाभाविक सौंदर्यदृष्टीचा प्रत्यय येण्यासारखा असला (उदा. गाण्यातील निसर्ग), कष्टकऱ्यांच्या वेदनेशी सहकंप होण्याच्या त्यांच्या वृत्तीचा परिचय होण्यासारखा असला, किंवा 'गिरणीची लावणी' सारख्या रचनेतून त्यांच्या कवीमनाच्या कल्पकतेचे दर्शन घडण्यासारखे असले, तरी या रचना म्हणजे कविता आहेत असे समजून विचार करणे योग्य होणार नाही. ती गाणी आहेत. म्हणून गाणे ही देखील वेगळ्या प्रकारची निर्मिती आहे हे लक्षात घेऊन या रचनांचा विचार करायला हवा. या दृष्टिकोनातूनच या गाण्यातील शाहिरी ढंगाच्या शब्दरचनेचे सौंदर्य आकलन होऊ शकेल. गाण्यातील शब्द स्वरांसाठी येत असतात असे म्हटले म्हणजे गाण्यात निर्मितीचे माध्यम स्वर असतात असे म्हणायला हवे. आणि गाण्यांच्या रचनेकडून कवितेकडे वळणे म्हणजे एका माध्यमाकडून दुसऱ्या माध्यमाकडे वळणे म्हणायला हवे. या दृष्टीने १९५४ ते ५८ या काळात गाणी लिहिणारे सुर्वे १९५८ नंतर काव्यलेखनाकडे वळले; याचा अर्थ त्यांनी आपल्या निर्मितीचे माध्यम बदलले असा होतो. आणि या दृष्टीने सुर्वे यांच्या संदर्भातील हे एक महत्त्वाचे स्थित्यंतर ठरते.

या स्थित्यंतराचा प्रत्यय त्यांच्या 'ऐसा गा मी ब्रह्म' या

संग्रहात येतो. या संग्रहात एका माध्यमाकडून दुसऱ्या माध्यमाकडे वळण्याची कवीची धडपड सतत जाणवत राहते. या संग्रहातील कविता वाचीत असताना आपल्या भोवतालच्या जगाची व त्यातून निर्माण होणाऱ्या अनुभवांची जाणीव कवीला झाल्याचे दिसते. 'ऐसा गा मी ब्रह्म' या संग्रहाची सुरुवातच 'कामगार आहे मी तळपती तलवार आहे' अशी स्वतःची वर्गीय ओळख करून देत होते. एकापरीनें समष्टीशी एकरूप झालेल्या कवीमनाचा प्रत्यय या संग्रहातील पहिल्या कवितेपासून येऊ लागतो. परंतु आपल्या अनुभवांचे स्वरूप सुर्वे यांना पूर्णत्वाने आकलन झाले आहे असे या संग्रहातील सर्व कवितांकडे पाहताना वाटत नाही.

'ऐसा गा मी ब्रह्म' या संग्रहातील कवितांमध्ये दोन वृत्ती दिसतात. संग्रहातील काही कवितांमध्ये सुर्वे यांची भूमिका कामगार-वर्गाचे प्रतिनिधित्व करणारी आहे. 'युगस्वामी' 'आज मला उसंत नाही' 'इषारा' यांसारख्या कवितांमधील 'मी' म्हणजे केवळ व्यक्ती नसून, कामगारांचा प्रतिनिधी आहे. साहजीकच अशा कवितांमधून कामगारवर्गाच्या आशा-आकांक्षा कामगारवर्गेतर समाजाविषयीच्या प्रतिक्रिया यांना या कवितांमध्ये स्थान मिळालेले दिसते. या कवितांमध्ये कष्टकरी जगाच्या वास्तवाच्या काही छटा आहेत हे खरे असले तरी त्या वास्तवाची निर्मिती करण्यापेक्षा कष्टकऱ्यांच्या जगाचे विशिष्ट आशावादी रूप घडविण्याकडेच सुर्वे यांचे अधिक लक्ष आहे असे दिसते. या रूपाला कवितांतर्गत वास्तवात आधार मिळत नसल्यामुळे ते विशिष्ट विचारसरणीतून निर्माण झाल्यासारखे वाटते. साहाजिकच–

'श्वासाश्वासातून सुखाची मी पेरीन हमी
घडल्या जाणाऱ्या युगाचा मीच खरा स्वामी'

अशा प्रकारची ठाम विधानात्मकता या कवितांमधून जाणवते. अशा

कवितांमधून घोषणांची निर्मितीही होते. या कवितांमध्ये 'मी' आहे, स्वतःला काय वाटते ते व्यक्त करण्याचा सुर्वे प्रयत्न करीत आहेत हे खरे असले तरी कवीमनाचे 'वाटणे' आत्मनिष्ठ झालेले नाही. आणि म्हणूनच कवीला आपल्या अनुभवाचे स्वरूप पूर्णपणे आकलन झाले आहे असे या कवितांमधून जाणवत नाही.

याच बरोबर 'ऐसा गा मी ब्रह्म' या संग्रहात प्रासंगिक निमित्ताने लिहिलेल्या काही कविता आहेत. 'लुमुम्बास सलाम' खुलेल गोमंतक जनजीवन, भारतीय जवानाचे पत्र या कवितांचा या संदर्भात उल्लेख करता येईल. या प्रासंगिक कवितांच्या मागेही कवीमनाचा अनुभव दिसत नाही. विशिष्ट प्रसंगाच्या निमित्ताने निर्माण होणाऱ्या रूढ प्रतिक्रियांना दिलेले शब्दरुप असेच या कवितांचे स्वरूप आहे. 'ऐसा गा मी ब्रह्म' हा संग्रह १९६२ मधील. तेव्हा संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन कालदृष्ट्या नजीकचे आहे हे लक्षात घेतले, तर 'धरती महाराष्ट्राची' व 'क्षणात जिंकीन' या कवितांनाही प्रासंगिक म्हणता येईल. या कवितांमध्येही महाराष्ट्र प्रेमाच्या रूप प्रतिक्रियाच पहावयास मिळतात. सुर्वे यांच्या पहिल्या संग्रहातील या कविता म्हणजे गाण्यांकडून कवितेकडे वळविण्याची धडपड आहे. परंतु या रचनांना खऱ्या कवितेचे रूप मात्र प्राप्त झालेले नाही. अशा कवितांमधून कवीच्या व्यक्तिमत्त्वाचे खरे दर्शन घडत नाही. घडते ते बरेचसे एकांगी व आक्रमक आहे. म्हणूनच कविता म्हणून या रचना आज मनाला फारशा भिडत नाहीत.

'ऐसा गा मी ब्रह्म' मध्ये एवढेच असते, तर हा संग्रह काव्यक्षेत्रात लक्षणीय ठरला नसता. परंतु कवीमनाविषयी विश्वास देणाऱ्या काही कविता याच संग्रहात पाहावयास मिळतात. 'आई' 'थोडी ठेव' 'गलबलून जातो तेव्हा' 'थरकू नको' 'तोवर तुला मला' अशा काही कवितांच्या या संदर्भात उल्लेख करता येईल. 'आई' या

कवितेत कष्टकऱ्यांच्या जागतील आईचे व तिच्याविषयीच्या भावनेचे सुंदर चित्र साकार झालेले दिसते. तर 'गलबलून जातो तेव्हा' 'थोडी ठेव' 'थरकू नको' यांसारख्या कवितांमधून भावपूर्ण संसार-चित्रे साकार होतात. या संसारचित्रांच्या पार्श्वभूमीवर कधी कधी राजकीय, सामाजिक प्रतिक्रियाही व्यक्त झाल्या आहेत. परंतु त्यामुळे एकाबाजूने या संसारचित्रांना एक वेगळे परिमाण लाभते. तर दुसऱ्या बाजूने त्या प्रतिक्रियाही अर्थपूर्ण होतात. 'ऐसा गा मी ब्रह्म' मधील ही संसारचित्रे म्हणजे खरी आत्मनिष्ठ कविता आहे. पती-पत्नीमधील जिव्हाळ्याचे नाते, कष्टकरी जगातील वेदना व त्यातूनही माणूसपण जपण्याची त्यांची धडपड, या साऱ्यांचे सुंदर दर्शन घडविण्यास या कविता समर्थ होतात. आपल्या भोवतालच्या बाह्यविश्वातून काव्यांतर्गत वास्तव घडविणारी सुर्वे यांची प्रतिभा या कवितांमधून जाणवते.

अशा या संसारचित्रांबरोबरच या संग्रहातील 'माफ करा' 'दोन दिवस' 'तेवढ्या दर्शनाने' यांसारख्या ज्यांना सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या असे रूढ अर्थाने म्हणता येईल, अशा कविताही पाहण्यासारख्या आहेत. या कविता कष्टकऱ्यांच्या वेदनेचा, त्यांच्या भविष्यकालीन स्वप्नांचा, संघर्षशीलतेचा अनुभव देणाऱ्या आहेत. कष्टकऱ्यांशी कवीमनाचे असणारे नाते व कवीमनाची जाणीव यामधूनच या अनुभवांची निर्मिती झाली आहे. व्यापक अर्थाने या कवितांमधील 'मी' प्रातिनिधिक आहे असेही म्हणता येणे शक्य आहे. परंतु या कविता वाचीत असताना कवीने विशिष्ट भूमिका स्वीकारली आहे असे मात्र वाटत नाही. उघडपणे कोणतीही भूमिका न स्वीकारता, या कविता आत्मपर झालेल्या दिसतात. म्हणूनच सर्व अप्रिय वास्तवांचा स्वीकार करीत जगण्याचा संघर्ष करणारे, वास्तव स्वीकारीत असतानाच त्याला वळण लावण्याची आकांक्षा बाळगणारे, आपल्याच वेदनांकडे तुच्छतेने पाहणारे असे जे व्यक्तिमत्व या कवितांमधून जाणवते ते विलोभनीय

वाटते. 'ऐसा गा मी ब्रह्म' मधील अशा आत्मपर कविता खऱ्या अर्थाने सुर्वे यांच्या कवित्वाविषयी विश्वास देतात. मराठी कवितेच्या क्षेत्रात पृथगात्म वाटतात.

सुर्वे यांच्या पहिल्या संग्रहाकडून 'माझे विद्यापीठ' या संग्रहाकडे वळले म्हणजे सुर्वे यांच्या कवितेचा विकासक्रम सहज लक्षात येतो. पहिल्या संग्रहात सुर्वे गाण्याकडून कवितेकडे येण्याचा प्रयत्न करीत होते. 'माझे विद्यापीठ' मध्ये ही प्रक्रिया पूर्ण झालेली दिसते. आपल्या अनुभवांचे नेमके रूप आकलन झाल्यामुळे या संग्रहातील कवितांचे स्वरूप बदललेले दिसते. हा बदल आत्मपरतेच्या दिशेने झाला आहे. 'माझे विद्यापीठ' या पहिल्याच कवितेत कवी आपल्या प्रत्यक्ष अनुभवांच्या आधाराने जीवनविषयक प्रतिक्रिया व्यक्त करू लागतो. परिणामी, या प्रतिक्रिया केवळ वैचारिक न रहाता त्यांना भावनात्मक परिमाण लाभते. या कवितेतील निवेदनाची संथ लय अंतर्मुखतेला पूरकच ठरते. या कवितेत येणाऱ्या 'आयुष्य पोथीची उलटली सदतीस पाने, वाटते अजून काही पाहिलेच नाही.' यासारख्या ओळींमधून जीवनाचा शोध घेण्याची कवीमनाची वृत्ती जाणवत रहाते. आत्मनिष्ठेने जीवनाचा एक वेगळा अनुभव ही कविता व्यक्त करते. कवितांतर्गत 'मी' कष्टकऱ्यांच्या जगातील आहे म्हणून तो अनुभव त्या जगाचे वेगळे दर्शन घडवतो. परंतु या कवितेतील 'मी' उघडपणे प्रतिनिधित्वाची भूमिका घेत नाही. याच संग्रहातील 'मुंबई' सारख्या कवितेत प्रातिनिधिकता व आत्मपरता यांचा मनोज्ञ संगम पाहावयास मिळतो. एकंदरीत 'माझे विद्यापीठ' या संग्रहातील आत्मनिवेदनपर कविता वाचीत असताना ही कविता अधिक आत्मनिष्ठ झाल्याचा प्रत्यय येतो. या आत्मनिष्ठेमुळे कष्टकऱ्यांच्या वास्तवाची अधिक भरीव व अर्थपूर्ण निर्मिती होऊ लागते.

आपल्या अनुभवांकडे आत्मनिष्ठेने पाहू लागल्याने सुर्वे यांच्या

कवितेत अनेक बदल झालेले दिसतात. 'ऐसा गा मी ब्रह्म' या संग्रहाप्रमाणेच 'माझे विद्यापीठ' या संग्रहातही काही संसारचित्रे आहेत. परंतु ही संसारचित्रे अधिक सूचक होतात. या कवितांमधून मूर्त वास्तव व्यक्त करण्यापेक्षा त्याचे अमूर्त-भावगर्भ रूप व्यक्त करण्याकडे सुर्वे यांचा कल दिसतो. (उदा. सत्य) 'ऐसा गा मी ब्रह्म' या संग्रहाप्रमाणेच प्रासंगिक कविताही 'माझे विद्यापीठ' मध्ये पाहावयास मिळते. 'नेहरू गेले तेव्हाची गोष्ट' ही अशी प्रासंगिक कविता. परंतु या कवितेत ह्यावेळच्या प्रत्यक्ष परिस्थितीचे वर्णन करण्याऐवजी सुर्वे त्यावेळच्या भावस्थितीला शब्दरूप देऊ पाहातात. म्हणजे मूर्त अनुभवाचे अमूर्त रूप शब्दाद्वारे व्यक्त करण्याचा प्रयत्न करतात. याच संग्रहात कष्टकऱ्यांच्या, उपेक्षितांच्या जगातील वास्तवाचे सूचकतेने दर्शन घडविणाऱ्या, समूह चित्रण करणाऱ्या कविता सुर्वे लिहू लागतात. कष्टकऱ्यांच्या जगातील माणसे त्यांच्या कवितांमधून मूर्त होऊ लागतात. बाह्यजगातील वास्तव अनुभवाशी सहकंप होण्याची सुर्वे यांची वृत्ती व बाह्यजगाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी यांना अनुरूप असे अनुभवांचे रूप 'माझे विद्यापीठ' मधून साकार होते. 'ऐसा गा मी ब्रह्म' ते 'माझे विद्यापीठ' या प्रवासात निर्मितीशीलतेच्या वेगवेगळ्या दिशांचा सुर्वे आपल्या वृत्तीनुरूप शोध घेताना दिसतात. म्हणूनच 'ऐसा गा मी ब्रह्म' पेक्षा 'माझे विद्यापीठ' मधील कविता बरीच वेगळी वाटते. (याचा अर्थ 'माझे विद्यापीठ' मधील सर्व कविता चांगल्या आहे असा नव्हे. या संग्रहात 'उगीचच' 'थूः' यांसारख्या काही सामान्य रचनाही आहेत.)

याच प्रवासात सुर्वे यांच्या कवितेच्या भाषेचे वैशिष्ट्य रेखीव होत जाते. 'ऐसा गा मी ब्रह्म' या संग्रहात सुर्वे यांच्या भाषेचे वेगळेपण जाणवत असले तरी काही ठिकाणी रूढ कल्पनाविलासही पाहावयास मिळतो. 'माझे विद्यापीठ' मध्ये त्यांच्या कवितेच्या भाषेची निर्मिती

झालेली दिसते. या संग्रहात बोलभाषा, बोली व भाषेच्या उच्चारांच्या मोडणीच्या निर्मितीशीलतेचे दर्शन घडते. सुर्वे यांच्या कवितेतील संथ गद्यलयीचा याच संग्रहात प्रत्यय येतो. आपल्या अनुभवांचे नेमके रूप आकलन झाल्याचेच हे दर्शक आहे. म्हणूनच 'ऐसा गा मी ब्रह्म'पासून सुरू होणाऱ्या सुर्वे यांच्या काव्यक्षेत्रातील प्रवासाला 'माझे विद्यापीठ' या संग्रहामुळे एक वैशिष्ट्यपूर्णता प्राप्त होते. सुर्वे यांच्या कवितेचे व्यक्तिमत्त्व या संग्रहात साकार होते.

'माझे विद्यापीठ' या संग्रहाकडून 'जाहीरनामा' या संग्रहाकडे वळले तर 'माझे विद्यापीठ' मधील आत्मपरतेच्या वळणानेच सुर्वे यांची कविता साकार होताना दिसते. 'ऐसा गा मी ब्रह्म' मधील उघड प्रतिनिधित्वाची भूमिका या संग्रहातही आढळत नाही. या संग्रहातील 'जाहीरनामा' व 'माझ्या देशाच्या नोंदबुकात माझा अभिप्राय' या कविता सुर्वे यांच्या काव्यलेखनाच्या संदर्भात महत्त्वाच्या आहेत. या कवितांमधून अमूर्त व्यापक सामाजिक जाणीवेची दीर्घ कविता लिहिण्याचा प्रयत्न करणारे सुर्वे पाहावयास मिळतात. 'कार्ल मार्क्स'सारख्या कवितेत एका महान् व्यक्तिमत्त्वाकडे वेगळ्या पातळीवरून पाहण्याचा प्रयत्न दिसतो; तर या संग्रहातील काही कवितांमधून कवितांतर्गत 'स्व' व 'स्वेतर जग' यामधील वृत्ती विरोधातून कवितांतर्गत अनुभव साकार होताना दिसतो. सुर्वे यांची कविता बदलत असल्याचेच हे दर्शक आहे. या संग्रहात साध्या बोलण्याच्या भाषेतील निर्मितीशीलता अजमावण्याचा सुर्वे प्रयत्न करताना दिसतात. (अनेकदा याचे पर्यवसान परिणामकारकतेच्या अनुरोधाने शब्दरचना करण्यातही होते) 'माझे विद्यापीठ' मध्ये सुर्वे यांच्या कवितेचे जे व्यक्तिमत्व निश्चित झाले त्या अनुरोधानेच हा प्रवास सुरू रहातो. परंतु कष्टकऱ्यांच्या जगाच्या ज्या वास्तवाची सुर्वे आपल्या कवितेद्वारे निर्मिती करू पहात होते; त्या वास्तवाच्या दृष्टीने या संग्रहात फारसे काही नवे घडत नाही. या

संग्रहातील 'दुःख,' 'भेट,' 'युद्ध' यांसारख्या कवितांमधील अनुभव वेगळे असले तरी कष्टकरी जगाच्या दृष्टीने अनुभवांच्या या वेगळेपणाला काही अर्थ नाही. 'डेकवर' सारखी कविता तर 'ऐसा गा मी ब्रह्म' मधील प्रासंगिक कवितांची आठवण व्हावी इतकी कृत्रिम वाटते. (अर्थात् मधल्या काळात काव्यलेखन केल्यामुळे ही कविता शैलीच्या दृष्टीने वेगळी आहे.) 'कावळे' सारखी कविता तर विचारप्रणालीने (ideology) भारलेलीच वाटते. या संग्रहात आढळणारी वक्तृत्वपूर्ण शैलीही सुर्वे यांच्या कवितेच्या विकासाची दर्शक ठरत नाही. म्हणूनच 'माझे विद्यापीठ' या संग्रहात सुर्वे यांच्या निर्मितीशीलतेचे उन्मेष जेवढ्या प्रमाणात दिसतात तेवढे 'जाहीरनामा' मध्ये दिसत नाहीत असे म्हणावेसे वाटते.

याचा अर्थ 'जाहीरनामा' मधील कविता सामान्य आहे किंवा 'माझे विद्यापीठ' मधील अनुभवच 'जाहीरनामा' मध्ये पुनरावृत्त होत आहेत असा नव्हे. 'जाहीरनामा' या संग्रहाचा स्वतंत्र विचार केला तर या संग्रहातील चांगल्या, बऱ्या, वाईट अशा कवितांचा विचार करणे शक्य आहे. परंतु 'ऐसा गा मी ब्रह्म' ते 'जाहीरनामा' या प्रवासाचा विचार करताना आपल्या भोवतालच्या वास्तवाचा शोध घेण्याच्या प्रक्रियेत सुर्वे अधिक पुढे जात आहेत असे 'जाहीरनामा' मध्ये दिसत नाही. म्हणूनच कवितेद्वारे कष्टकऱ्यांच्या जगाचे वास्तव घडविण्याच्या प्रयत्नात, काही नवे रचनाप्रकार हाताळण्यापलिकडे सुर्वे काही नवीन करीत आहेत असे या संग्रहात जाणवत नाही एवढेच.

'ऐसा गा मी ब्रह्म' ते 'जाहीरनामा' या प्रवासात त्यांच्या जीवनविषयक जाणीवेत मूलभूत बदल झाले नसले तरी आत्मनिष्ठ वळणामुळे त्यांच्या कवितेतील भाव (mood) बदलत असल्याच्या खुणा दिसतात. 'ऐसा गा मी ब्रह्म' मधील पहिल्याच कवितेत–

' रोटी प्यारी खरी आणखी काही हवे आहे
याचसाठी माझे जग राजमुद्रा घडवीत आहे '

असा ठाम आशावाद दिसतो. ' क्षितिज रुंद होत आहे. ' सारख्या कवितांमधून अशाच आशावादी उद्रेकाचा प्रत्यय येतो. किंवा

' येत आहोत आम्ही त्यांना इशारा करा ' (इशारा)
' आम्ही उभेच सांजसकाळी ' (आमुची दुनिया)
' घडल्या जाणाऱ्या युगांचा मीच खरा स्वामी ' (युगस्वामी)

यांसारख्या शब्दातून कवीमनाची आशावादी वृत्ती जाणवत रहाते. असे शब्द कष्टकऱ्यांच्या सामर्थ्यावरच्या विश्वासाचे दर्शक होतात. या विश्वासामुळेच ' ऐसा गा मी ब्रह्म ' मध्ये अनेक आव्हाने-आवाहने येतात. ही कविता कविता म्हणून चांगली आहे की नाही हा प्रश्न बाजूला ठेवला तरी कविमनाची ही वृत्ती त्या काळात वेगळी वाटली यात शंका नाही.

या पार्श्वभूमीवर ' माझे विद्यापीठ ' मधील कवितेकडे पाहिले तर असा ठाम आशावाद कितीसा रहातो ? असा प्रश्न विचारण्यासारखा आहे.

' जगणे कठीण झाले आहे, तरी जगायचे आहे ' (माफ करा)

या ओळीच्या जोडीला ' माझे विद्यापीठ ' मधील–

' आता आलोच आहे जगात, वावरतो आहे उघड्या नागड्या वास्तवात जगायलाच हवे; आपलेसे करायलाच हवे, कधी दोन घेत, कधी दोन देत '

या ओळी ठेवल्या तर काय जाणवते ? तर एक प्रकारची जगण्याच्या अपरिहार्यतेची जाणीव. ' माझे विद्यापीठ ' या संग्रहातील ' मुंबई ' या कवितेतही–

' झिजला चंदनासम बाप, मीही तसाच, अन् हे माझे कळे !
अशाच त्यांनाही उदास रात्री, सोबतीस काळोखाचे गार वेटोळे '

अशा ओळी येतात. या शब्दांतूनही अप्रिय वास्तवाचा अपरिहार्यपणे स्वीकार करण्याचीच वृत्ती जाणवते. या संग्रहातील 'जर तुम्हाला' सारख्या कवितेत संघर्षोत्सुक मनाचे चित्र दिसते हे खरे असले तरी या कवितेतील शब्दरचनेमुळे ते कल्पनारम्य वाटते हे लक्षात घेण्यासारखे आहे. किंवा 'ऊठ' सारख्या कवितेत 'जीवनापासून पळून जावे तर जावे कुठे?'

'ऊठ! तेवढी ती कोपऱ्यातली तलवार शोधून ठेव
एकेकाळी तिच्यावर मी माझे नशीब घासले होते.'

अशा ओळीतून संघर्षशीलता जाणवत असली तरी या कवितेतील संघर्ष भूतकाळातील आहे हे जाणवण्यासारखे आहे. संघर्षाचे प्रतीक असणारी तलवार इथे कोपऱ्यात आहे. ('कामगार आहे मी तळपती तलवार आहे' या ओळीतील तलवारीशी 'ऊठ! तेवढी कोपऱ्यांतली ती तलवार शोधून ठेव' या ओळीतील तलवारीची तुलना करून पहाण्यासारखी आहे.) याचा अर्थ आत्मनिष्ठेबरोबर सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवांची अनुभव म्हणून परिणामकारकता वाढत असली तरी आक्रमकता कमी होत आहे असाच होतो. 'ऐसा गा मी ब्रह्म' मध्ये येणारा 'आम्ही' हा शब्द नेहमीच वर्गदर्शक आहे. ('शब्दांचे ईश्वर' सारखी कविता हा अपवाद) परंतु 'माझे विद्यापीठ' मध्ये हा शब्द अनेकदा 'स्व' चाच दर्शक झाला आहे. उघडवर्गीय भूमिका घेण्यापेक्षा आत्मनिष्ठ होण्याकडे असणारा सुर्वे यांच्या कवीमनाचा कलच यामधून व्यक्त होतो. 'बरं का रे पोरा!', 'लालबाग' यासारख्या कवितांमधून या संग्रहात कष्टकरीवर्गाचे झळझळीत रूप व्यक्त होते; परंतु अशा रूप 'माझे विद्यापीठ' मध्ये अभावानेच दिसते.

'माझे विद्यापीठ' कडून 'जाहीरनामा' या संग्रहाकडे वळले की या प्रक्रियेचा अधिकच प्रत्यय येतो. या संग्रहातील 'जाहीरनामा' ही कविता तर विसाव्या शतकातील समग्र मानवजातीलाच उद्देशून आहे. या कवितेतील—

'कितीवेळा आपण जमा झालोत मारवाडयाच्या पोथीत
कितीदा आयुष्य निघाले होते मोडीत ....'

यांसारख्या ओळींमधून 'आपण' 'दोस्त' हे शब्द वर्गदर्शक आहेत असे वाटले तरी–

'हिरोशिमाला नंतर फुले तरी आली
आपणाला....'

यासारखी ओळ पाहिली म्हणजे 'आपण' या शब्दाची व्याप्ती सहज लक्षात येते. ही व्याप्ती एका विशिष्ट वर्गापेक्षा अधिक आहे. याच कवितेतील–

'आपणही आता घुरकटलेले चष्मे बदलून घ्यावेत
आपणही ह्या शतकात जन्मलो; आपलेही हिशेब चुकते करावेत.'

'आपण फक्त लिप्या बदलीत राहिलो
सोयीनुसार दरवाजे बदलीत राहिलो
उडालेली कौले शाकारीत राहिलो'

यांसारख्या ओळीतून एक आत्मपरीक्षणाचा सूर जाणवतो. या सर्व पार्श्वभूमीवर जेव्हा–

'एक दिवा पेटवून दुसऱ्या दिव्याकडे
लपकन् वळणारा हात मला दिसतो आहे
आधार तेवढाच आहे'

अशी जेव्हा प्रतिक्रिया येते तेव्हा कवीमनाला वाटणाऱ्या आधाराची क्षीणता जाणवल्यावाचून रहात नाही. ही कविता पूर्ण होते ती आत्मविश्वासाच्या भावाने; परंतु हा आत्मविश्वास म्हणजे कवीमनाचा व्यक्तिगत भाव आहे. त्याचे समष्टीशी नाते जुळत नाही.

'एकटाच आलो नाही युगाचीहि साथ आहे.
सावध असा, तुफानाची हीच सुरुवात आहे' (चार शब्द : ऐसा गा मी ब्रह्म)

या ओळीतील आत्मविश्वास व 'जाहीरनामा' या कवितेतील आत्मविश्वास एकाच प्रकारचा नाही. 'जाहीरनामा' या संग्रहात अशी

अनेक उदाहरणे पाहता येण्यासारखी आहेत.

'जाहीरनामा' या संग्रहात कवीमन भविष्यकालाविषयी निराश आहे असे नाही, परंतु भविष्याविषयीच्या स्वप्नांची झळाळी मावळली आहे.

'वाटा सरळ होतील अन्
पुन्हा आयुष्य घेईल वळणे....' (आयुष्य)

किंवा

'वस्ती उद्याची आत्तासारखी अंगावर
कोड फुटलेली नसेल,
कारव्यांची, बारदाणांची, फिल्मी कागदांनी कुडलेली
घरेही नसतील.
एकाच खोलीत मातापिता, बहीण
तरण्या लग्न झालेल्या मुलाचा शृंगारही नसेल,
सर्व काही आजच्याहून बरे असेल.'
(जेव्हा कधी या कवितांवरचे प्रयोग होतील.)

यांसारख्या ओळींमधून भविष्याविषयीची आशावादी वृत्ती जाणवते हे खरे. परंतु त्यामध्ये पूर्वीसारखा जोष नाही हे सहज जाणवण्यासारखे आहे, 'आयुष्य' याच कवितेतील–

'झळाळेल दिवस
अश्रद्ध मी; तरीही वाटले
न करताही असा एखादा पावेल नवस.'

या ओळी या संदर्भात लक्षात घेण्यासारख्या आहेत. 'जाहीरनामा' या संग्रहातील आशावाद म्हणजे केवळ कवीमनाची आशा आहे. साहजिकच याला सरळ अर्थाने आशावाद म्हणणे योग्य होणार नाही. सुर्वे यांचे कवीमन आत्मनिष्ठ होत असल्यामुळेच असे घडते.

कवीमन आत्मनिष्ठ झाल्यामुळेच 'जाहीरनामा' या संग्रहात आत्मपरीक्षणाचा सूर जाणवतो. असे आत्मपरीक्षण करायचे म्हणजे आपल्याच अनुभवांकडे थोडे वळून पाहावे लागते. एक प्रकारच्या

अलिप्ततेचा स्वीकार करावा लागतो. 'जाहीरनामा' मध्ये सुर्वे यांच्या कवीमनाने हे वळण वेतलेले दिसते. या संग्रहातील 'संवाद,' 'काय करावे' यांसारख्या कविता व 'जाहीरनामा,' 'आयुष्य' यांसारख्या कवितांमधील काही भाग यामधून हे सतत जाणवत राहते. या आत्म-परीक्षणाबरोबरच एक उदास-गंभीर अशी वृत्तीही या संग्रहातून जाणवते (जी सुर्वे यांच्या आधीच्या संग्रहात नाही) 'तुमच्या त्या उदास रात्री आता खरोखरच मला नकोत' असे सांगणारी कविता या संग्रहात असली तरी किंवा,

"म्हणून मी उठलो
वस्तीच्या बाहेर गेलो
कारखान्यांच्या कानात पुटपुटलो
'आता आपणाला कूच करायला हवे !..." (झेप)
'जेव्हा जेव्हा सर्वत्रच उदासले; तेव्हा तेव्हा ठरवले
हे आमंत्रण आम्हाला; अन् स्वार शिविरात हजर होते' (आमंत्रण)

यांसारख्या ओळी 'ऐसा मी गा ब्रह्म' मधील कवीमनाची आठवण करून देत असल्या तरी तो केवळ अपवाद आहे. उलट,

'या शहरावर, संस्कृतीवर, फुलांवर कसा उरावा विश्वास
भडभडा चार तांबे ओतून मोकळे होऊ नये तर काय करावे ?
म्हणालोच, ही पृथ्वी : हिला केवळ जन्माला घालणेच ठाऊक आहे
आपणच आपणाला सदैव साद घालू नये, तर काय करावे ?
(काय करावे)

'आपण विसरू म्हणावे सगळे, विसरता येत नाही
रोजच कथन करावा लागतो वृत्तांत, हे टळत नाही'
'पुढच्या युगाची सर्वच दुःखे, मीही भोगीन म्हणतो
आजच्या व्यथांना काय करावे; कुणी सांगतच नाही'
(पुढच्या युगाची सर्व दुःखे)

'थांबू तर शकत नाही; आणि तुमचे हे असे औदासिन्य.
एका नव्या संघर्षासाठी धुमाळीत घुसू नये, तर काय करावे ?'
(एका नव्या संघर्षात)

'माझेही एक स्वप्न होते रे,
रोजच्या दमगिरीने तेवढी उसंतच दिली नाही' (रायटर्स पार्क)

यांसारख्या शब्दांमधून व्यक्त होणारे, औदासिन्याचे क्वचित् एकाकीपणाचे भाव हे 'जाहीरनामा' या संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. 'रोटी प्यारी खरी आणखी काही हवे आहे' असे स्वप्न पाहणारे कवीमन या संग्रहात 'संपलाच नाही भाकरीचा मार्ग। ग्रंथातले स्वर्ग कशापायी?' असे उद्‌गार काढू लागते. संघर्षाच्या झळझळीत अनुभवांसाठी भूतकाळाकडे वळू लावते. विपरीत वर्तमानानंतर येणारा भविष्यकाळ उज्ज्वल असेल असे स्वप्न जपणारे कवीमन,

'आजच्याइतके आयुष्य काल कठोर नव्हते.
आजच्याइतके पालखीचे भोइ काल थकलेले नव्हते' (संवाद)

असे उद्‌गार काढू लागते. हे सर्व पाहिले म्हणजे 'ऐसा गा मी ब्रह्म' ते 'जाहीरनामा' या प्रवासात सुर्वे यांच्या कवितेतील भाव बदलत आहेत असेच म्हणावे लागते.

सुर्वे यांच्या कवितेतील या बदलाच्या आधारे, त्यांची कविता आपले वैशिष्ट्य क्रमाक्रमाने गमावीत आहे, आत्मनिष्ठेच्या प्रभावाने ती हळूहळू व्यक्तीकेंद्रित होऊ पाहत आहे, कष्टकरी जगाच्या प्रतिनिधित्वापासून विचलीत होत आहे, त्यांच्या कवितेचे वेगळेपण आता केवळ अनुभवाच्या संदर्भविश्वापुरते मर्यादित होत आहे, परिणामी रूढ मराठी कवितेच्या ती जवळ जाऊ पाहत आहे, असा युक्तिवाद करण्याचा मोह होणे अगदी स्वाभाविक आहे. या युक्तिवादाला उपयुक्त असा विपुल पुरावा सुर्वे यांच्या कवितेतच मिळण्यासारखा आहे.

परंतु अशा प्रकारचा युक्तिवाद करून निष्कर्ष काढताना कवितेविषयीची आपली भूमिका तपासून पाहावी लागेल. बाह्य वास्तव आणि कवीपन यांच्या ताणातून कवितांतर्गत अनुभवाची निर्मिती होते असे मागे म्हटले आहे. काव्यनिर्मितीच्या संदर्भात हे दोन्ही घटक गतिशील

असतात. कवीमनाच्या वृत्तीने संस्कारित होऊन बाह्य वास्तव कवितेत येते, त्याचप्रमाणे बाह्य वास्तवामुळे कवीमनातील भाव संस्कारित होण्याची शक्यताही गृहित धरावी लागते. कवी आपल्या कवितेकडे केवळ साधनात्मक दृष्टीने पाहत नसेल, बाह्य वास्तवाशी कवीमनाचा सजीव संबंध असेल आणि कविता हा कवीचा स्वतःशी असणारा खराखुरा संवाद असेल तर कवीमनाचे भाव बदलते असणे स्वाभाविकच म्हणावे लागेल. कवीमनाच्या कवितानिष्ठेचेच ते दर्शक आहे. सहाजिकच कवीच्या काव्याची वैशिष्ट्यपूर्णता त्यामुळे हरवण्याचा धोका संभवत नाही; कारण काव्याची वैशिष्ट्यपूर्णता ही कवीमनाची वैशिष्ट्यपूर्णता असते. सुर्वे यांच्या कवितेतील ठाम आशावाद क्रमाक्रमाने क्षीण होत गेला असला, एकाएकी औदासिन्याचे भाव त्यांच्या कवितेतून व्यक्त होत असले तरी जीवन निरर्थक आहे, शून्य आहे असा भाव त्यांच्या कवितेतून कधीही व्यक्त झालेला नाही. सुरुवातीच्या काळात सुर्वे यांच्या कवितेतून कष्टकरी जगाचे जे झळझळीत रूप व्यक्त होत होते ते क्रमाक्रमाने क्षीण होत गेले असले तरी कष्टकऱ्यांच्या जीवनाशी कवीमनाचे असणारे अतूट नाते क्षीण झाल्याचे त्यांच्या कवितेतून जाणवत नाही. भौतिक जीवनावरचा ठाम विश्वास, माणसांच्या कृतीशीलतेतून घडणाऱ्या माणुसकीच्या दर्शनावरील त्यांची श्रद्धा ढळल्याचे कुठेही जाणवत नाही. सुर्वे यांच्या कवितेत औदासिन्याचे भाव येत असले तरी त्यांनी निराशावादाचे रूप धारण केलेले नाही. आणि म्हणूनच 'मुक्त शैलीने आपल्या वृत्तींचा आविष्कार करणारे नवे काव्य आणि हळुवार सौंदर्यात्मक प्रतिक्रियांनी (Responses) नटलेले नवे काव्य' या दोन्ही प्रवृत्तींहून त्यांची कविता आजही वेगळीच राहिली आहे. हे सर्व लक्षात घेतले म्हणजे काव्यक्षेत्रातील आपल्या प्रवासात या कविमनाने आपली वैशिष्ट्यपूर्णता कायम राखली आहे असेच म्हणावे लागेल. जीवनाकडे पाहण्याचे या दृष्टीचे वेगळेपण आजही जाणवण्यासारखे आहे.

साहजिकच या कवितेला आपले वैशिष्ट्य गमावण्याचा धोका नाही.

'ऐसा गा मी ब्रह्म' ते 'जाहीरनामा' या प्रवासात सुर्वे यांच्या कवितेतील बदलणारे भाव लक्षात घेता या प्रवासासंबंधी वेगळ्या पद्धतीने विचार करणे शक्य आहे.

सुर्वे यांच्या कवितांर्गत अनुभवाचे संदर्भविश्व कष्टकऱ्यांचे जग आहे हे आपण पाहिलेच आहे. या संदर्भविश्वाशी सुर्वे यांचे असणारे नातेही त्यांच्या कवितेतून व्यक्त होत आहे. कष्टकरी माणसे व कष्टकऱ्यांचे जग हीच सुर्वे यांच्या कवितेची प्रेरक शक्ती आहे हे त्यांच्या कवितेवरून ध्यानात घेण्यासारखे आहे. सुर्वे यांनी सुरुवातीच्या काळात कलापथकासाठी लिहिलेली गाणी व त्यांच्या कवितेतून व्यक्त होणारा राजकीय आशय लक्षात घेतला तर कष्टकऱ्यांच्या चळवळीशी सुर्वे यांचे असणारे नातेही सहज जाणवण्यासारखे आहे. सुर्वे यांच्या कवितेचे हे स्वरूप लक्षात घेतले तर त्यांच्या कवितेतील बदलत्या भावांचे वेगळे स्पष्टीकरण करता येण्यासारखे आहे.

सुर्वे यांच्या पहिल्या संग्रहात संग्रहित झालेली कविता १९५४ ते १९६२ या काळातील आहे. या काळाचा प्रारंभबिंदू स्वातंत्र्य-प्राप्तीला जवळ तर दुसरा बिंदू चिनी आक्रमणाच्या जवळ आहे. ('भारतीय जवानाचे पत्र' ही चिनी आक्रमणाच्या निमित्ताने लिहिलेली कविता 'ऐसा गा मी ब्रह्म' या संग्रहात संग्रहित झाली आहे.) साहजिकच स्वातंत्र्यलढ्यात कष्टकरीवर्गाने घेतलेला सहभाग, त्यात दाखविलेली झुंजार वृत्ती या स्मृती ताज्या आहेत. भारतीय स्वातंत्र्य हे कष्टकऱ्यांसाठी आहे. या देशात लोकशाही समाजवाद आणायचा आहे या घोषणा खऱ्या वाटाव्यात असा हा काळ आहे. १९५१ मध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेला सुरुवात झाली. १९५१ ते १९५६ हा काळ देशाच्या सातत्यपूर्ण आर्थिक प्रगतीचा काळ आहे. देशाच्या या आर्थिक प्रगतीमुळे भविष्याविषयी सामान्य माणसाला विश्वास वाटावा

असा हा काळ आहे. याच काळात महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राचा लढा उभा राहिला. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीमागील ध्येयवाद हे राज्य कष्टकऱ्यांचे व्हावे असाच होता. महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणूस या लढ्यात उतरला होता. प्रचंड जनशक्तीचे दर्शन भोवताली घडत होते. या वस्तीत अजून सुख आलेले नाही परंतु जनशक्तीच्या बळावर 'याच वस्तीतून उद्या आपला सूर्य येईल' अशी आशा वाटावी असा हा काळ होता. सुर्वे यांच्या भोवतालच्या कष्टकरी जगात हा भाव जाणवत होता. प्रचंड सभा, मोर्चे, मिरवणुका यांमधून कष्टकऱ्यांच्या सामर्थ्याचे दर्शन घडत होते. 'ऐसा गा मी ब्रह्म' मधील कविता लिहिणारे कवीमन या सर्वांचे साक्षी होते. सहाजिकच भोवतालच्या वास्तवात जाणवणारा हा आशेचा आक्रमक भाव सुर्वे यांच्या कवितेतून प्रकट झाला. बाह्य-वास्तवाशी सहज सहकंप होण्याच्या सुर्वे यांच्या कविमनाच्या वृत्तीमुळे कष्टकरी जनमानसाचे हे स्पंदन सुर्वे यांच्या कवितेत आले.

सुर्वे यांच्या दुसऱ्या कवितासंग्रहाचा प्रसिद्धी काल १९६६ आहे. म्हणजे १९६२ नंतरची ही कविता आहे. या कवितासंग्रहाची पार्श्वभूमी पाहायची तर तीन घटनांचा उल्लेख करायला हवा. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती (१९६०), चिनी आक्रमण (१९६२), पं. जवाहरलाल नेहरू यांचे निधन (१९६४) या त्या तीन घटना होत. यामधील संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती हा आकांक्षापूर्तीचा क्षण होता. हे खरे असले तरी तो निर्मेळ आनंदाचा क्षण राहिला नव्हता. १९५७ मधील शेतीक्षेत्रातील अरिष्ट व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात झालेली चलनवाढ आणि या साऱ्याचा परिणाम म्हणून वाढलेली महागाई यामुळे संयुक्त महाराष्ट्रनिर्मितीचा आनंद झाकोळला होता. चिनी आक्रमणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर अधिकच ताण पडला. चिनी आक्रमण व पंडित जवाहरलाल नेहरूंचे निधन या घटनांनी मराठी मनाला धक्के दिले ते केवळ भावनात्मक नव्हते तर राजकीय,

आर्थिक, सामाजिक भवितव्य हादरवून टाकणारे असे हे धक्के होते. 'माझे विद्यापीठ' मधील कविता लिहिली गेली त्यावेळी बाह्यवास्तव असे ढगाळलेले होते. गाण्यांकडून कवितेकडे वळण्याची सुर्वे यांची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर जेव्हा आत्मनिष्ठापूर्वक बाह्यवास्तवाकडे त्यांचे कविमन पाहू लागले तेव्हा साहजिकच बाह्यवास्तवातील हे स्पंदन त्यांना जाणवले. वास्तव स्वीकारण्याची व भविष्याचे स्वप्न पाहण्याची सुर्वे यांच्या कविमनाची वृत्ती असल्याने त्यांनी निराशावादी कविता लिहिली नसली तरी आता 'दोन घेत दोन देत' अपरिहार्यपणे जगायला हवे याची जाणीव कवीमनाला होऊ लागली. परिणामी 'ऐसा गा मी ब्रह्म' च्या तुलनेत 'माझे विद्यापीठ' मधील आशावाद क्षीण झाला. याच काळात सुर्वे कष्टकरी माणसे, त्यांचे जग यांना शब्दाद्वारे सजीव करू लागले. कष्टकरी जगातील माणूस शोधण्याचा ते अधिक प्रयत्न करू लागले. त्यांच्या कवितेतील अनुभव बदलू लागले. सामान्य माणसाच्या सामर्थ्यावरचा त्यांचा विश्वास उडाला नाही. परंतु भोवतालच्या वास्तवात या सामर्थ्याचा प्रत्यय यावा अशी भारून टाकणारी परिस्थिती नसल्याने वास्तव न नाकारता संघर्षाच्या झळझळीत अनुभवांसाठी त्यांचे कवीमन भूतकाळाकडे वळू लागले.

'माझे विद्यापीठ' मधील कवितेनंतरचा कालखंड तर कष्टकऱ्यांच्या जगाच्या दृष्टीने अधिकच निराशाजनक आहे. पं. नेहरूंच्या निधनानंतर देशातील राजकारणामागची दूरदृष्टी लोप पावली. राजकीय, आर्थिक, सामाजिक सर्वच आघाड्यांवर नजीकच्या फायद्यावर दृष्टी ठेवून व्यवहार करण्याची वृत्ती बळावली. घोषणांचे पीक आले. परंतु घोषणा कोणतीही असली तरी कष्टकऱ्यांवरील प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष हल्ले वाढतच गेले. देशाचे उत्पादन वाढूनही सामान्य माणसाच्या दृष्टीने परिस्थिती अधिकाधिक उग्र रूप धारण करू लागली. वेगवेगळ्या रूपांत कष्टकरी विरोधी शक्ती उभ्या राहू लागल्या. या सर्व दबावांमुळे नैतिक ऱ्हासाने

तर परिसीमा गाठली. नवे नवे गुंतागुंतीचे प्रश्न उभे राहू लागले. या गुंतागुंतीच्या प्रश्नांना जुनी ढोबळ उत्तरे अपुरी पडू लागली. नवे प्रश्न समजावून घेऊन त्याची उत्तरे शोधणाऱ्या दूर दृष्टीच्या नेतृत्वाचा तर अभाव होता. अशा काळात कष्टकरी वर्ग दिशाहीन होत जाणेच स्वाभाविक होते, वेगवेगळ्या परस्परविरोधी विचारांच्या गोटात कष्टकरी-वर्गाचे विभाजन होऊ लागले. राजकीय आघाडीवर कष्टकरी खऱ्या अर्थाने आक्रमक राहिला नाही. स्वातंत्र्यानंतरच्या दीर्घ कालावधीनंतरही कष्टकऱ्यांच्या जगात फारसे सुख न आल्याने मनावर एक ताणही निर्माण झाला. परिस्थितीच्या या दडपणामुळे काही काळ का होईना कष्टकऱ्यांच्या जगात एकप्रकारची उदासीनता आली. भोवतालच्या वास्तवातील या बदलांचे सुर्वे यांच्या कवीमनाला सहज भान आले. परिणामी या सर्व परिस्थितीविषयीच्या भावनात्मक प्रतिक्रिया त्यांच्या व्यक्त होऊ लागल्या. 'माझे विद्यापीठ'पेक्षा 'जाहीरनामा' या संग्रहात उदासीनतेचे भाव अधिक आहेत. याची कारणमीमांसा ही आहे. 'ऐसा गा मी ब्रह्म' ते 'जाहीरनामा' या प्रवासात भोवतालच्या वास्तवाबरोबर सुर्वे यांची कविता बदलत गेली असा याचा अर्थ आहे.

सुर्वे यांच्या कवितेतील वृत्तीबदलांचे हे स्पष्टीकरण कवितेच्या सदर्भात सर्वसामान्य नियम म्हणून स्वीकारता येण्यासारखे नाही हे स्पष्टच आहे. कारण बदलत्या वास्तवाबरोबर निर्मितीशील कवीमन वेगवेगळे मार्ग स्वीकारू शकते. काळाच्या ओघात कवीमनाचा विकास शक्य असतो. परंतु हे कवीमनाच्या वृत्तीवर आणि कवितेकडे पाहण्याच्या त्याच्या दृष्टीवर अवलंबून असते. आत्ममग्न व त्यामुळे चिंतनशील असणाऱ्या कवीच्या काव्यातील वृत्तीबदलांचा व बाह्य सामाजिक वास्तवाचा इतका स्पष्ट संबंध असत नाही. परंतु सुर्वे यांची वृत्ती आत्ममग्न व त्यामुळे चिंतनशील असल्याचे त्यांच्या कवितेतून जाणवत नाही. उलट बाह्यवास्तवाशी सहज सहकंप होणारी, समष्टीशी नाते

जोडणारी अशी ही वृत्ती आहे. सुर्वे यांचे प्रत्यक्ष जनचळवळीशी नाते आहे. सुर्वे कवितेकडे साधन म्हणून पाहत नाहीत हे खरे असले तरी कवितेची साधनात्मकता पूर्णपणे नाकारण्याची त्यांची दृष्टी नाही. * चळवळीतून निर्माण होणाऱ्या व चळवळीशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नाते जोडणाऱ्या कोणत्याही कवीच्या संदर्भात हे असेच असते. अशा कवीच्या काव्यावर बाह्य परिस्थितीचा सहज परिणाम होत असतो. कवीमन निर्मितिशील असते हे खरे, परंतु बाह्य वास्तवातील विशिष्ट परिस्थिती अशा कवीच्या निर्मितीला अधिक प्रेरक ठरते. एका प्रकारे ही कवी-मनाची मर्यादा आहे. परंतु दुसऱ्या बाजूने तेच त्या मनाचे वैशिष्ट्य असते. अशा कवीची कविता एका बाजूने चळवळीला प्रेरक होते, परंतु दुसऱ्या बाजूने अशा कवीला घडविण्याचे कार्य चळवळ करीत असते. सुर्वे यांची कविता या गटातील कविता आहे. म्हणूनच सुर्वे यांच्या काव्यक्षेत्रातील प्रवासाचे स्पष्टीकरण करताना त्यांच्या कवितांतर्गत अनुभवाचे संदर्भविश्व असणाऱ्या कष्टकऱ्यांच्या जगाचा संदर्भ अपरिहार्य आहे.

नारायण सुर्वे यांच्या कवितेवरील समीक्षेविषयी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना 'सुर्व्यांच्या कवितेवरची सर्व समीक्षा 'कम्युनिस्ट' या एका सूर्यामोवती फिरत असते, असे नरहर कुरुंदकर यांनी म्हटले आहे.' नरहर कुरुंदकर यांचे हे विधान पूर्णार्थाने खरे नाही असे म्हटले तरी सुर्वे यांच्या कवितेच्या मर्यादांचा संबंध मार्क्सवादी विचारांच्या संस्काराशी जोडला जातो हे खरे आहे. उदा. 'सुर्व्यांच्या कवितेत दोन भिन्न पातळ्यांवरच्या जाणिवा एकदम प्रकट होताना दिसतात. सुर्व्यांच्या व्यक्तीच्या आणि व्यक्तीसमूहाच्या सामर्थ्यावर विश्वास आहे; माणूस हा निर्माता आहे, तो सर्जक आहे; त्यामुळे आज ना उद्या

---

* इथूनच शब्दांच्या हाती खड्गे मी देत आहे (चार शब्द)
मुठी वळलेले हात घराघरात ठेवलेत (माझे शब्द)

त्याच्या जीवनात 'पहाट' उगवणार आहे; ह्यावर सुर्व्यांचा विश्वास आहे. आजच्या कवितेतून उमटणाऱ्या जाणिवांपेक्षा ह्या जाणिवा पूर्णतया वेगळ्या आहेत. कारण त्या मानवाच्या सामर्थ्याबद्दल, सर्जकत्वाबद्दल साशंक नाहीत. सामाजिक संस्थांची निरुपयुक्तता आणि सांस्कृतिक परंपरेची निरर्थकता त्यांना जाणवलेली नाही. सुर्व्यांच्या या जाणीवक्षेत्रात व्यक्तीच्या एकाकीपणाला, त्याच्या जीवनाच्या अर्थहीनत्वाला स्थान नाही. ह्या स्तरावरीवरील सुर्व्यांचे जाणीवविश्व मार्क्सवादी विचारांनी भारलेले आहे. ह्या जाणिवा त्यांना अंतिम आणि संशयातित (unquestionable) वाटत असल्याने त्यांचा शोध घेण्याची, त्यांचे डोळसपणे मूल्य शोधण्याची गरज येथे उरलेली नाही. खरे म्हणजे ह्या जाणिवा सांप्रदायिक श्रद्धा बनून गेल्या आहेत.

जेव्हा कवीच्या जाणिवा ह्या सांप्रदायिक श्रद्धा बनून जातात तेव्हा त्याच्यासमोर खरे म्हणजे कोणतेच प्रश्न शिल्लक नसतात. त्याला काही पाहायचे नसते आणि काही शोधायचे नसते. वैयक्तिक काय किंवा सामाजिक काय साऱ्याच प्रश्नांचे, सुखदुःखांचे त्याचे निदान आणि त्यावरचा इलाजही पक्का होऊन गेलेला असतो. त्याच्या कवितेला फक्त कार्य उरलेले असते श्रद्धाप्रदर्शनाचे आणि श्रद्धासंस्काराचे. त्यामुळेच पक्क्या निष्ठांची आणि श्रद्धांची कविता वक्तृत्वपूर्ण बनते. ह्या निष्ठांच्या आणि श्रद्धांच्या संदर्भात त्याचे अनुभव-घटक हे अत्यंत सुलभपणे एकत्र येत असतात. ह्या श्रद्धांना आवाहन* देणाऱ्या घटनांचे, परिस्थितीचे अवलोकन करण्याची शक्तीच त्याने गमावलेली असते. हे केवळ मार्क्सवादी कवितेपुरतेच खरे आहे असे नव्हे, तर कुठल्याही नैतिक किंवा धार्मिक श्रद्धांमधून जन्मणाऱ्या कवितेबद्दलही हे खरे आहे. किंबहुना विशुद्ध भाव-कवितेबद्दलही हे तितकेच खरे आहे. ह्या श्रद्धांच्या पक्केपणामुळे कवीची अनुभव घेण्याची क्रियाच साचेबंद बनून जाते.'[२]

---

* 'पायवाट' पृ. ११३

२. सुधीर रसाळ, प्रतिष्ठान, ऑगस्ट १९६७ पृ. १८–१९

सुर्वे यांच्या कवितेच्या संदर्भातील सुधीर रसाळ यांचे हे विवेचन पाहिले तर सुर्वे यांची कविता विशिष्ट श्रद्धांमधून जन्म पावत असल्याने (या श्रद्धा अर्थातच मार्क्सवादी आहेत) तिला मर्यादा पडतात असे ते स्पष्टपणे सुचवीत आहेत असे दिसते.

सुर्वे यांच्या कवितेसंबंधी लिहिताना संभाजी कदम यांनी 'सत्यकथा' मधील आपल्या लेखात स्पष्टपणे असे म्हटले नाही. उलट 'वास्तविक वर्गविग्रहाच्या जाणिवेतून निघणाऱ्या अनुभवालासुद्धा उत्तम काव्याची पातळी येणे अशक्य नसते. (तशी कोणत्याही अनुभवाला काव्याची पातळी येणे अशक्य नाही.) अनुभवाकडे अलिप्तपणे पाहण्याची ताकद मात्र त्यासाठी आवश्यक असते.'[३] असे त्यांनी म्हटले आहे. परंतु सुर्वे यांच्या कवितेतील अनुभव हा वर्गीय पातळीवरून घेतलेला असतो असे त्यांनी सुचविले आहे. परिणामी 'एकीकडून आत्मश्लाघा व दुसरीकडून आत्मकरुणा असा दुहेरी दोष त्यांच्या कवितेत निर्माण होतो.'[४] असे त्यांचे निरीक्षण आहे. म्हणजेच सुर्वे यांच्या कवितेच्या मर्यादेचे मूळ अप्रत्यक्षपणे त्यांच्यावरील मार्क्सवादी विचारांच्या संस्कारात आहे असेच हे निरीक्षण सुचवीत आहे. सुर्वे यांच्या कवितेवर गंभीरपणे लिहिलेल्या समीक्षेतून सुर्वे यांची कविता व मार्क्सवाद यांचा असा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध जोडला गेला आहे. (सामान्य वर्तमानपत्री समीक्षेतून तर यासंबंधी अधिक उघड व ढोबळपणे लिहिले गेले आहे.) या सर्वांविषयी जणू प्रतिक्रिया म्हणून नरहर कुरुंदकर यांनी 'माणूस सुर्वे कम्युनिस्ट असतील पण कवितेत जो कवी दिसतो त्याचा त्या तत्त्वज्ञानाशी काही अपरिहार्य संबंध

---

* हा शब्द आव्हान' असावा.

३. संभाजी कदम, सत्यकथा, एप्रिल १९६७ पृ. ७३.

४. ,, ,, ,, ,, पृ. ६६.

नाही ' [५] असे म्हणून सुर्वे यांच्या कवितेच्या संदर्भात मार्क्सवाद अप्रस्तुत ठरवला आहे. *

आपल्या काव्यलेखनासंबंधी लिहीत असताना " मार्क्स व एंगल्स हे आजच्या युगाचे थोर विचारवंत आहेत. ते वैज्ञानिक दृष्टिकोन देतात. जीवनाने पुढे आणलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात...म्हणून दरखेपेस मार्क्स मला बजावीत असतो ' वस्तुनिष्ठ हो, कठोर आत्मपरीक्षण कर, डोळसपणा धारण कर व निर्भयपणे पुढे चल ! ' [६]

' मात्र ' ' मजूर ' हा शब्द मी कटाक्षाने टाळतो. हा शब्द मला नेटीवासारखा मवाळ वाटतो. असे शब्द कटाक्षाने टाळताना ह्यामागे माझी राजकीय व सामाजिक भूमिकाही असते ' [७] असे नारायण सुर्वे यांनी स्वतःच म्हटले आहे. सुर्वे यांच्या कवितेवर विचार करीत असताना मार्क्सवादी विचारांची आठवण होते व स्वतः सुर्वेही मार्क्सवादाचा उल्लेख करतात हे लक्षात घेतले म्हणजे या कवितेचा आस्वाद घेताना मार्क्सवाद अप्रस्तुत ठरत असला तरी या कवितेचा अभ्यास करताना तो अप्रस्तुत आहे असे म्हणता येणार नाही. उलट सुर्वे यांची कविता व मार्क्सवाद यांचा संबंध समजून घेण्याचा प्रयत्न त्यांच्या कवितेच्या अभ्यासाला उपकारच ठरेल. हा प्रयत्न करताना सुर्वे यांच्या कवितेतून मार्क्सवादी विचारांचा व्यूह कसा व किती सिद्ध झाला हे पाहणे येथे अभिप्रेत नाही; तर मार्क्सवादी विचारसरणीचे सुर्वे यांच्या निर्मितीशीलतेवर कोणते परिणाम घडले हे पाहणेच येथे अभिप्रेत आहे.

मार्क्सवाद आणि सुर्वे यांची कविता यांचा असा संबंध पहाताना एखाद्या कवीच्या काव्यावर एखाद्या विचारसरणीचा प्रभाव पडतो म्हणजे

---

५. नरहर कुरुंदकर, पायवाट, पृ. ११३

* कवितेचा आस्वाद घेण्याच्या पातळीवर कुरुंदकर यांचे मत मान्य करता येईल असेच आहे.

६. नारायण सुर्वे, जाहीरनामा, पृ. ५६-५७

७. ,, ,, पृ. ५९-६०

काय होते यासंबंधीचे स्थूल स्पष्टीकरण डोळ्यांसमोर ठेवणे उपयुक्त ठरणार आहे.

कोणत्याही कवीची कविता म्हणजे त्याची भोवतालच्या वास्तवा-विषयीची प्रतिक्रिया असते. कवीच्या जीवनविषयक जाणिवेतून ती व्यक्त होत असते. ही प्रतिक्रिया प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कोणत्यातरी मूल्यव्यूहाच्या आधारेच व्यक्त होत असते. म्हणूनच कवीच्या प्रतिक्रियेमागे, म्हणजेच काव्यामागे असणारा मूल्यव्यूह कवीच्या विचारसरणीचा दर्शक आहे असे म्हणता येते. कवितेचा आशय जितका प्रत्यक्ष सामाजिक, नैतिक असतो तितके या विचारसरणीचे स्वरूप स्पष्ट असते. परंतु कवी नेहमीच प्रत्यक्ष सामाजिक, नैतिक आशयाची कविता लिहील असे नाही. केवळ निसर्गवर्णनपर, भाववृत्तीपर कविताही कवी लिहीत असतात. अशावेळी काव्यामागे असणाऱ्या विचारसरणीचे स्वरूप अप्रत्यक्ष होऊ लागते. आपल्याला परिचित असणाऱ्या प्रसिद्ध कवीचे उदाहरण घेऊन सांगायचे झाल्यास असे म्हणता येईल की, केशवसुतांच्या सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या कवितेमागे उदारमतवादी विचारसरणीचा प्रत्यक्ष मूल्यव्यूह आहे, किंवा कुसुमाग्रजांच्या सामाजिक कवितेमागे उदारमतवादी विचार-सरणी आत्मसात केलेला जहाल राष्ट्रवादी विचारसरणीचा मूल्यव्यूह आहे व काहीवेळा साम्यवादी विचारसरणीने तो संस्कारित झाला आहे. परंतु केशवसुत किंवा कुसुमाग्रज यांच्या सर्व कवितेचा कोणत्याही विचारसरणीशी असा प्रत्यक्ष संबंध दाखविता येणार नाही. तथापि केशवसुतांची काव्यविषयक कविता, त्यांची प्रेमविषयक कविता इ.च्या संदर्भात असे म्हणता येईल की या सर्व कवितेमागे व्यक्तिस्वातंत्र्याचे मूल्य आहे व म्हणून अप्रत्यक्षपणे त्या कविता उदारमतवादी विचार-सरणीशी संबंधित आहेत. याचा अर्थ असा की, कोणत्याही कवीच्या काव्यामागे असणाऱ्या विचारसरणीविषयी विधान करायचे झाल्यास कवीच्या काव्यामागे असणारा मूल्यभाव, त्या मूल्यभावाचा कवीच्या

जीवनविषयक जाणिवेशी असणारा संबंध व त्याद्वारे विशिष्ट विचार-सरणी असा प्रवास करणे आवश्यक ठरते.

कवीच्या कवितेचा व विचारसरणीचा संबंध पाहात असताना आणखीही एक मुद्दा ध्यानात घेणे आवश्यक आहे. कोणत्याही विचार-सरणीतील विविध तत्त्वांनुसार व्यावहारिक कृती घडत असल्या तरी काव्याच्या संदर्भात कोणत्याही विचारसरणीतील विशिष्ट भागालाच महत्त्व प्राप्त होते. कोणत्याही विचारसरणीतील जी मूल्ये व्यक्तीचे व्यक्ती म्हणून असणारे महत्त्व, व्यक्ती-व्यक्तीतील परस्परसंबंध याविषयी भावनात्मक प्रतिक्रिया सिद्ध करण्यास उपयुक्त ठरतात त्यांचाच काव्याच्या संदर्भात प्रभाव पडतो. माणसाचे माणूसपण शोधण्यासाठी ज्या मूल्यांचे साहाय्य होते त्यांचाच काव्याच्या संदर्भात संबंध येतो. आधुनिक मराठी साहित्याच्या उदाहरणाने हा मुद्दा स्पष्ट होईल. एकोणिसाव्या शतकापासून महाराष्ट्राला उदारमतवाद, जहाल राष्ट्रवाद, गांधीवाद व मार्क्सवाद या चार प्रमुख विचारसरणींचा परिचय झाला. महाराष्ट्राचे सामाजिक राजकीय जीवन या विचारसरणींनी संस्कारित झाले. विशिष्ट कालखंडात टिळकांचा जहाल राष्ट्रवाद राजकीय क्षेत्रात प्रभावी ठरला. परंतु साहित्यनिर्मितीला प्रेरक ठरला तो आगरकरांचा उदारमतवाद* याचे कारण आधुनिक साहित्याचे केंद्र असलेल्या माणसाच्या अस्तित्वाविषयी माणसा-माणसातील परस्परसंबंधांविषयी भावनात्मक प्रतिक्रिया सिद्ध करण्यासाठी उदारमतवाद अधिक प्रेरक होता हेच आहे. साहित्यनिर्मिती व विचारसरणी यांच्यातील संबंधांचे हे स्वरूप पाहिले म्हणजे कोणत्याही विचारसरणीचा व साहित्यनिर्मितीचा संबंध पाहताना त्या विशिष्ट विचारसरणीच्या पूर्ण संकल्पनात्मक व्यूहापेक्षा साहित्यनिर्मितीला उपकारक ठरणाऱ्या घटकांकडे लक्ष देणेच प्रस्तुत ठरणारे असते हे लक्षात येईल.

---

* हरिभाऊ आपटे, केशवसुत व कोल्हटकर यांच्या लेखनावरील हा प्रभाव सहज जाणवण्यासारखा आहे.

मार्क्सवाद ही एक सर्वंकष विचारसरणी आहे. द्वंद्वात्मक भौतिकवाद हा मार्क्सवादी विचारसरणीचा पाया आहे आणि या विचारसरणीच्या आधारे मानवी संस्कृतीच्या विकासाच्या विविध अंगांचे आकलन शक्य होणारे आहे. मानवी इतिहासाचा विकासक्रम कसा आहे? भविष्य-काळात त्याला कसे वळण मिळू शकेल? त्यासाठी कोणते डावपेच आखावे लागतील? वास्तवाच्या विविध अंगांसंबंधी कोणत्या भूमिका घ्याव्या लागतील इ. विषयीच्या बौद्धिक ज्ञानाचा उपयोग जीवनातील प्रत्यक्ष संघर्षासाठी होणारा आहे. परंतु साहित्यनिर्मितीच्या संदर्भात या बौद्धिक ज्ञानाचा उपयोग होण्यासारखा नाही. या सर्व आकलना-तून माणूस व माणसांचे जग याविषयी जो एक भावनात्मक कल व्यक्त होतो तोच साहित्यनिर्मितीच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचा आहे.

कार्ल मार्क्स यांनी मानवी इतिहासाचे गूढ उकलण्याची एक पद्धत दिली हे खरे. परंतु त्यातूनच माणसाची सृजनशीलता, त्याचे माणूसपण याविषयी देखील आपला दृष्टिकोन व्यक्त केला. भोवतालच्या सर्व मानवी वास्तवाचा निर्माता माणूस आहे. आणि आपल्या श्रमातून त्याने ही सर्व निर्मिती केली आहे. माणूस आपल्या सृजनशीलतेच्या बळावर भोवतालचे जग बदलू शकतो, आपल्या स्वभावाशी सुसंवादी बनवू शकतो, हा विश्वास मार्क्स यांनी दिला. माणसाचे एकलेपण खरे नाही. व्यक्ती म्हणून माणसाचा जन्म होत असला तरी समाजातच माणसाला माणूसपण प्राप्त होते. म्हणूनच व्यक्ती, समष्टी हे परस्पर विरोधक नसून परस्पर पूरक आहेत ही दृष्टी मार्क्सवादी विचारसरणीत अभिप्रेत आहे. माणसाला पूर्ण जीवन जगायला मिळाले पाहिजे. त्याची सौंदर्यदृष्टी, कल्पकता, भावनात्मकता या साऱ्याचे पोषण होईल अशा पूर्ण जीवनाचा त्याला लाभ झाला पाहिजे. हे स्वप्न मार्क्स यांनी दिले आहे. आणि हे पूर्ण होण्यासाठी भौतिक पाया आवश्यक आहे याची जाणीव मार्क्स यांनी दिली. आहे. वर्तमान समाजरचनेत माणसाला

केवळ साधनांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. आपण निर्मिलेल्या भौतिक वस्तूंचा तो केवळ दास बनला आहे. माणसाने निर्मिलेली संपत्तीच त्याची नियंत्रक बनली आहे आणि त्यामुळेच माणूस अ-मानुष बनला आहे. ही अ-मानुषता दूर करून आपल्या स्वत्त्वाची ओळख करून घेण्याचे सामर्थ्यही माणसाच्याच हातात आहे असे मार्क्स यांनी सांगितले आहे.

माणूस व वर्तमान या विषयीचा हे मार्क्सवादी दृष्टीकोन पाहिला तर (Romantic) वृत्तीतूनही वर्तमानाविषयी व माणसाविषयी काहीसे या प्रकारचे आकलन शक्य आहे असे म्हणता येईल. (म्हणूनच मार्क्सवादी दृष्टीकोनामागे एक (Romantic) वृत्ती आहे असे म्हटले जाते. काही अंशी हे खरेही आहे. आणि साहित्याला प्रेरक ठरणारा मार्क्सवादातील गाभा मूलतः हाच आहे) परंतु (Romantic) वृत्तीतून निर्माण होणारा विचार व्यक्तिकेंद्रित असतो. समाज विरूद्ध व्यक्ती असे द्वंद्व अनेकदा तेथे अभिप्रेत असते. सहाजिकच सर्वांतून मुक्त व्हायचे म्हणजे सामाजिकतेपासून पळून जायचे अशी तेथे साधारणतः कल्पना असते. वास्तवापेक्षा वास्तवापलिकडच्या अमूर्त कल्पनेत रमण्याची तेथे वृत्ती असते. माणसातील माणुसकी, त्याची सृजनशीलता यांना तेथे वास्तवाचा आधार नसतो. त्या केवळ अमूर्त कल्पना असतात. या कल्पनांची पूर्ती या मानवी जगात नव्हे तर या जगापलीकडे व्हायची असते. म्हणूनच या वृत्तीच्या कवींना या जगात जगणे हा बोजा वाटतो. त्यांना हे जग नुसते अ-मानुष वाटते एवढेच नव्हे, तर ते मानुष होण्याची कोणतीही शक्यता जाणवत नसते. सहाजिकच एक प्रकारचे नैराश्य, औदासित्य हाच (Romantic) वृत्तीच्या व्यक्तीचा स्थायीभाव असतो. (Romantic) वृत्तीतून जीवनाकडे पहाण्याचे हे भावनात्मक कल आहेत. मार्क्सवादी विचारसणीच्या संस्काराने हे कल बदलू शकतात. मार्क्सवादी विचारसरणीचा संस्कार झालेल्या कवीमनाला व्यक्ती-समष्टी संबंधातील

परस्परावलंबित्वाचे अधिक भान प्राप्त होणे शक्य असते. सर्व मानवी मूल्यांना वास्तवात आधार शोधण्याची वृत्ती त्याच्या ठिकाणी निर्माण होणे शक्य असते. असे कवीमन अमूर्त कल्पनांत नव्हे तर वास्तवावर अधिष्ठित असणाऱ्या कल्पनात रमण्याची शक्यता निर्माण होते. Romantic वृत्ती व मार्क्सवादी दृष्टी या दोघांनीही मानवी जीवनाच्या परिपूर्णतेची आकांक्षा असली, त्या दृष्टीने दोहोंच्या स्वप्नात समानता वाटत असली तरी मार्क्सवादी दृष्टीने संस्कारित झालेल्या कवीमनाच्या दृष्टीने या स्वप्नाची पूर्तता याच मानवी जगात व्हायची असते. या जगापासून दूर जाऊन नव्हे, तर या वास्तवाला वळण लावून आपले स्वप्न साकार होईल असा त्याचा विश्वास असतो. साहजिकच भविष्यकालाविषयी एक आशावादी वृत्ती त्याच्या ठिकाणी निर्माण होते. ('पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावी काल ' या सूत्रावर तो आधारित नसतो, तर भोवतालचे वास्तव व माणसाचे सामर्थ्य हा त्याचा आधार असतो.) म्हणूनच जगणे ही त्याला लादलेली गोष्ट वाटत नाही, तर आजचे कष्टप्रद जगणेही पुढील उन्नत, उदात्त जीवनाचे साधन असल्याची जाणीव निर्माण झाल्याने त्याच्या ठायी एक समतोल वृत्ती निर्माण होण्याची शक्यता असते. या सर्व जगाचे केंद्र माणूस आहे ही श्रद्धा मार्क्सवाद व्यक्तीच्या ठायी निर्माण करू शकतो. मार्क्सवादी विचारसरणीच्या संस्काराने निर्माण होणारे हे 'भावनात्मक कल ' आहेत. ही एक वृत्ती आहे. या वृत्तीमुळे कवीची निर्मिती प्रभावित होऊ शकते. त्यामुळे कवीच्या काव्याचा आशय, प्रतिभासृष्टी, रूप हे सर्वच संस्कारित होऊ शकते.

कोणत्याही विचारसरणीतून निर्माण होणारी अशी वृत्तीच काव्य-निर्मितीला प्रेरक ठरते. कोणत्याही विचारसरणीच्या कवीमनावरील संस्काराचे स्वरूप हे असे असते.

तथापि कोणत्याही विचारसरणीचा एक संकल्पनाव्यूह असतोच.

या संकल्पनांनी, विचारसरणीतील काही तत्त्वांनी कवीमन प्रभावित होऊ शकते. परंतु कोणत्याही विचारसरणीतील अमूर्त तत्त्वांना, तार्किक मांडणीला वा संकल्पनात्मक व्यूहाला कवितेत प्रत्यक्ष स्थान मिळू लागले, किंवा त्यामुळे कवीची निर्मिती प्रभावित होऊ लागली; म्हणजे त्या रचनेला बोधवादी वा प्रचारी रूप येण्याचा धोका असतो.

या सर्व विवेचनाचा अर्थ असा की कोणत्याही विचारसरणीचा व काव्यनिर्मितीचा संबंध दोन प्रकारे येऊ शकतो.

१) विचारसरणीचा संकल्पनात्मक व्यूह व तार्किक मांडणी याद्वारे;

२) त्या विचारसरणीमुळे निर्माण होणारे भावनात्मक कल— याद्वारे.

यापैकी दुसरा संबंध हा अधिक सर्जक व काव्याच्या स्वभावाशी अधिक सुसंगत असतो. पहिला संबंध केवळ बौद्धिक पातळीवरील असल्याने तो काव्याच्या संदर्भात उपरा ठरण्याची शक्यता असते. परंतु दुसरा संबंध ती विशिष्ट विचारसरणी कवीच्या व्यक्तिमत्वाचा, त्याच्या जाणीवेचा भाग झाल्याशिवाय संभवतच नाही. म्हणूनच तो स्वाभाविक असतो. कवीच्या काव्यातून व्यक्त होणाऱ्या विचारसरणीचा व पर्यायाने कवीच्या व्यक्तिमत्वाचा शोध घ्यायचा झाल्यास हा दुसऱ्या प्रकारचा संबंध पाहणेच योग्य ठरणारे असते.

मार्क्सवाद ही विचारसरणी घेतली तरी तिचा एक संकल्पनाव्यूह आहे व त्यातून निर्माण होणारे भावनात्मक कलही आहेत. शिवाय मार्क्सवाद हे जग बदलण्याचे तत्त्वज्ञान असल्यामुळे त्यासाठी आवश्यक अशा डावपेचांचा, दैनंदिन राजकारणातील घोषणांचाही तेथे संबंध येतो. तेव्हा सुर्वे यांची कविता आणि मार्क्सवाद यांचा संबंध पाहायचा झाला तर पहिला प्रश्न असा विचारायला हवा की, हा संबंध कोणत्या प्रकारचा आहे ? आणि या प्रश्नाचे उत्तर द्यायचे तर असे म्हणावे लागेल की तो दोन्ही प्रकारचा आहे.

यातील पहिल्या प्रकारच्या संबंधांच्या अनेक खुणा सुर्वे यांच्या कवितेत दाखविता येण्यासारख्या आहेत. 'ऐसा गा मी ब्रह्म' या संग्रहातील 'चार शब्द' या कवितेपासूनच त्याची सुरुवात करता येईल. या कवितेतील 'कामगार आहे मी तळपती तलवार आहे' ही कल्पना मार्क्सवादी विचाराच्या प्रत्यक्ष प्रभावातून निर्माण झाली आहे. याच संग्रहातील—

'श्रम आणि सत्य। सौंदर्याची गाथा
सारे झूट मिथ्या। याच लोकी
घट्टा ज्यांचे हाती। त्यांचे असे राज्य
अन्य दुजे त्याज्य। बलवंत' (ऐसे दिसे चित्र)

माझ्या पाठीमागे कारखाने आले
खडे सज्ज झाले गवताचे भाले (पुन्हा भेटू सखे)

'हे कारखाने गिरण्या आसुचया दुनियेचे अलंकार
लक्ष तारे माळून मोरपिसे खोवून सौन्दर्य इथून येणार
ह्या झोतभट्टया, गोद्या, लोहरुळ हे गजबजलेले रस्ते
हा फौजफाटा निघणार शस्त्रे घासून दारिद्र्याच्या सहाणेवर'
(कणिका)

'विराट श्रमसूर्याच्या कक्षेत
स्वतःस उजळित मुक्त फिरावे' (त्याने यावे)

कसतो आम्ही जमीन आम्ही हिचे राजे
साक्ष देतील इथली दडलेली बीजे
कोण कुठून आलात तुम्ही बडे राजे
चालते व्हा गुमान

बांधावर लावून निशाण
खसखसा कापूया धान (सराई)

तोडू जुलुमाचे काच, हे रावणी फास
एकीचे निशाण हाती (डोंगरी शेत)
निर्मून आम्ही धन सारं, मालक असून झालो चोर
(गिरणीची लावणी)

यासारख्या काव्यपंक्ती पाहिल्या तर त्यामागे प्रत्यक्ष मार्क्सवादी विचार-सरणी आहे हे सहज जाणवण्यासारखे आहे. 'ऐसा गा मी ब्रह्म' या संग्रहात केवळ अशा काही काव्यपंक्तीच नव्हे तर संपूर्ण कविताही मार्क्सवादी विचारसरणीतील काही विचारांच्या आधाराने उभ्या आहेत. (उदा. 'युगस्वामी,' 'आमुची दुनिया') प्रत्यक्ष विचारांच्या प्रभावामुळे कवितेच्या एकसंध रूपाला व कवितेतील अनुभवाला बाधा आल्याची उदाहरणे या संग्रहात दाखविता येण्यासारखी आहेत. परंतु सुर्वे यांच्या एकूण कवितेत अशा जागा अल्प आहेत. यांच्या कवितेत काही ठिकाणी मार्क्सवादी विचारसणीतील प्रत्यक्ष विचारांचा प्रभाव जाणवत असला तरी त्यांची एकूण कविता या अंगाने निर्माण होताना दिसत नाही, हे लक्षात घेण्याजोगे आहे. 'ऐसा गा मी ब्रह्म' ते 'जाहीरनामा' या प्रवासात सुर्वे यांच्या कवितेतील मार्क्सवादी विचारसरणीच्या अशा प्रत्यक्ष प्रभावाच्या जागा कमी होत जातात असे दिसते. 'माझे विद्यापीठ' या संग्रहातील 'मुंबई' या कवितेत कामगारांना उद्देशून –

'मित्र हो ! तुम्हीच मुंबईच्या घडणीतील अमृतअक्षर' असे उद्‌गार येतात किंवा मुंबईला उद्देशून 'घडवून गेला माझा बाप, तुजसम स्फूर्तिशाली कविता' असे शब्द येतात, तेव्हा हा विचारसरणीचा प्रभाव आहे असे म्हणता येते. तसेच 'जाहीरनामा' या संग्रहात–

म्हणून मी उठलो
वस्तीच्या बाहेर आलो
कारखान्यांच्या कानात पुटपुटलो
"आता आपणाला कूच करायला हवे !" (झेप)

'भाकरीच्या पुढे
का गा ग्रंथगर्व'

.....

'संपलाच नाही
भाकरीचा मार्ग
ग्रंथातले स्वर्ग
कशापायी' (का गा ग्रंथगर्व)

अशा काव्यपंक्ती पाहावयास मिळतात तेव्हा या काव्यपंक्ती मार्क्सवादी विचारसरणीच्या प्रत्यक्ष प्रभावातून आल्या आहेत, असे म्हणता येते. 'ऐसा गा मी ब्रह्म' या संग्रहाप्रमाणेच 'माझे विद्यापीठ' या संग्रहातील 'लालबाग' ही कविता व 'जाहीरनामा' या संग्रहातील 'कावळे' ही कविता राजकीय विचारामधून निर्माण झाली आहे असे दाखविता येणेही शक्य आहे. परंतु 'ऐसा गा मी ब्रह्म' ते 'जाहीरनामा' या प्रवासातील ते अपवाद आहेत, असेच म्हणावे लागेल. या प्रवासात सुर्वे यांच्या कवितेमागे असणारा मार्क्सवादी विचारसरणीचा प्रभाव वेगळे रूप धारण करतो असेच म्हणावे लागेल. 'ऐसा गा मी ब्रह्म' मधील ऐसे दिसे चित्र' व 'जाहीरनामा' मधील 'माझ्या देशाच्या नोंदवहीत माझा अभिप्राय' या संदर्भात पाहण्यासारख्या आहेत. दोन्ही कवितांमध्ये भावी समाजाचे चित्र आहे. एका प्रकारे ते कवीमनाचे स्वप्न आहे. दोन्ही कवितांमधील हे स्वप्न मार्क्सवादी विचारांनीच भारलेले आहे. परंतु 'ऐसे दिसे चित्र' या कवितेतील वैचारिकता व 'माझ्या देशाच्या नोंदवहीत माझा अभिप्राय' या कवितेतील वैचारिकता एकाच प्रकारची नाही हे सहज जाणवण्यासारखे आहे. याचा अर्थ असा की सुर्वे यांच्या कवितेमागे काहीवेळा मार्क्सवादी विचारसरणी प्रत्यक्षपणे जाणवत असली आणि म्हणून सुर्वे यांच्या कवितेचा व मार्क्सवादी विचारसरणीच्या संकल्पनाव्यूहाचा प्रत्यक्ष संबंध आहे असे म्हणता आले तरी तो संकल्पनाव्यूह त्यांच्या कवितेला प्रत्यक्ष प्रेरक ठरला असे म्हणता येत नाही. म्हणूनच मार्क्सवादी विचारसरणीचे पद्यरूप अशी कळा त्यांच्या कवितेला येत नाही.

परन्तु याचा अर्थ सुर्वे यांची कविता त्या विचारसरणीपासून मुक्त आहे असा मात्र नव्हे. या विचारसरणीतून निर्माण होणाऱ्या भावनात्मक कलाने-वृत्तीने ही कविता पूर्णपणे भारलेली आहे. कवीची कविता ही वास्तवाविषयीची त्याची प्रतिक्रिया आहे असे म्हटले की, कवीच्या वृत्तीने ती भारली जाणे स्वाभाविकच ठरते. सुर्वे यांच्या कवितेच्या वैशिष्ट्यपूर्णतेचा मार्क्सवादी विचारसरणीशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध आहे.

आपल्या पहिल्या संग्रहातील पहिल्याच कवितेत सुर्वे 'कामगार आहे मी तळपती तलवार आहे' अशी स्वतःची जी ओळख करून देतात व जी उघड वर्गीय भूमिका घेतात ती मार्क्सवादी विचारसरणीच्या संस्काराने निर्माण झालेल्या भावनात्मक कलाची द्योतक आहे हे स्पष्टच आहे. 'कामगार आहे' हा उल्लेख येथे केवळ वस्तुस्थितीदर्शक नाही, तर आत्मविश्वासाचा व ठामपणाचा प्रत्यय देणारा असा हा उल्लेख आहे. या उद्‌गारामागील मनःपूर्वकतेमुळेच त्याला काव्यात्मता प्राप्त झाली आहे आणि या शब्दामागे असणाऱ्या मनःपूर्वकतेला, आत्मविश्वासाला मार्क्सवादी विचारसरणी हा आधार आहे. सुर्वे यांच्या काव्यप्रांतातील प्रवासात ही उघड वर्गीय भूमिका सातत्याने राहिली नाही. परंतु त्यांच्या काव्यांतर्गत अनुभवाचे संदर्भविश्व कष्टकऱ्यांचे जग हेच राहिले; त्यांच्या कवितेतून कष्टकऱ्यांच्या उपेक्षितांच्या जगाविषयीची एक सहभावना प्रकट होत राहिली; याचे कारण सुर्वे हे कष्टकऱ्यांच्या जगातील कवी आहेत एवढेच नाही. समाजाच्या ज्या थरात कवी जन्माला येतो व वावरतो, तेच जग त्याच्या काव्यांतर्गत अनुभवाचें संदर्भविश्व ठरते हे तत्त्व काव्याच्या संदर्भात निरपवादपणे स्वीकारता येण्यासारखे नाही. कवीच्या काव्यांतर्गत अनुभवाचे संदर्भविश्व त्याच्या वृत्तीनुसार ठरत असते. तसेच कष्टकऱ्यांच्या जगात जन्माला आले की त्या जगाविषयी आत्मियताच वाटली पाहिजे असाही नियम नाही. कवीच्या

भोवतालचे मानवी जग व कवी यामधील नातेही कवीच्या वृत्ती-नुसार निर्माण होत असते. एकाच समाजगटात वावरणाऱ्या व्यक्तींच्या त्याविषयीच्या वृत्ती भिन्न असू शकतात. म्हणूनच सुर्वे यांच्या कवितांतर्गत अनुभवाचे संदर्भविश्व व त्याच्याकडे पाहण्याची सुर्वे यांची वृत्ती याचे स्पष्टीकरण करताना सुर्वे हे कष्टकऱ्यांच्या जगातील कवी आहेत हे स्पष्टीकरण पुरेसे ठरत नाही. हे कष्टकऱ्यांचे जग सुर्वे यांना स्फूर्तिशाली वाटते. या जगाची कृतिशीलता, निर्मितीशीलता व त्यातून घडणारे माणुसकीचे दर्शन यांनी ते भारावतात. या जगाच्या दैन्याने, दुःखाने ते कळवळतात. या जगाशी ते आपलेपणाने नाते जोडतात. आपल्या काव्यातून कष्टकऱ्यांच्या जगाचे हे दर्शन घडवीत असताना हे जग ते दयेचा विषय बनवीत नाहीत किंवा या जगाच्या दुःखाविषयी स्फोटक आक्रोशही सुर्वे यांच्या कवितेतून जाणवत नाहीत. कष्टकऱ्यांच्या जगाचे राकट, मृदू, सहनशील, स्फोटक असे व्यक्तिमत्व सुर्वे आपल्या कवितेतून साकार करतात. हे सर्व पाहिले म्हणजे सुर्वे हे कष्टकऱ्यांच्या जगाकडे वेगळ्या वृत्तीने पाहणारे कवी आहेत हे सहजच जाणवते. दैन्य-दुःखाकडे केवळ सहानुभूतीने, दयेने पाहणारी ही वृत्ती नाही. माणसाच्या कृतिशीलतेविषयी, निर्मितिशीलते विषयी कुतूहल असणारी अशी ही वृत्ती आहे. कष्टकऱ्यांच्या जीवनात ही कृतिशीलता आहे पण त्याचे मोल होत नाही याबद्दल कळवळणारी ही वृत्ती आहे. (म्हणूनच सुर्वे यांच्या कवितेत भिकारी, किंवा केवळ भणंग यांच्या जगाला स्थान नाही.) यामुळेच मराठी कवितेतील सामाजिक जाणीवेच्या इतर कवितेपेक्षा सुर्वे यांची कविता वेगळी वाटते. सुर्वे यांच्या कवितांतून जाणवणाऱ्या या वेगळेपणाचा मार्क्सवादी विचारसरणीशी संबंध आहे. याचा अर्थ सुर्वे यांनी सर्व मार्क्सवादी तत्त्वज्ञान बौद्धिकदृष्ट्या आकलन केले आहे असा नव्हे, परंतु मार्क्सवादी विचारसरणीच्या संस्कारातून निर्माण होणारे भावनात्मक कल (attitude) हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा भाग झाला आहे. या अर्थाने ही विचारसरणी त्यांच्या काव्याला प्रेरक ठरली आहे.

सुर्वे यांच्या कवितेतील आशावाद हा या वृत्तीचाच एक भाग आहे. या आशावादाचा त्यांच्या कवितेचे वेगळेपण म्हणून अनेकदा उल्लेख केला गेला आहे. मराठी कवितेतील प्रभावी प्रवृत्तींपेक्षा सुर्वे यांची कविता वेगळी होण्याचे ते एक कारण म्हणूनही नोंदवले गेले आहे. परंतु केवळ आशावादी वृत्ती असे म्हणून सुर्वे यांच्या कवितेतून व्यक्त होणाऱ्या आशावादी वृत्तीचे वेगळेपण नेमकेपणाने स्पष्ट होत नाही. आशावाद ही कवीमनाची वृत्ती आहे असे म्हटले तरी आशावाद हा नेहमीच कोणत्या ना कोणत्या श्रद्धेवर उभा असतो. कोणत्याही श्रद्धेवाचून आशावाद संभवतच नाही. देव किंवा दैव यांच्यावरील श्रद्धेतूनही आशावादी वृत्ती निर्माण होणे शक्य असते. तसेच केवळ निसर्गक्रमावरील श्रद्धेतूनही आशावादी वृत्ती संभवते. उदा. तांबे यांच्या कवितेत आढळणाऱ्या आशावादाचा आधार परमेश्वरावरील श्रद्धा हा आहे; तर

> **'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावीकाळ;**
> **बोध हाच इतिहासाचा सदा सर्वकाळ,**
> **कासया वहावी चिंता मनी मग जहाल,**
> **रात्र सरे तेव्हा उगवे दिनही पूर्वेवाटे'**

या कवी विनायक यांच्या उक्तीमधील आशावादाचा आधार निसर्गक्रमावरील श्रद्धा हा आहे. याचा अर्थ असा की, कवितेतून व्यक्त होणाऱ्या आशावादामागे कोणत्या श्रद्धेचा आधार आहे ते पाहिले तर आशावादाचे वेगवेगळे स्वरूप लक्षात येते. आणि आशावाद नव्हे, तर आशावादामागे असणारी श्रद्धा ही कवीमनाच्या वृत्तीची द्योतक असते. सुर्वे यांच्या कवितेतून व्यक्त होणारा आशावाद असा देव, दैव वा निसर्गक्रम यांच्या श्रद्धेवर आधारलेला आहे काय ? असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. सुर्वे यांच्या कवितेतील आशावादाचा आधार कष्टकऱ्यांच्या सामर्थ्यावरील श्रद्धा हा आहे. त्यांच्या कवितेत जेव्हा 'आजच्या'पेक्षा, '--उद्या' सुंदर होणार आहे, असा भाव व्यक्त होतो तेव्हा ते देवदयेने घडणार नसते किंवा निसर्गक्रमानेही होणार

नसते. त्या सुंदर ' उद्या 'ची निर्मिती माणसे आपल्या कृतीने करणार असतात. ही माणसे म्हणजे कष्टकरी असतात. ' ऐसा गा मी ब्रह्म ' मधील पाहिल्या कवितेपासून हे पाहता येण्यासारखे आहे. ' जाहीरनामा ' या संग्रहातील काही कवितांमधून हा आशावाद क्षीण झाल्यासारखा वाटतो हे खरे असले तरी तो नष्ट झालेला नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. तो नष्ट झाला असता तर खंत करण्यासारखे काही शिल्लकच राहिले नसते. परंतु सुर्वे यांचे कवीमन ' जाहीरनामा ' मधील काही कवितांमधून उदासिनतेचे भाव व्यक्त करते. याचे कारण त्याच्या वृत्तीतील आशावाद भंगलेला नाही हेच आहे. म्हणूनच उदासीनतेचे भाव व्यक्त होऊनही ही कविता वैफल्यग्रस्त वाटत नाही. सुर्वे यांच्या कवितेतून व्यक्त होणाऱ्या आशावादाला आधार असणारी ही श्रद्धा त्यांच्यावरील मार्क्सवादी विचारसरणीच्या संस्कारातून घडली आहे असे म्हणता येते.

सामान्य माणसाच्या सामर्थ्यावरील श्रद्धा व मार्क्सवाद यांचा संबंध जोडल्याबरोबर जेथे केशवसुत, कुसुमाग्रज यांसारख्या कवींची आठवण होणे स्वाभाविक आहे. या कवींच्या कवितेतही आशावादाचा आधार, सामान्य माणसाच्या सामर्थ्यावरील श्रद्धा हा आहे असे काही वेळा दाखविता येणे शक्य आहे. (उदा. तुतारी, आगगाडी आणि जमीन) परंतु या कवीमनांची ही वृत्ती आहे असे म्हणण्याइतका हा आशावाद स्थिर नाही. त्यांच्या कवितेतील आशावादाचा आधार, नेहमीच सामान्य माणसाच्या सामर्थ्यावरील विश्वास हाच राहिला आहे असेही म्हणता येण्यासारखे नाही (उदा. कुसुमाग्रजांच्या ' अहि-नकुल ' या कवितेत आशावाद असला तरी तो सामान्य माणसाच्या सामर्थ्यावर आधारलेला नाही). शिवाय त्यांच्या कवितेतील हे ' माणसाचे सामर्थ्य ' काहीसे अमूर्त आहे. त्याला विविक्षित रूप नाही. हे सर्व लक्षात घेतले म्हणजे सुर्वे यांच्या कवितेतील आशावादाचा आधार असणारी श्रद्धा

कशी भिन्न आहे हे ध्यानात येण्यासारखे आहे. आणि म्हणूनच सुर्वे यांच्या कवितेतून जाणवणाऱ्या आशावादी वृत्तीचा संबंध मार्क्सवादी विचारसरणीच्या संस्काराशी आहे असे म्हणता येते.

सुर्वे यांच्या कवितेतून व्यक्त होणारा स्त्रीविषयक दृष्टिकोन हा देखील कवीमनाच्या वृत्तीचाच भाग आहे. स्त्री-पुरुष प्रेम व स्त्री-सौंदर्य यांना काव्यक्षेत्रात किती महत्त्वाचे स्थान आहे हे सर्वपरिचित आहे. मराठी शाहिरी काव्यात स्त्री-देहाला प्राधान्य देऊन काव्यरचना झाली. आधुनिक काळात स्त्री-पुरुष मानसप्रेमाची कल्पना आल्यावर प्रेमकवितेचे वेगळे स्वरूप मराठीत साकार झाले. याच काळात स्त्री चे उदात्तीकरण करण्याचाही प्रयत्न झाला. या सर्व संदर्भात नारायण सुर्वे यांच्या कवितेत येणारी स्त्री आणि स्त्री-पुरुष प्रेम ही वेगळी वाटतात. सुर्वे यांच्या कवितेतील स्त्री कष्टकरी स्त्री आहे, एवढेच त्याचे कारण नव्हे. सुर्वे यांच्या कवितेत स्त्री-पुरुष प्रेमातील मृदुभाव व्यक्त होऊनही ही वेगळेपणाची जाणीव कायम राहते, याचे कारण स्त्रीकडे पाहण्याची या कवीमनाची दृष्टी हे आहे. सुर्वे यांच्या कवितेत स्त्री ही जीवनसंघर्षातील सहकारी, जीवनातील आश्वासक शक्ती म्हणून येते. पण ती आपले माणूसपण कधीही हरवत नाही. सुखद अनुभव देणारी सुंदर वस्तु, उदात्त देवता किंवा अमूर्त शक्ती यासारखे स्त्रीकडे पाहण्याचे दृष्टिकोन टाकून, सुर्वे यांचे कवीमन स्त्रीकडे केवळ माणूस म्हणून पाहू शकते, आणि मानवी जीवनातील एक अनुभव हे स्थान प्रेमानुभवाला देऊ शकते, हे पाहिले म्हणजे कवीमनाच्या या वृत्तिविशेषाचे वेगळेपण ध्यानात येते. सुर्वे यांच्या कवितेतील या वेगळेपणाचा संबंध मार्क्सवादी विचारसरणीच्या संस्कारांशी निगडित आहे.

सुर्वे यांच्या कवितेतून सतत एक संघर्षशील वृत्तीचा प्रत्यय येत राहतो. व्यक्ती-समष्टी संबंधाचे एक भान सतत जाणवत राहते. स्वतःचे 'मी' पण कायम ठेवून 'आम्ही' शी एकरूप होण्याची एक वृत्ती

जाणवते. म्हणूनच आत्मनिष्ठा व समूहनिष्ठा यांचे द्वंद्व सुर्वे यांच्या कवितेत जाणवत नाही. समोरचे वास्तव अप्रिय असले तरी टाळण्यासारखे नाही. ते अपरिहार्यपणे स्वीकारले पाहिजे; त्याच्याशी संघर्ष करीत ते बदलले पाहिजे; असे मानणारी ही वृत्ती आहे. म्हणूनच ' दोन दिवस वाट पाहाण्यात गेले; दोन दुःखात गेले ' अशी कथा सांगत असताना ' झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले' अशी प्रतिक्रिया त्यांच्या कवितेत सहज येऊन जाते. ' आज 'च्या दुःखातून आपण ' उद्या 'च्या संघार्षासाठी शक्ती कमावत आहोत, काही शिकत आहोत असा भाव सुर्वे यांच्या कवितेतून व्यक्त होत रहातो. मानवी जीवनाचे, व्यक्ती-समष्टी संबंधाचे, आजच्या दुःखांचे व उद्याच्या सुखाचे समतोल भान असणारी अशी ही वृत्ती आहे. सुर्वे यांच्या कवितेमागे असणाऱ्या या वृत्तीमुळेच त्यांची कविता दुःखदर्शनाने हळवी वा प्रक्षोभक बनत नाही किंवा दुःख दर्शन टाळून नटवी होत नाही. सुर्वे यांच्या कवितेमागे असणाऱ्या या वृत्तीचा आधार मार्क्सवादी विचारसरणीचे संस्कार हा आहे.

सुर्वे यांच्या कवितेतील क्रांतिविषयीची वृत्तीही या संदर्भात पाहण्यासारखी आहे. क्रांती म्हटले की, रक्तपात, हिंसा, प्रचंड उलथापालथ असे काहीसे चित्र सर्वसामान्यपणे डोळ्यासमोर उभे राहते. तांबे यांची ' रुद्रास आवाहन ' व कुसुमाग्रजांची ' आगगाडी आणि जमीन ' या कविता या संदर्भात सहज डोळ्यासमोर येण्यासारख्या आहेत. क्रांती या कल्पनेकडे कवीमन कोणत्या वृत्तीने पाहते त्याचे ते दर्शक आहे. या कवितांमधून क्रांतीचे एक रौद्र-भीषण असे स्वरूप डोळ्यासमोर येते. उलट सुर्वे यांच्या कवितेत संघर्षशील वृत्ती असूनही असे भाव सहसा व्यक्त होत नाहीत. ' तेवढ्या दर्शनाने ' (ऐसा गा मी ब्रहम) आणि ' माझे शब्द ' (माझे विद्यापीठ) या सुर्वे यांच्या कवितांतून क्रांतीच्या, क्रांतिवीरांच्या आगमनाची चित्रे व्यक्त झाली आहेत. या कवितेतील

शब्दरचनेमधून जो हळुवारपणा जाणवतो, एक प्रकारच्या स्वैर मुक्तपणाचा जो भाव व्यक्त होतो व या शब्दरचनेतून ज्या भावघनतेची प्रतीती येते ती लक्षात घेतली म्हणजे सुर्वे यांच्या कवितेतील ही चित्रे पूर्णपणे मानवी भावांनी भारलेली आहेत असे म्हणावेसे वाटते. येणारी क्रांती या कवीमनाला रौद्र-भीषण नव्हे तर मुक्त, हळुवार व प्रसन्न दिसते. 'जाहीरनामा' या संग्रहातील 'माझ्या देशाच्या नोंदवहीत माझा अभिप्राय' या कवितेच्या अखेरीस

'हे; आणि असे कितीतरी आठवून
अंत:करणात पेट्रोलसारखे साठवून चाललोत.'

असे शब्द येतात. परंतु पुढे भडका उडत नाही. तर—

'जर कधीकाळी,
अस्वस्थसे आम्ही
देहाच्या वाती वळून, प्रज्वलित करून
तुझ्या निरांजनात पाळवून
एका नव्या क्रांतीकडे, नव्या प्रकाशाकडे
आमचे घोडे उधळले.....'

असे शब्द येतात व त्यामुळे पावित्र्य, त्याग, मुक्त स्वैरपणा हेच भाव व्यक्त होतात. क्रांतीकडे जाण्याचे हे चित्र प्रक्षोभक, रौद्र भीषण न होता, पुन्हा संयमित व प्रसन्नच होते. सुर्वे यांच्या कवितेत कुठेही विध्वंसकतेचा सूर लागत नाही. क्रांती, क्रांतिवीर यांच्याकडे पाहण्याची कवीमनाची ही दृष्टी वैशिष्ट्यपूर्ण आहे. भोवतालच्या वास्तवाविषयीचे समतोल भान आणि माणसाविषयी वाटणारी आस्था हाच या दृष्टीचा आधार आहे.

या सर्व विवेचनाचा अर्थ असा की, सुर्वे यांच्या कवितेतून त्यांच्या कवीमनाच्या वृत्ती म्हणून ज्या जाणवतात, त्यांचा मार्क्सवादी विचारसरणीशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध आहे. भोवतालचे वास्तव सुर्वे

यांच्या कवीमनाला मान्य नाही. हे अप्रिय वास्तव ते नाकारतात; परंतु हे वास्तव नाकारत असताना ते ज्यासाठी नाकारायचे त्या नव्या वास्तवाचे चित्रही आपल्या कवितेतून सुर्वे साकार करतात. (सुर्वे यांच्या कवितेतील सहानुभाव व संघर्ष हा या नकार-होकाराशी निगडित आहे.) हा नकार-होकार कवीमनाच्या जीवनविषयक जाणीवेचा भाग आहे. या नकार-होकारामागे असणारी मूल्ये व भावनात्मक कल पाहिले तर त्यांचा मार्क्सवादी विचारसरणीशी असणारा संबंध सहज लक्षात येण्यासारखा आहे. सुर्वे यांच्या कवितेतून ही जीवनविषयक जाणीव सातत्याने व अखण्डपणे व्यक्त होत असल्यामुळे सुर्वे यांची कविता मार्क्सवादी विचारसरणीमुळे निर्माण होणाऱ्या भावनात्मक कलाने भारलेली आहे असे म्हणता येते.

या जीवनविषयक जाणीवेमुळे सुर्वे यांचे कवीमन भोवतालच्या जगाकडे थोडे वेगळेपणाने पाहू शकले; कष्टकऱ्यांच्या जगाचे एक अपरिचित रूप आपल्या कवितेद्वारे व्यक्त करू शकले. आणि त्यामुळेच त्यांची कविता रूढ मराठी कवितेहून वेगळी झाली हे पाहिले म्हणजे मार्क्सवादी विचारसरणी सुर्वे यांच्या निर्मितीशीलतेला कशी प्रेरक ठरली हे सहज लक्षात येते.

मार्क्सवादी विचारसरणी सुर्वे यांच्या काव्यलेखनाला प्रेरक ठरली याचा अर्थ त्यामुळे सुर्वे कवी झाले असा मात्र नाही. कोणतीही विचारसरणी निर्मितीशील मन घडवू शकत नाही. निर्मितीशील मन मुळात असावे लागते. निर्मितीशील असणाऱ्या मनावर विचारसरणीचे केवळ संस्कार होऊ शकतात; त्याद्वारे भोवतालच्या वास्तवाकडे पाहण्याचे भावनात्मक कल निर्माण होऊन निर्मिती संस्कारित होऊ शकते एवढेच. तेव्हा सुर्वे यांच्या 'कवी' असण्याचा आणि मार्क्सवादी विचारसरणीचा संबंध नाही, हे स्पष्टच आहे. परंतु सुर्वे यांनी जी कविता लिहिली, त्या कवितेतून व्यक्त होणाऱ्या आशयामागे मार्क्सवादी मूल्ये व भावनात्मक

कल आहेत. म्हणून त्यांच्या कवितेचा विचार करताना मार्क्सवाद अप्रस्तुत ठरत नाही.

सुर्वे यांच्या 'कवी' असण्याच्या संदर्भात मार्क्सवाद अप्रस्तुत आहे तसाच सुर्वे यांची कविता ही कविता आहे की नाही हे ठरविण्याच्या संदर्भात म्हणजेच कवितेचे कलात्मक मूल्य ठरविण्याच्या संदर्भातही मार्क्सवाद अप्रस्तुत आहे. परंतु सुर्वे यांच्या कवितेतील आशयाचे वेगळेपण, भोवतालच्या वास्तवाकडे पाहण्याची वेगळी दृष्टी आणि त्यामुळे मराठी कवितेच्या क्षेत्रात या कवितेला प्राप्त होणारी वैशिष्ट्यपूर्णता पाहताना मार्क्सवाद केवळ प्रस्तुत नव्हे तर अपरिहार्य आहे असे म्हणावे लागते.

सुर्वे यांची कविता आणि मार्क्सवाद यांचा विचार करताना आणखी एका प्रश्नाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. आणि तो प्रश्न म्हणजे मार्क्सवाद सुर्वे यांच्या कवितेला जसा प्रेरक झाला तसाच तो त्यांच्या कवितेच्या मर्यादांनाही कारणीभूत झाला की नाही ? सुर्वे यांच्या कवितेला मार्क्सवाद कसा प्रेरक ठरला याचे विस्तृत स्पष्टीकरण मराठी समीक्षेत झाले नसले तरी मार्क्सवादी श्रद्धांमुळे सुर्वे यांच्या कवितेला कशा मर्यादा पडतात या संबंधीचे उल्लेख सुर्वे यांच्यावर झालेल्या लेखनात पाहावयास मिळतात. सुर्वे यांची कविता वैशिष्ट्यपूर्ण असली तरी तिला मर्यादा आहेत हे खरेच आहे. परंतु एखाद्या कवीच्या काव्यातील मर्यादा विशिष्ट विचारसरणीच्या श्रद्धांमुळे आल्या असे म्हणणे काव्याच्या संदर्भात योग्य ठरणारे नाही. ज्याप्रमाणे कोणतीही विचारसरणी निर्मितीशील मन घडवू शकत नाही, त्याचप्रमाणे ती निर्मितीचे स्वरुपही निर्धारित करू शकत नाही; हे येथे लक्षात घेणे आवश्यक आहे. (आपल्या संत कवितेच्या उदाहरणातूनही याचे स्पष्टीकरण मिळण्यासारखे आहे. सर्व संतकवींच्या श्रद्धा समान असल्या तरी त्यांच्या निर्मितीचे स्वरूप त्या श्रद्धांनी निर्धारित झालेले नाही. प्रत्येक

संतकवीचे सामर्थ्य व मर्यादा भिन्न आहेत.) सुर्वे यांच्या कवितेतील आशयामागे मार्क्सवादी मूल्ये आहेत, काही श्रद्धा आहेत, हे खरे असले तरी मार्क्सवादी कविता म्हटली की ती सुर्वे यांच्या कवितेसारखीच असली पाहिजे असे म्हणता येणार नाही. सुर्वे यांच्या जाणीवेच्या कक्षेत न येणारे, त्यांच्या मनाला न भावणारे असे कितीतरी अनुभव व अनुभवांचे अर्थ मार्क्सवादाचा संस्कार असणाऱ्या निर्मितीशील मनाला जाणवणे शक्य आहे. या वेगळ्या अनुभवांचा वेगळा आविष्कारही असंभवनीय नाही. मार्क्सवादी दृष्टीने जग पाहाणाराला सर्व काही सोपे आणि सरळच दिसते असेही नाही किंवा आपल्या अनुभवांचे अमूर्तीकरण (abstraction) त्या दृष्टीला करताच येणार नाही असेही नाही. याचा अर्थ असा की, मार्क्सवादी विचारसरणीच्या संस्कारामुळे कवितेला कविता म्हणून सामर्थ्य प्राप्त होण्याची जशी शक्यता नाही, तशीच कवितेला मर्यादा येण्याचीही शक्यता नाही. म्हणूनच सुर्वे यांच्या कवितेला ज्या ज्या मर्यादा आहेत किंवा सुर्वे यांच्या कवितेत जे जे नाही त्याचा संबंध मार्क्सवादाशी नसून, सुर्वे यांच्या निर्मितीशील मनाशी आहे. सुर्वे यांच्या कवितेच्या मर्यादा या त्यांच्या निर्मितीशील मनाच्या मर्यादा आहेत. मार्क्सवादी श्रद्धांवर आधारलेल्या कवितेत त्या अपरिहार्य आहेत असे समजण्याचे कारण नाही.


मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 23/12/
शाखा (स्थळ प्रत)

नारायण सुर्वे
यांची
कविता

सहावे

नारायण सुर्वे यांच्या कवितेच्या संदर्भातील आतापर्यंतचे विवेचन म्हणजे त्यांच्या कवितेचे सामर्थ्य व वैशिष्ट्यपूर्णता यांचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न होता. म्हणूनच आतापर्यंत एकूण मराठी कवितेचा संदर्भ शक्यतो टाळून विवेचन केले आहे. परंतु कोणताही कवी काव्य-लेखन करीत असताना विशिष्ट वाङ्मयीन परंपरेच्या संदर्भातच कार्य करीत असतो. एखाद्या कवीने परंपरेला विरोध केला असला तरीही त्या विरोधाचा संदर्भ परंपरा हा असल्याने, त्याचे परंपरेशी नाते असतेच. शिवाय परंपरेला विरोध करीत केलेली निर्मिती पुन्हा त्या परंपरेचाच भाग बनत असल्याने, तो कवी परंपरेशी संबंधित होतच असतो. म्हणूनच कवीच्या काव्याचा विचार करताना वाङ्मयीन परंपरेचा हा संदर्भ डोळ्यासमोर ठेवणे आवश्यक असते. या दिशेने विचार करीत असताना कवीचे त्या परंपरेतील स्थान व त्याचे कार्य यांचे महत्त्व नेमकेपणाने लक्षात येणे शक्य असते. म्हणूनच एकूण मराठी कवितेच्या संदर्भात सुर्वे यांच्या कवितेचे स्थान काय? मराठी कवितेच्या परंपरेत सुर्वे यांचे कवी म्हणून महत्त्व काय? यासारखे प्रश्न डोळ्यासमोर ठेवून सुर्वे यांच्या कवितेसंबंधी काही विचार मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

× × ×

आधुनिक मराठी कवितेच्या क्षेत्रात केशवसुत व मर्ढेकर ही दोन

महत्त्वाची वळणे मानली जातात. या दोन्ही वळणांच्या मुळाशी मराठी मनावर झालेला कवितेचा आघात आहे हे सर्वज्ञात आहे. केशवसुत व मर्ढेकर या दोन्ही कवींच्या निमित्ताने मराठी कविता अंतर्बाह्य बदलली असे दिसते. या अर्थाने हे दोन्ही कवी मराठी कवितेच्या संदर्भात क्रांतिकारक कवी ठरतात.

केशवसुतांनी मराठी कवितेला आत्मनिष्ठ बनविले, लौकिक जीवनातील भावभावनांना सामोरे केले आणि मराठी कवितेच्या विकासाचा मार्ग मोकळा करून दिला. मर्ढेकरांच्या उदयापर्यंत मराठी कविता सर्वसाधारणतः याच मार्गाने चालली होती. या प्रवासात भावभावनांची विविधता आली. अनेक रचनाप्रकार निर्माण झाले. आधुनिक मराठी कविता समृद्ध होत गेली. परन्तु हे होत असतानाच काव्यविषयक कल्पना स्थिर होत गेली. कविता, कवितेची भाषा, कवितेची रचना या संबंधीचे अनेक संकेत निर्माण झाले. भोवतालचे वास्तव बदलत होते, परंतु कवितेच्या रूढ स्वरूपामध्ये हे वास्तव सामावून घेण्याचे सामर्थ्य राहिले नाही. कवितेत विविधता असूनही कवितेला जणू एक प्रकारचे जडत्व आले. अनंत काणेकर (चांदरात आणि इतर कविता १९३३), अनिल (फुलवात १९३२, भग्नमूर्ति १९४०, निर्वासित चिनी मुलास १९४३) या सारख्यांनी या जडत्वाला भेदण्याचा प्रयत्न केला असला तरी तो परिणामकारक ठरला नाही. हे प्रयत्न सुटे-एकाकीच राहिले ही वस्तुस्थिती आहे.

मराठी कवितेला आलेल्या अशा जडत्वाच्या काळात मर्ढेकर यांनी आपली नवी कविता लिहून मराठी कवितेला संकेतातून, जडत्वातून मुक्त केले. मर्ढेकरांची ही कविता (काही कविता १९४७, आणखी काही कविता १९५१) म्हणजे नव्या जाणीवेची, नव्या युगाचे भान आलेल्या मनाची कविता होती.

केशवसुत आणि मर्ढेकर ही दोन्ही कविमने आपल्या भोवतालच्या

वास्तवाकडे नव्या जाणीवेने पाहणारी आणि त्याविषयी वैशिष्ट्यपूर्ण प्रतिक्रिया व्यक्त करणारी सर्जनशील मने होती. त्यांच्या प्रतिक्रियांच्या वैशिष्ट्यपूर्णतेत त्यांच्या काव्याचे नवेपण होते. आणि त्यातच त्यांची क्रांतिकारकता होती. मराठी कवितेने घेतलेल्या दोन्ही वळणातील हे एक साम्य आहे. तर, या दोन्ही वळणांना आलेले जडत्व हे या वळणांतील दुसरे साम्य आहे. काव्याचे नवेपण हे जणू विषयांच्या विविधतेत व रचनाप्रकारांच्या प्रयोगात आहे या समजुतीमुळे, केशवसुतांच्या वळणाला क्रमाक्रमाने जडत्व येत गेले तर, काव्याचे नवेपण हे प्रतिमासृष्टी, दुर्बोधता आणि तिरकस अभिव्यक्ती यामध्येच सामावलेले आहे या कल्पनेमुळे मर्ढेकरांच्या नव्या वळणालाही एक प्रकारचे साचलेपण आले. मराठी कवितेच्या या साचलेपणाविषयीच्या तक्रारी १९६५ नंतर मान्यवर समीक्षकांच्या लेखनात नोंदविलेल्या दिसतात. वा. ल. कुळकर्णी यांनी सेहेचाळीसाव्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणातील काही प्रतिक्रिया या संदर्भात लक्षात घेण्यासारख्या आहेत. या भाषणात वा. ल. कुळकर्णी यांच्यासारख्या साहित्यातील नव्या प्रवृत्तीविषयी स्वागतशील असणाऱ्या समीक्षकानेही नव्या वळणाच्या या काळात कविता 'खऱ्या अर्थाने कविता होण्याची धडपड करू लागली' अशा शब्दात या कवितेचे कौतुक केले असले तरी "परंतु कवितेची 'भाषा' आज कित्येक वेळा इतकी 'खाजगी' बनते आहे, इतकी केवळ 'तिची' बनते आहे व ती ज्या जगाची भाषा असावी ते जग टीकाकाराला इतके अपरिचित वाटत आहे की, तो अनेकदा (प्रामाणिक असल्यास) हतबल होतो आहे, भांबावून जातो आहे व मूक बनतो आहे"[१] अशी तक्रार करून या साचलेपणाची अप्रत्यक्ष जाणीव करून दिली आहे. याच भाषणात एकंदर मराठी ललित साहित्याविषयी बोलताना, 'मला आज सर्वच मराठी ललितलेखन

---

१) साहित्य : शोध आणि बोध, पृ. ३४

आणि मी ह्यात काव्य, कथा, कादंबरी, नाटक, विनोदी लेखन या सर्वांचाच समावेश करीत आहे- एका महत्त्वाकांक्षेने झपाटलेले दिसते आहे. ही महत्त्वाकांक्षा म्हणजे अधिकाधिक तरतरीत होण्याची, अधिकाधिक तरतरीत दिसण्याची. ह्या सर्वच लेखनात एक कौतुकास्पद हुशारी मला दिसत आहे. ही हुशारी (cleverness) जर लेखनात अवतरली नाही, तर लेखन जुनाट ठरेल; ते अद्यावत् ठरणार नाही ह्याची जणू भीती कोठेतरी या लेखनाच्या बुडाशी आहे. आपण जो अनुभव अभिव्यक्तीसाठी निवडणार त्या अनुभवाच्या स्वरूपापासून, म्हणजे त्याजकडे पाहण्याच्या दृष्टिकोनापासून तो त्याच्या अभिव्यक्तीपर्यंत सर्वच बाबतीत एकप्रकारचा अद्यावतपणा गोचर झाला पाहिजे ह्याची एक विचित्र जाणीव ह्या लेखनातून व्यक्त होत आहे.' असे सांगून, 'ही जाणीव खऱ्याखुऱ्या कलानिर्मितीला कितपत पोषक आहे?'[1] असा प्रश्न वा. ल. कुलकर्णी यांनी उपस्थित केला आहे.

वा. ल. कुळकर्णी यांचे हे भाषण डिसें. १९६५ मधील आहे. पुढे दोन वर्षांनी १९४५ ते १९६५ या काळातील मराठी कवितेचा आढावा घेताना रा. श्री. जोग यांनीही काव्याच्या भाषेच्या दुर्बोधतेचा उल्लेख केला आहे. रा. श्री. जोग आणि वा. ल. कुळकर्णी या दोन समीक्षकांची साहित्यविषयक अभिरुची आणि दृष्टिकोन भिन्न असल्याने या तक्रारी नोंदवीत असताना कमी-अधिक आवेशाचा प्रत्यय येत असला, तरी त्यांच्या तक्रारीतील साम्य लक्षात घेण्याजोगे आहे. किंबहुना तत्कालीन मराठी कवितेच्या स्वरूपाच्या संदर्भात तेच अधिक बोलके आहे.

मर्ढेकरांच्या वळणाला-स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेला-आलेल्या साचलेपणाचे एक भेदक वर्णन सरिता पदकी यांनीही केले आहे. (या वर्णनाचा उल्लेख रा. श्री. जोग यांनी आपल्या 'मराठी कविता

---

१) तत्रैव : पृ. ३९ ,, ,,

१९४५ ते १९६५ ' या पुस्तकात केला आहे. पृ. ६५-६६) त्या म्हणतात " काही सन्माननीय अपवाद सोडले, तर बाकीच्यांच्या ' कलात्मकतेचा ' जाच व्हावा इतकी ती फोफावली आहे. अर्धसूचित, सूचित किंवा प्रकट प्रतिमांच्या ढिगाऱ्याखाली ते बिचारे सुपारीएवढे काव्य गाडले जाते, आणि हातात राहतात ते तऱ्हेवाईक शब्द, त्यांतून उठलेले वेडेवाकडे अर्थतरंग, एकमेकांना छेदणारे, भेदणारे, एकमेकांशी नि कवितेतल्या भाववृत्तीशी असंबद्ध असणारे; सारी कविता वाचूनही हाती काहीच लागू न देणारे;... मात्र कवितेच्या अघटित रंगरंगोटीने गैरसावध वाचकाला (आणि बहुधा कवीलाही) सतत भास होत राहावा, की ' अरे ! हे तर शब्दांच्या पलिकडले. कसे बरे या हुशार कवीने या शब्दांच्या चकचकत्या जाळ्यात अचूक पकडले आहे ! ही लेखकाची चतुराई, फार श्रेष्ठ कलावंतांनाही चुकूनच साधलेली ही सफाई चालू मराठी कवितेत काव्याचा मूलस्रोत जो जिव्हाळा, उमाळा, किंवा ' स्फूर्ती ' यांची जागा घेऊ पाहते आहे...शब्दश्लेष, वृत्तप्रभुत्व, यमके नि चित्रकाव्ये म्हणजेच काव्य असे समजायचे दिवस मराठीने एकदा काढले; हळवी हळवी, ' रोमँटिक ', जातिबद्ध, मुलायम गळ्यावर गायिलेली रचनाही काव्य म्हणून तिला एकदा खपवून घ्यावी लागली; तशीच आता ही प्रतिमांची झिलईदार नक्षी म्हणजे काव्य असे मानून घ्यावयाची वेळ तिला आली आहे काय असे वाटू लागते. स्वतःला काही अनावर सांगायचे असले तर बोलायची सवय लोपून गेली की काय अशी शंका येऊ लागते. "

मर्ढेकरांच्या वळणानंतर लिहिल्या जाणाऱ्या मराठी कवितेबद्दलच्या या आणि अशा प्रतिक्रिया पाहिल्या म्हणजे मराठी कवितेला आलेल्या साचलेपणाचे स्वरूप लक्षात येण्यासारखे आहे. मराठी कवितेच्या या स्वरूपामुळे ही कविता वाचकांपासून, रसिकांपासून दूर जाऊ लागली होती. कविता समजणे, कवितेचा आनंद घेणे ही एक

खास गोष्ट आहे; काव्यरूप पावणारे काही खास अनुभव आहेत अशा समजुती चुकीच्या पद्धतीने स्थिरावत होत्या. तसे संकेत निर्माण होत होते. आणि या संकेतांमुळेच स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कवितेला एक प्रकारचे जडत्व येत होते.

या पार्श्वभूमीवर नारायण सुर्वे यांची कविता लिहिली गेली आहे, हे लक्षात घेतले म्हणजे सुर्वे यांच्या कवितेचे वेगळेपण चटकन डोळ्यात भरते. वर उल्लेख झालेल्या सर्व संकेतांपासून ती मुक्त आहे. तिला तरतरीतपणा, हुषारी दाखविण्याची महत्त्वाकांक्षा आहे असे दिसत नाही, की प्रतिमांमध्ये हरवून जाण्याचा तिचा स्वभाव नाही. सुर्वे यांच्या कवितेच्या साधेपणाचे एक महत्व ती ज्या संदर्भात लिहिली गेली त्या संदर्भात आहे. भोवतालच्या इतर कवींपेक्षा सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवाचे संदर्भविश्व वेगळे असल्यामुळे ही कविता उठून दिसली हे खरे असले; तरी एवढेच खरे नाही. सुर्वे यांच्या कवितेमुळे मराठी कविता पुन्हा एकदा जीवनाकडे–वास्तव जीवनाकडे-वळली, सामान्य माणसांच्या सुखदुःखांकडे वळली हे या कवितेचे श्रेय आहे. कवितेतील अनुभवांचे संकेत या कवितेने पुन्हा एकदा मोडून टाकले. कष्टकऱ्यांच्या जीवनातील भावना, त्यांची स्वप्ने, त्यांच्या जीवनातील काव्य या कवितेने व्यक्त केले. अनेक दाहक वास्तव अनुभव सुर्वे यांच्या कवितेमुळे काव्यरूप पावले. सूक्ष्म व तरल अनुभवच काव्यरूप घेऊ शकतो, ही कल्पना ढरू होत असताना सुर्वे यांनी आपल्या कवितेमधून दणकट अनुभवविश्व साकार केले. वैफल्याशिवाय कवितेला खरी कलात्मकताच प्राप्त होत नाही अशी समजूत रूढ होण्याच्या काळात आशावादी कविता लिहून आपले वेगळेपण सुर्वे यांच्या कवितेने लक्षात आणून दिले. कवितेच्या अनुभवाचा, भाषेचा जो तोच तो किरटेपणा मराठी कवितेत जाणवू लागला होता, त्याला सुर्वे यांच्या कवितेने एक धक्का दिला. सुर्वे यांच्या या अशा

कवितेमुळे मराठी कविता पुन्हा एकदा मोकळी झाली. संकेतांनी जखडल्या जाणाऱ्या, जडत्व पावणाऱ्या मराठी कवितेला मुक्त करणे हे मराठी कवितेच्या संदर्भात सुर्वे यांच्या कवितेचे श्रेय आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाच्या संधीचा विस्तार होऊन समाजाच्या विविध थरांतून साहित्य निर्माण होऊ लागण्याच्या सुमारासच सुर्वे यांची कविता ठसठशीतपणे आपली वैशिष्ट्ये घेऊन वाचकासमोर आली. या कवितेत भोवतालच्या जीवनाकडे वेगळेपणाने पाहण्याची दृष्टी होती. जीवनाचे वेगळे भान होते. साहजिकच विविध थरांतून येणाऱ्या नव्या कवींचे या कवितेशी नाते जुळले. त्यांना ही कविता जवळची वाटली. परिणामी, सुर्वे यांच्या कवितेसारख्या कवितेचा एक प्रवाह मराठी काव्यक्षेत्रात आकाराला आला. आज सामाजिक जाणीवेची जी विपुल कविता लिहिली जात आहे त्या कवितेवर सुर्वे यांच्या कवितेचा किती आणि कसा संस्कार आहे ते पाहण्यासारखे आहे. हा संस्कार केवळ नव्या कवींवरच आहे असे नाही. सुर्वे कविता लिहू लागले, तेव्हा प्रथितयश असणाऱ्या काही कवींवरही हा संस्कार आहे असे दाखविता येण्यासारखे आहे. उपेक्षित जगाला आपल्या कवितेतील अनुभवाचे संदर्भविश्व बनविण्यापासून संथ गद्य लय असणारी भाषा योजण्यापर्यंत हा संस्कार आहे असे म्हणता येण्यासारखे आहे हे संस्कार म्हणजे सुर्वे यांच्या कवितेचे केवळ अनुकरण नव्हे; परंतु मराठी कवितेच्या क्षेत्रावर सुर्वे यांच्या कवितेच्या पडलेल्या प्रभावाचे ते लक्षण आहे. भोवतालच्या बदलत्या सामाजिक वास्तवाचाही परिणाम या घटनेमागे आहे, असे म्हटले तरी बदलत्या वास्तवाला अनुरूप अशा प्रवृत्तीला प्रचलित करण्याचे श्रेय सुर्वे यांच्या कवितेलाच द्यावे लागेल. म्हणूनच १९६० नंतरच्या मराठी कवितेला प्रभावित करणारी कविता; असे सुर्वे यांच्या कवितेचे वर्णन केले तर ते अतिशयोक्त ठरू नये.

केशवसुत आणि मर्ढेकर या दोन्ही कवींनी मराठी कवितेला दिलेल्या वळणांच्या मुळाशी इंग्रजी कवितेचा आघात होता, असा उल्लेख मागे आला आहे. या दोन्ही वळणाचे प्रवर्तक इंग्रजी भाषा जाणणारे, त्या साहित्याच्या संस्कारांनी प्रभावित झालेले होते. साहजिकच इंग्रजी साहित्यातील प्रवृत्तींचे मराठी काव्यपरंपरेशी नाते जोडण्याचा अर्थपूर्ण प्रयत्न या दोन्ही वळणात झाला. ही दोन्ही वळणे म्हणजे इंग्रजी कवितेचे अनुकरण होते किंवा त्यातील वृत्ती या बाहेरून आयात झालेल्या होत्या, असे म्हणणे योग्य ठरणारे नाही. तथापि, इंग्रजी साहित्याचा प्रभाव या वळणातून जाणवण्यासारखा आहे हेही तितकेच खरे आहे. सुर्वे यांची कविता या दृष्टीनेही पाहाण्यासारखी आहे. ही कविता इंग्रजी कवितेच्या प्रत्यक्ष प्रभावापासून मुक्त आहे. सुर्वे यांनी मराठी, हिंदी, उर्दू कवितेचे वाचन केले असल्यामुळे त्या द्वारे काही अप्रत्यक्ष परिणाम असेल तेवढाच इंग्रजी साहित्याचा परिणाम या कवितेवर आहे असे फार तर म्हणता येईल. परंतु त्यामुळेच या कवितेची जडण-घडण वेगळी झाली. रूढ रचनाबंध या कवितेने नाकारले व स्वतःचा असा मार्ग काढला. गझलसदृश रचना केल्या, गोष्टरूपाला महत्त्व दिले, समूहचित्रण करणारी कविता लिहिली. लोककलांचे संस्कार आणि बोलण्याच्या भाषेविषयीची संवेदन-क्षमता यांमधून ही कविता विकसित होत गेली. सुर्वे यांच्या कवितेला वेगळे व्यक्तिमत्त्व प्राप्त झाले व आपल्या खास वेगळेपणाने ही कविता वैशिष्ट्यपूर्ण झाली. इंग्रजी कवितेच्या प्रभावापासून मुक्त असणारी कविता म्हणूनही ही कविता लक्षात घेण्यासारखी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात अशा साहित्याची जी परंपरा सिद्ध होत आहे, त्या परंपरेतील एक महत्त्वाचे कवी म्हणून सुर्वे यांचा उल्लेख करावा लागेल.

× × ×

सुर्वे यांची कविता वाचताना आणखीही एक गोष्ट जाणवण्यासारखी

आहे. ती म्हणजे, या कवितेमागे असणारी कविमनाची जाणीव. आधुनिक मराठी कवितेच्या उदयापासून उदारमतवादी विचारसरणीने प्रभावीत झालेली जाणीव मराठी कवितेतून आपल्या अनुभवाला येण्यासारखी आहे. साहित्याचे क्षेत्र हे अपरिहार्यपणे सुशिक्षितांचे असल्याने आणि सुशिक्षित होण्याचे भाग्य पांढरपेशा मध्यमवर्गीयांना लाभल्याने, त्यांनीच साहित्यनिर्मिती करणे अपरिहार्य होते. उदारमतवादी विचारांच्या संस्कारांमुळे काही कवींनी कष्टकऱ्यांच्या, उपेक्षितांच्या जगाकडे सहानुभूतीने पाहिले, कधी या कष्टकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या, माणसांना उपेक्षित ठेवणाऱ्या अशा वृत्तीकडे उपरोधाने पाहून त्या अन्यायाविरुद्ध प्रतिक्रिया व्यक्त केल्या. परंतु कष्टकऱ्यांच्या, उपेक्षितांच्या जगाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी प्रामुख्याने सहानुभूतीची राहिली. ही सहानुभूती प्रामाणिक होती. परंतु या दृष्टिकोनामुळे या उपेक्षित जगाची एकच बाजू कवितेतून व्यक्त होत होती. हे जग सहनुभूतीचा, दयेचा एक विषय बनत होते. परंतु इतिहासक्रमात भोवतालचे वास्तव बदलत गेले. औद्योगीकीकरण, त्यामुळे होणारे शहरीकरण आणि त्यामधून प्राप्त होणाऱ्या संधी यामुळे आजवर उपेक्षित असणाऱ्या जगाला नवे भान येत गेले. एकप्रकारचा आत्मविश्वास येऊ लागला. आपल्या सामर्थ्याची त्यांना जाणीव होऊ लागली. जीवनाचा संघर्ष करीत असताना त्यांना याचा प्रत्यय येऊ लागला. या सर्वांचे दर्शन मराठी कवितेत क्वचितच घडले. नारायण सुर्वे यांच्या कवितेने हे कार्य प्रभावीपणे करून दाखविले. सहानुभूतीने पाहाताना कष्टकऱ्यांच्या जगाची एकच बाजू दिसत होती. त्यांचे दैन्य व त्यातून त्यांची होणारी परवड दिसत होती. सुर्वे यांनी आपल्या कवितेतून या दारिद्र्याचे दर्शन घडवीत असतानाच त्यातील सहनशीलतेचा प्रत्यय आणून दिला. एकीकडे दुःखाने पिचत असतानाच त्यांच्या अंतरंगात धुमसणाऱ्या प्रचंड शक्तीचा प्रत्यय दिला. वरवर बकाल दिसणाऱ्या या जगातील

माणसांच्या मनातील कोवळे भाव आपल्या कवितेतून व्यक्त केले. कष्टकऱ्यांच्या जगाकडे आजवर असं पाहिलंत; आता जरा या बाजूने पाहा असेच जगू सुर्वे यांच्या कवितेने सांगितले. या अर्थाने सुर्वे यांच्या कवितेने कष्टकऱ्यांच्या जगाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. कष्टकरी जगाविषयीच्या विशिष्ट तात्विक भूमिकेचे त्यांनी आपल्या कवितेतून समर्थन केले नाही. सुर्वे यांनी कष्टकऱ्यांच्या जगाचा भावानुभव आपल्या कवितेतून व्यक्त केला. मराठी कवितेच्या क्षेत्रात सुर्वे यांच्या कवितेपूर्वी असे घडले नव्हते. म्हणून ही कविता वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

× × ×

सुर्वे यांची कविता आशयाला प्राधान्य देणारी आहे. ती वाचकांशी सरळ संवाद करणारी आहे. 'मी' बरोबरच 'आम्ही' ला सामावून घेणारी आहे, इ. वैशिष्ट्यांचा नेहमी उल्लेख केला जातो. मर्ढेकरांच्या कवितेनंतर निर्माण झालेल्या वळणाच्या संदर्भात या वैशिष्ट्यांचे वेगळेपणही जाणवते. परंतु ही वैशिष्ट्ये मराठी काव्यपरंपरेला अपरिचित आहेत असे दिसत नाही. आशयाला प्राधान्य देणे, वाचकाशी सरळ संवाद करणे किंवा त्याला आवाहन करणे, समाज परिवर्तनाची भाषा बोलणे इ. वैशिष्ट्यांचे स्पष्ट दर्शन तर केशवसुतांच्या कवितेतच घडण्यासारखे आहे. बोलण्याच्या भाषेचा वापर हा मुद्दा घेतला तरी कवितेची भाषा व व्यवहाराची भाषा हे द्वंद्व मिटविण्याचे प्रयत्न केशवसुत यांच्या कवितेतही दाखविता येण्यासारखे आहेत. बरे हे विशेष खास केशवसुतांचे आहेत असे म्हणावे तर संवाद करणे, साध्या बोलण्याच्या भाषेला प्राधान्य देणे, प्रस्थापित मूल्यव्यवस्थेविरुद्ध बंडखोरी करणे ही वैशिष्ट्ये तर संतांच्या कवितेतही दाखविता येण्यासारखी आहेत. अर्थात याचा अर्थ मराठी संत, केशवसुत व सुर्वे यांची कविता एकाच प्रकारची आहे असे नाही; हे स्पष्टच आहे. संतांच्या कवितेमागे असणारी जीवनविषयक दृष्टी, त्यांची

काव्यविषयक भूमिका आणि आधुनिक कवितेमागे असणारी जीवनदृष्टी व काव्यविषयक भूमिका यांत महदंतर आहे. हे अंतर कालसापेक्ष आहे. परतु मराठी कवितेचा विचार करताना संत कवितेचा संदर्भ टाळता येण्यासारखा नाही. मराठी कवितेला जडत्व येऊ लागले, रंजन व सांकेतिकता यामुळे तिच्यात एकप्रकारचे साचलेपण येऊ लागले म्हणजे संतकवितेच्या परंपरेला कोणत्या ना कोणत्या प्रकारे स्पर्श करून मराठी कविता पुन्हा चैतन्य प्राप्त करून घेते, असे मराठी कवितेचा इतिहास दाखवितो. केशवसुत व मर्ढेकर ही मराठी कवितेची दोन्ही वळणे संत परंपरेला कालोचित स्पर्श करूनच घेतली गेली आहेत. या दोन वळणांमागे काव्यविषयक भूमिकेचे मूलभूत वेगळेपण होते, म्हणून या दोन कवींनी मराठी कवितेच्या क्षेत्रात क्रांती केली असे म्हटले जाते. हे कार्य मराठी काव्याच्या संदर्भात असल्याने या दोन्ही कवींनी संत कवितेच्या परंपरेला स्पर्श केला आहे. मर्ढेकरांच्या वळणाला जडत्व प्राप्त झाल्यानंतर त्यातून मराठी कवितेला पुन्हा मोकळे करण्याचे कार्य करणाऱ्या सुर्वे यांच्या कवितेचेही या संतकवितेशी नाते जुळण्यासारखे आहे.

सुर्वे यांच्या कवितेमुळे मराठी कविता पुन्हा एकदा मुक्त झाली, वास्तव जीवनातील विविध अनुभवांना सामोरी जाऊ लागली. परंतु त्यामुळे काव्यविषयक नवी कल्पना सिद्ध झाली असे दिसत नाही. म्हणून मराठी कवितेच्या प्रांतात सुर्वे यांनी क्रान्ती घडवून आणली असे म्हणणे अतिशयोक्त ठरेल. परंतु कलात्मकतेच्या नावाखाली किरटया होणाऱ्या मराठी कवितेला पुन्हा एकदा वास्तव जीवनाच्या खुल्या मार्गावर आणण्याचे कार्य करून सुर्वे यांच्या कवितेने मराठी कवितेला एक नवे वळण दिले आहे. १९६० नंतरच्या कवितेचा विचार करताना सुर्वे यांच्या कवितेचे महत्त्व वादातीत आहे.

परिशिष्ट

'जोगिया' आणि 'मनीआडर'

बी. ए.च्या वर्गात शिकत असताना ग. दि. माडगूळकर यांचा 'जोगिया' हा काव्यसंग्रह अभ्यासासाठी होता. त्यानिमित्ताने 'जोगिया' ही कविता प्रथम वाचनात आली. कवितेची रचना, शब्दसौंदर्य यामुळे तेव्हाच ही कविता आवडती झाली. अलिकडे या कवितेची ध्वनिमुद्रिका आली. त्यामुळे तर कविता अधिकच मनात भरली;

काही दिवसांपूर्वी साहित्यविषयक चर्चेसाठी काही मित्र जमलो होतो. नारायण सुर्वेही तिथे होते. चर्चा संपल्यावर सहज बोलता बोलता कुणीतरी विचारले, 'सध्या काय लिहिलेत?' सुर्वे म्हणाले, 'एक कविता लिहितोय. अजून पूर्ण झालेली नाही. हवी तर वाचतो.' सगळ्यांनी आग्रह केला. सुर्वे कविता वाचू लागले—'कवितेचे नाव आहे 'मनीआडर.'

कविता ऐकली नि आवडलीही. पण मनात 'जोगिया' जागी झाली. दोन्ही कविता गणिकांसंबंधी. दोन्ही कविता एकप्रकारे आत्मकथनात्मक पद्धतीने प्रगट झालेल्या. एवढेच नव्हे तर 'जोगिया' या कवितेतील गणिकेच्या जीवनात 'मम प्रीती आहे जडली तुजवर राणी' असे 'दबकत नवख्यावाणी' विचारणारा पुरुष येतो तर 'मनीआडर' मध्ये 'हितं व्हान्यापरीस बाईल व्हशील का?' असे विचारणारी व्यक्ती येते. पण एक कविता भावगीतात्मक तर दुसरी मुक्तछंदात 'जोगिया' तून गणिकेचे दुःख हळवेपणाने व्यक्त होते, तर 'मनीआडर' मनाला अस्वस्थ करते. मन दोन्ही कवितांची तुलना करू लागले.

'जोगिया' या कवितेत 'कोन्यात झोपलेली सतार, सैल अंग टाकून पसरलेली पैंजणे, दुमडलेला गालीचा, झुकलेले तक्के, हे सगळेच वर्णन एक उदासीनतेचे वातावरण निर्माण करते. 'निळ्या दीपात ताठलेली वीज, कां तुला कंचनी अजून नाही नीज?' या प्रश्नाशी नाते जोडून वातावरणातील उदासीनता कंचनीशी निगडीत करते. कलती मान करून पान नखलणारी, गौर नितळ कंठ असणारी एक कंचनी कडव्याकडव्यातून साकार होऊ लागते. शब्दाशब्दांचे नादसौंदर्य, त्यांची लय यातून कवितेच्या पूर्वार्धात एक चित्र उभे राहू लागते. एखाद्या नाटकाचा

पडदा उघडावा, दृश्य डोळ्यांसमोर उभे राहावे, मग त्या दृश्यात मूकपणे एखादी व्यक्ती यावी, शब्दांशिवायच एक भाववृत्ती निर्माण व्हावी तसे काहीसे घडते.

आणि एकदम प्रश्न येतो 'कां नीर लोचनी आज तुझ्या ग मैने ?' एकदम एक प्रकारची नाट्यात्मकताच निर्माण होते. मग कंचनीचे आत्मकथन सुरू होते. 'रक्तात रुजविल्या भांगेच्या मी बागा' सारख्या कल्पनेतून अधःपतित जीवनाची खंत व्यक्त होते. मग जीवनात आलेल्या पुरुषाचे वर्णन करताना येणाऱ्या 'सावळा तरुण तो खरंच ग वनमाळी' या कल्पनेतून एक स्वप्नरम्य चित्र रेखाटले जाते. 'मम प्रीती आहे, जडली तुजवर राणी' हे दबकत नवखयावाणी त्याने उच्चारलेले शब्द व 'हासून म्हणाले दाम वाढवा थोडा' हे तिचे प्रत्युत्तर यामधील विरोध दोन वृत्तींमधील अंतर व्यक्त करतो. आणि नंतर पश्चात्तापाची जाणीव व्यक्त करणाऱ्या ओळी येतात.

शेवटच्या कडव्यात 'विडा घडवून' त्या पुरुषाचे ध्यान करणारी, व्रतस्थ राहून ती तिथी पाळणारी गणिका डोळ्यांसमोर येते. इथेही 'व्रतस्थ', 'तिथी' या शब्दांभोवतीच्या अर्थच्छटा त्या प्रीतीचे कंचनीला जाणवणारे पावित्र्य सहज सुचवून जातात.

कवितेची शेवटची ओळ 'वर्षात एकदा असा जोगिया रंगे' अशी आहे. इथे सर्व अपवित्र आणि बाजारी भावनांनी भरलेल्या जीवनात कंचनीने जपलेल्या त्या एका क्षणाची उदात्तता मनावर ठसते. 'जोगिया' हे म्हटलं तर रागाचे नाव. पण इथे हा शब्द भाववृत्ती सूचक बनून प्रतिमा होतो.

जोगिया ही कविता म्हटले तर छोटीशी कथा आहे. म्हटले तर एक भाववृत्ती प्रकट करणारी कविता आहे. कवितेतील निवेदनकौशल्य, शब्दाशब्दांतील सूचकता, नादसौंदर्य, शब्दांची घडण हे सारे पाहिले तर ही कविता म्हणजे एक रेखीव शब्दशिल्पच आहे. असे शब्दशिल्प निर्माण करणाऱ्या माडगूळकरांच्या प्रतिभेचे कोणाही रसिकाला आकर्षण वाटले तर नवल काय ?

या कवितेत एका गणिकेचे चित्र आहे. तिच्या अधःपतित, अ-मानुष जीवनात तिच्यावर प्रेम करणारा एक 'माणूस' येतो. त्याला उघड नकार दिल्यानंतर ती गणिका मनाच्या कप्प्यात मूकपणे ती 'भावना' जपत राहते. म्हणजे बाजारी जीवनातही आंतरिकपणे माणूसपणाचे चित्रच ही कविता व्यक्त करते. गणिका अधःपतित पण तिच्या 'माणूसपणा' कडे माडगूळकर पाहतात. म्हणजे एका प्रकारे ही कविता आशावादी व या क्रमाने पुरोगामीही.

कविता सुंदर आहे हे खरे. पण ती आशावादी वा पुरोगामी आहे हे मत तशा दृष्टीने पाहणाऱ्या कोणालाच मान्य होणार नाही. कारण या कवितेतील गणिकेमधील जे माणूसपण व्यक्त होते ते खरे नाही. 'रक्तात रुजविल्या भांगेच्या मी बागा' असे

म्हणारी ही गणिका स्वतःच्या जीवनाकडे अपराधी भावनेने पाहते आहे. 'हासून म्हणाले दाम वाढवा थोडा' या शब्दांतून एकाप्रकारे त्या प्रेमभावनेचा ती उपहासच करीत आहे. मग काहीच कारण नसता तिला एकदम त्या प्रीतीच्या उदात्ततेचा साक्षात्कार होतो आणि ती त्या तरुणाचे ध्यान करू लागते, व्रतस्थ राहून तिथी पाळू लागते. वरं, क्षणभर हे सगळे खरे मानले तरी प्रीतीच्या त्या जाणीवेनंतर या गणिकेच्या मनात कोणताच संघर्ष निर्माण होत नाही. एक दिवस व्रतस्थ राहून ती 'तिथी' पाळते व तीनशे चौसष्ट दिवस त्याच अधःपतित जीवनात सुखाने घालवते. हे सारेच एकप्रकारे पराभूत मनाचे दर्शन आहे. श्रेयस्कर वाटणाऱ्या मूल्ययुक्त तत्त्वांचा केवळ उच्चार करून किंवा त्यांची स्मृती ठेवून त्याचा आपल्या जीवनावर कोणताही ठसा न उमटू देणारी माणसे आपण आपल्या अवतीभवती पाहतो; तसाच काहीसा हा प्रकार नाही का ? म्हणजे या कवितेच्या आशयाकडे जरा लक्षपूर्वक पाहिले की कवितेतील सारीच भावना काल्पनिक स्वप्नरंजनात्मक वाटू लागते. गणिकेच्या जीवनातील दुःखापेक्षा तिच्या अधःपतित व उदात्त भावना यांमधील या विरोधाचेच माडगूळकर यांना अधिक आकर्षण वाटते.

किंबहुना असेही म्हणता येईल की, अधःपतितता गणिकेच्या जीवनातील व उदात्तता कवीच्या मनातील आहे. गणिकेच्या अधःपतित जीवनाकडे पाहात असतानाच कवी तिचे उदात्तीकरण करीत आहे. एकप्रकारे इथे प्रकट होणारा हा जीवनविषयक दृष्टिकोन आदर्शवादी आहे. अशा दृष्टीने जीवनाकडे पाहणारी व्यक्तीही जीवनातील बाजारीपणाच्या विरोधीच असते. आपल्याभवतीच्या जीवनात माणूसपणा असावा अशीच इच्छा ती व्यक्त करीत असते. आणि म्हणूनच जीवनातील अन्यायाकडे, दुःखाकडे अशी व्यक्ती सहानुभूतीने पाहूही शकते. परंतु हे करीत असता तिथे जीवनाच्या गतीचे भान नसते. मूल्यांच्या संदर्भात एक प्रकारची स्वप्नरंजनात्मक वृत्ती असते. साहजिकच त्यातून व्यक्त होणारी जीवनविषयक जाणीव फसवी असते. असे लेखन खऱ्या अर्थाने पुरोगामी म्हणता येणार नाही. कवितेसंबंधीचा हा युक्तिवाद तर्कदृष्ट्या पटणारा आहे.

परंतु प्रश्न युक्तिवाद पटण्याचा नाही. प्रश्न आहे तो हे सर्व निष्कर्ष येतात त्याचा आधार काय ? तर समोर असणारी कविता. या कवितेत तार्किक विधान तर कुठेच येत नाही. समोर येतात ते विशिष्ट जुळणी असणारे शब्द व त्यातून सिद्ध होणारे विशिष्ट रूप. मनावर परिणाम करणारे, कवीचा जीवनविषयक दृष्टिकोन व्यक्त करणारे जर काही असेल तर ते म्हणजे कवितेचे रूप. तेव्हा कविवर्य माडगूळकर यांचा जीवनविषयक दृष्टिकोन या रूपातच पहायला हवा. ही कविता आदर्शवादी, स्वप्नरंजनात्मक असा जीवनविषयक दृष्टिकोन व्यक्त करणारी आहे हे या कवितेच्या रूपातूनच व्यक्त होते. कसे ते पहा :

कवितेतील शब्द, त्यांची जुळणी कशी रेखीव आहे. पण त्या रेखीवपणाबरोबरच ती काहीशी सांकेतिक नाही का? त्या स्त्रीचा गौर नितळ कंठ, अधर फुलांचे ओले मृदुल पराग, इ. कल्पनांतून डोळ्यांसमोर चित्र उभे राहते ते एक सांकेतिक सौंदर्याचे. पुढे ही स्त्री आत्मकथन करू लागते तेव्हाही काही सुंदर कल्पना येतात. उदा. 'रक्तांत रुजविल्या भांगेच्या मी बागा' किंवा 'भांगेत पेरूनी तुळस परतला श्याम' या सुंदर वाटणाऱ्या कल्पनांकडे जरा लक्षपूर्वक पाहिले तर त्यामध्येही एक प्रकारची सांकेतिकता नाही का? पण विसंगती आहे ती यापुढेच. अशा सुंदर कल्पनांतून आपली प्रेमकथा सांगणारी ही गणिका 'जगविते प्राण हे ओपुनिया अनमोल' किंवा 'बोलला हळूच तो दबकत नवख्यावाणी' असे अगदी बोलीभाषेतील शब्द योजते. ही गणिका त्या तरुणाचे 'मंगल नाम' ही पुसले नाही म्हणून खंतावते एवढेच नव्हे तर या कवितेत 'रतिक्लान्त' 'व्रतस्थ' असेही शब्द येतात. म्हणजे एकापरीने ही शब्दकळा विषम आहे आणि या विषमतेला प्रयोजन काहीच नाही. या शब्दकळेतूनच या अनुभवाची केवळ काल्पनिक पातळी व्यक्त होत नाही का?

या संबंध कवितेच्या रचनेतही असेच आहे. या रचनेत एक प्रकारची नाट्यात्मकता आहे. अधःपतित जीवनात गळाभर रुतलेल्या त्या स्त्रीच्या जीवनात एक दिवस अचानक एक पुरुष येतो. आणि 'मम प्रीती आहे जडली तुजवर राणी' असे म्हणतो. ती प्रथम त्याचा उपहास करते. नंतर 'जाणिली नाही मी थोर तयाची प्रीत' म्हणून पश्चात्ताप करते व ती 'तिथी' व्रतस्थपणे पाळीत राहते. या सर्व कृतीमध्ये विरोध आहे म्हणून नाट्यात्मकता आहे. परंतु या नाट्यात्मकतेला प्रत्यक्ष जीवनव्यवहाराचा संदर्भ कुठेच नाही. एकाच गणिकेची दोन रूपे या कवितेत येतात. एक प्रत्यक्ष जीवन व्यवहार करणारे; दुसरे, आंतरिकपणे भावना जपणारे. ज्या या विरोधातूनच कवितानुभवाचे रूप सिद्ध झाले आहे तो विरोधच आदर्शवादी दृष्टिकोनाचा द्योतक आहे. संबंध कवितेच्या रचनेत एक रेखीवपणा आहे. हा रेखीवपणाच एका निश्चित जीवनदृष्टीत जीवन बसविण्याचा द्योतक नाही का? याचा अर्थ असा की 'जोगिया' ही कविता कवीच्या आदर्शवादी व कल्पनारम्य अशा जीवनदृष्टीची द्योतक आहे आणि ही जीवनदृष्टी केवळ त्या आशयात नसून तो आशय ज्या विशिष्ट रूपातून व्यक्त होत आहे त्या 'रूपा'तच सामावलेली आहे.

आता या संदर्भात सुर्वे यांची 'मनीआडर' ही कविता वाचली, तर तिचे वेगळेपण चटकन लक्षात येते. या कवितेतही गणिकाच आहे; पण इथे तिची जीवनकथा तिच्याच दृष्टिकोनातून व्यक्त होत आहे. 'अख्ख्या पुरुषजातीचंच हसू आन् रड्डबी येणारी' ही स्त्री स्वतःच्या जीवनव्यवहारातूनच काही शिकली आहे. 'हित व्हान्यापरीस बाईल व्हशील का?' म्हणून विचारणाऱ्या पुरुषाला 'आता हाय की मी शेजंला तुमच्या' असं ती उत्तर देते; तेव्हा 'शेजंला असणं' आणि बाईल

होणं यात काही फारसा फरक नाही हेच ती सुचवीत आहेसे वाटते. 'हे कातडं लई वंगाळ बगा. मानूस गोचिडीवानी चिकाटतं' किंवा 'अवं, तो पुरूस;' या तिच्या शब्दातून पुरुषाविषयीचे तिला उमगलेलं एक सत्यच ती प्रकट करते. हे सत्य तिला तिच्या जीवनव्यवहारातूनच उमगलेलं आहे. आपल्या कोणत्याही भावनेचं तिला उदात्तीकरण करावंसं वाटत नाही. आदर्श जीवनाविषयी विचार करत बसायला, रोजच्या जीवनाविषयी खंत करायला तिला फुरसद नाही. तिच्या रोजच्या जीवनाचेच अनेक प्रश्न आहेत. महागाई वाढते आहे, धंदा करायचा तर बदलत्या काळानुरूप सजावटही आवश्यक ठरते आहे. जीवन ओढग्रस्त आहे. एखाद्या सामान्य बाईने आपल्या संसाराच्या तक्रारी सांगाव्यात तितक्या सहजतेने ही स्त्री सारे सांगते आहे. प्रत्यक्ष जीवनव्यवहारात कोणत्याही माणसाचे जीवन मोठे स्वतःच्या आदर्शानुरूप असते असे नाही. पण म्हणून काही माणसे व्यवहार सोडून आदर्शाची चिंता करीत बसत नाहीत. त्यांच्या रोजच्या चिंता बऱ्याचशा व्यवहाराच्याच असतात. कवितेतील या स्त्रीची अवस्थाही अशीच आहे.

रोजच्या जीवनाच्याच चिंता करीत असताना आपल्या जीवनाविषयी ती फार मोठी सुखी आहे असं नव्हे. 'असं बी लिवा, का मी खुस हाय; आंग ठनाकतंय पर म्हनावं गावापक्षा बरं हाय.' या शब्दांतून हे सुख असणे काही खरे नव्हे हे आपल्याला तेव्हाच कळतं. दूरच्या माणसाला लिहिताना त्याने काळजी करू नये म्हणून अनेकदा खुशाल आहोत, इकडे ठीक चाललंय वगैरे लिहितात, त्यातलाच हा प्रकार. म्हणूनच या शब्दांतही सूक्ष्म वेदना आहेच. पण कवितेच्या शेवटी येणाऱ्या 'सगळंच कंटाळल्यागत हाय' या शब्दांतून तिला आलेला जीवनाचा उबगही व्यक्त झाला आहे. पण यावर स्वप्नरंजन किंवा उदात्तीकरण हा तोडगा या कवितेत येत नाही. या स्त्रीचा जीवनाबरोबर संघर्ष चालू आहे. ती ज्या कुणाला 'मनीआडर' करते आहे त्यात 'त्येचं गंगीला याक पुस्तक द्या. नाम्याला चरडी, रोजचं धा पैसं द्या म्हंजी पळल पोरगं साळंला,' हे लिहायला सांगायला ती विसरत नाही. देहविक्रयाचा धंदा करणारी ही स्त्री, पण त्या मुलांनी शिकावे असे तिला वाटते. त्या 'दोघांस्नी मुका बी लिवा,' असेही ती सांगते. तिच्या मनातील वात्सल्यभाव इथे सहज व्यक्त होतो. हे सारे सहजपणे व्यक्त होणारे माणूसपण आहे. हे अधोरेखित करावं, मुद्दाम आकर्षकपणे व्यक्त करावे असा प्रकार या कवितेत घडत नाही. देहाचा बाजार मांडणारी ही स्त्री वास्तव नाकारीत नाही. कुठेही, कोणत्याही संकेतात ती अडकत नाही; कल्पनात्मक पातळीवरून उदात्तीकरण करीत नाही. आपल्या समोरील जीवनसंघर्षाला ती सरळ सामोरी जात आहे. त्या जीवन-संघर्षातूनच तिला जीवनाचा अर्थ मिळतो आहे; आणि जीवनसंघर्षातूनच तिचे माणूसपण सहजपणे व्यक्त होत आहे. म्हणजेच हे चित्र वास्तव आहे. इथे जीवनव्यवहार व मन अशी फारकत नाही. कवीची दृष्टी त्या जीवनातील आकर्षक विरोधाकडे पाहत नाही किंवा

या जीवनाचा कोणताही सरळ अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत नाही. इथे प्रयत्न आहे तो त्या जीवनाचा सरळ वेध घेण्याचा. हे करीत असताना इथे जीवनाच्या गतीचे भान आहे. ही कविता जीवनदर्शक आहे. अर्थात या कवितेला पुरोगामी म्हणता येईल हे स्पष्ट आहे.

'जोगिया' आणि 'मनीआडर' या दोन कवितांच्या विषयात बरेच साम्य असले तरी आशयात खूपच अंतर आहे आणि हे आशयातील अंतर त्या कवितांच्या 'रूपा'तून व्यक्त झाले आहे. 'जोगिया'तील आदर्शवादी दृष्टिकोन त्या कवितेच्या रूपातून आपल्याला जाणवतो. त्याचप्रमाणे 'मनीआडर'मधून व्यक्त होणारी वास्तववादी जीवनदृष्टीही त्या कवितेच्या रूपातूनच व्यक्त होते. कशी ते पाहा :

पहिली गोष्ट म्हणजे, ही कविता भावगीतात्मक पद्धतीने व्यक्त होत नाही, तर मुक्तछंदातून व्यक्त होते. भावगीतात्मक पद्धतीत एकप्रकारचा हळवेपणा येतो. सरळ एकसुरी भावना किंवा स्पष्ट विरोधी भावच्छटा भावगीतात्मक पद्धतीने सहजपणे व्यक्त करता येतात. इथे अनुभवाचे स्वरूप असे भावनात्मक नाही तर अतिशय गुंतागुंतीचे (complex) आहे. हे त्या मुक्तछंदात्मक रचनेतून जाणवते. '--आन् हे बगा' या शब्दांनी कविता सुरू होते;--मग 'मनी आडर'--मध्ये लिहायचा मजकूर येतो. पुढे निवेदन करणारी स्त्री सहजपणे स्वतःचे अनुभव सांगण्यातच रंगून जाते. मग '--हे तुमाला सांगते' असं म्हणून ती पुन्हा मजकूर सांगायला लागते; पण तिथेसुद्धा 'दोघास्नी मुकाबी लिवा' असे सांगून झाल्यावर पुन्हा बोलतच राहते. मनात खूप काही दाटलेले असावे. एखाद्या घटनेने ते सहज बाहेर पडावे तसे वेगवेगळे विचार, आठवणी कवितेत व्यक्त होत राहातात. यामध्ये एक अशिक्षित शहाणपणा आहे. हे आहे आत्मकथनच, पण त्यात सलग रेखीवपणा नाही. कवितेतील ती स्त्री ज्याला हे सारे सांगते आहे तो यावर कोणतीच प्रतिक्रिया व्यक्त करीत नाही. तेव्हा 'कटाळा आला असल तुमाला' असं तीच म्हणते आणि हे आत्मकथन आवरतं घेते. वात्सल्य, जीवनाचे अनुभवातून झालेले आकलन, जीवनाबद्दलची आसक्ती आणि कंटाळा अशा बौद्धिक, भावनात्मक छटांच्या रचनेतून ही कविता सिद्ध होत आहे. कवितेच्या या रचनेतच संघर्षात्मकता आहे.

कवितेतील शब्द पाहा. रूढ अर्थाने काव्यमय म्हणावी अशी एकही कल्पना संबंध कवितेत येत नाही. नाही म्हणायला 'ढगावानी मानूस येतो आन म्हामूर व्हतो बगा' या ओळीत कल्पना आहे पण ती कवितेतील स्त्रीच्या व्यक्तिमत्वाशी जुळेल अशीच आहे. एकंदर कवितेतील शब्दकळा तशी गद्याकडे झुकणारी, बोलीभाषेचा ढंग असणारी आहे. या शब्दकळेचे हे स्वरूपच कवीच्या वास्तवदृष्टीचे दर्शक आहे. याचा अर्थ या शब्दकळेत नाट्य, सौंदर्य नाही असा नव्हे. कवितेच्या अगदी सुरुवातीलाच '--आन हे बघा.... असं बी लिवा, का मी खुस हाय; आंग ठनाकतंय पर म्हनावं,

गावापक्षा बरं हाय.' या ओळीत विरोध आहेच. खुस असणं, आंग ठणाकणं आणि बरं असणं या तीन अवस्था परस्परविरुद्ध आणि तरी एकरूप आहेत. या रचनेत नाट्य आहे ते केवळ आकर्षक नव्हे, तर जीवनदर्शक नाट्य आहे. तसेच 'माज्याकडे येन्याआदी किती जनींकडं गेलता!' या बबडीच्या प्रश्नातही विरोध आहे. पण तो सूक्ष्म कारुण्यदर्शक झाला आहे. म्हणजे या कवितेतील शब्दाशब्दांच्या घडणीतूनच त्या जीवनातील व्यमिश्रता व्यक्त होत आहे. कवितेच्या शब्दरचनेत कुठेही उत्कट भावनात्मकता जाणवत नाही. साऱ्या शब्दकळेला कशी एक संथ लय आहे. शब्दकळेची, त्या शब्दांच्या रचनेची सारी वैशिष्ट्ये हीच खरी कवीच्या जीवनविषयक दृष्टिकोनाची दर्शक नाहीत का? याचा अर्थ असा की, सुर्वे यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी या कवितेत येणाऱ्या केवळ विचारांमधून नव्हे, तर कवितेच्या 'रूपा' तूनच व्यक्त होत आहे.

'जोगिया' व 'मनीआडर' या कवितांच्या आशयात अंतर आहे असे आपण म्हणतो तेव्हा ते कवितेतून व्यक्त होणाऱ्या केवळ विचारातून नव्हे, तर त्या कवितांच्या 'रूपा'तूनही व्यक्त होत असते. कवी आपल्या अनुभवानुरूप 'रूप' सिद्ध करीत असतो.

नारायण सुर्वे : साहित्यसूची

कवितासंग्रह :

ऐसा गा मी ब्रह्म : अभिनव प्रकाशन, मुंबई, १९६२. (पुढच्या आवृत्त्या पॉप्युलर प्रकाशनातर्फे)

माझे विद्यापीठ : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६६.

जाहीरनामा : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७५.

उर्दूमधून अनुवाद :

तीन गुंड आणि सात कथा, लोकवाङ्मय गृह, १९६६.

दादर पुलाकडची मुले, वरदा बुक्स, पुणे. १९७५.

समीक्षा :

१. सूर्ययुगाची सुरुवात, डॉ. एस. एस. भोसले, अभिनव प्रकाशन, १९७७.

२. नारायण सुर्वे यांची कविता, दिगंबर पाध्ये, लोकवाङ्मय गृह, १९८२.

३. पूर्वा मासिक : खास अंक ऑगस्ट १९८२.

लेख :

१. कदम संभाजी, 'नारायण सुर्वे यांची कविता' सत्यकथा डिसेंबर–१९७६.

२. कदम नीलकंठ, 'नारायण सुर्व्यांच्या कवितेतील स्त्रीरूप' लोकवाङ्मय, दिवाळी–१९७८.

३. कासकर श्रीकांत, 'नारायण सुर्वे,' गोमंतक, २८–४–७५.

४. किंबहुने रवींद्र, 'नारायण सुर्वे यांची कविता' समीक्षेचा कच्चा आराखडा, पाऊलवाट, दिवाळी–१९७६.

५. कुरुंदकर नरहर, 'नारायण सुर्वे यांची कविता', प्रतिष्ठान, सप्टेंबर–१९६९. ('पायवाट' या पुस्तकात संग्रहित)

६. डॉ. कोत्तापल्ले नागनाथ, त्रिज्या–लेखसंग्रह, १९८१.

७. खोब्रागडे हेमचंद्रजा, 'नारायण सुर्वे, एक वेगळी दिशा', दै. लोकशाही, १२–५–१९८१.

८, गाडगीळ प्रभाकर, 'नारायण सुर्व्यांची कविता', युगवाणी, जून-जुलै १९७३.

९, जोग ल. ग. 'कठीण होत आहे' कवितेचे रसग्रहण, आलोचना, एप्रिल, १९७१.

१०. जोग वि. स., 'सुर्वे नारायणाचे काव्य किरण', तरुण भारत, नागपूर– २४–८–१९६९.

११. जोग वि. स., 'महाराष्ट्राचा मॅक्झिम गोर्की – नारायण सुर्वे' महाराष्ट्र, ३१–७–१९६८.

१२. जाधव रा. ग. तिसऱ्या केशवसुताचा भास, लोकवाङ्मय, जुलै-ऑगस्ट १९८२

१३. नाईक विजय, 'ईश्वराला गुडबाय म्हणणारे कवी नारायण सुर्वे' गोमंतक, २३–११–१९७'.

१४. पाठक यशवंत, 'माझे विद्यापीठ'च्या संदर्भात, नारायण सुर्वे यांची प्रीती कविता, प्रतिष्ठान, डिसेंबर–१९७७.

१५. पारपिल्लेवार शांताराम, 'नारायण सुर्व्यांची कविता' युगवाणी, ऑगस्ट, सप्टेंबर- १९७३.

१६. पारपिल्लेवार शांताराम, सुर्व्यांचे विश्व, पूर्वा, ऑगस्ट १९८२

१७. पाध्ये दिगंबर, 'जोगिया आणि मनीआडर' लोकवाङ्मय. १९८०.

१८. पानसरे रमेश, आकृतीबंध, फक्त, ऑक्टोबर १९६७.

१९. प्रधान शशी, 'नारायण सुर्वे, एक टिपण' मराठा २१ मे १९६७.

२०. पाटील म. सु, 'माझे विद्यापीठ' ('अक्षरवाटा' अनमोल प्रकाशन, १९८२, या पुस्तकात संग्रहित)

२१. फडके भालचंद्र, 'नारायण सुर्वे यांची कविता' निहार, दिवाळी–१९७७. (दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह ग्रंथात, पृष्ठ १३१ ते १३८ समाविष्ट)

२२. बेडेकर सुधीर, कार्ल मार्क्स, नारायण सुर्व्यांची एक कविता रसग्रहण– तात्पर्य, १९८०.

२३. बांदिवडेकर चंद्रकांत, 'धुमिल और नारायण सुर्वे', आकाशवाणी, मुंबई (भाषण) २५–३–१९७५.

२४. बांदिवडेकर चंद्रकांत, नारायण सुर्वे यांची प्रेम कविता : एक टीपण, पूर्वा, ऑगस्ट १९८२.

२५. बांदिवडेकर लीला, सुर्व्याच्या कवितेतील निसर्ग : पूर्वा, ऑगस्ट १९८२.

२६. भोसले एस्. एस्., 'नारायण सुर्वे यांची कविता, आधुनिक मराठी कवितेचे तिसरे वळण', समाज प्रबोधन पत्रिका, मे-जून १९७६.

२७. मोरे विश्वनाथ, 'प्रयोगवादी कविता पूर्णपणे फसलेली आहे', रविवार मराठा (पुरवणी) २६–१०–१९६९.

२८. महाबळ श्री. भा., 'नारायण सुर्वेंची गोष्ट', मनोहर, फेब्रुवारी १९६८.
२९. मुक्तिबोध शरच्चंद्र, नारायण सुर्वे यांची कविता : काही विचार, पूर्वा, ऑगस्ट १९८२
३०. नगर्सेकर सुरेश, 'कामगार संस्कृती आणि संघर्षाची कविता' नवाकाळ, १९-४-१९८२.
३१. रसाळ सुधीर, नारायण सुर्व्यांची कविता', प्रतिष्ठान, ऑगस्ट १९६७.
३२. रसाळ सुधीर, 'नारायण सुर्व्यांची कविता आणि नरहर कुरुंदकर' प्रतिष्ठान, ऑक्टोबर १९६९.
३३. राजवाडे राजा, 'नारायण सुर्वे, उदास आभाळातील लाल सूर्य' सोबत, २६-४-१९८१.
३४. सहस्रबुद्धे अविनाश, पूर्वा खास अंकाचे संपादकीय 'प्रास्ताविक' पूर्वा, ऑगस्ट १९८२
३५. सरदेशमुख व्यं. वि., 'भणंग समुद्रातले तरंगते वेट' सत्यकथा, मे १९८१.
३६. साठे यशोधरा, 'माझा आवडता कवी, नारायण सुर्वे', अश्वमेध, दिवाळी १९७३.
३७. सारंग विलास, 'नारायण सुर्वे यांची कविता,' सत्यकथा, मे १९७४.
३८. सोमण सुभाष, 'नारायण सुर्व्यांच्या कवितेविषयी काही विचार', सत्यकथा ऑटोबर १९६७.
३९. शिंदे फ. मु. 'क्षितिज रूंद होत आहे', स्वान्त, प्रथमावृत्ती, प्रतिभा प्रकाशन, औरंगाबाद.
४०. क्षीरसागर भगवंत, 'माझे विद्यापीठ ते जाहीरनामा, नारायण सुर्वे यांचा प्रवास' मराठवाडा, एप्रिल-१९७५.
४१. इंगळे वामन, 'नाळ' नारायण सुर्वे यांची एक कविता' रसग्रहण, अभिजात (साप्ताहिक) ७ जुलै १९६९.
४२. नेरूरकर प्र. श्री., 'नारायण सुर्वे, एक टिपण', पूर्वा, मार्च १९८२.
४३. नेरूरकर प्र. श्री., कवी नारायण सुर्वे : एक पुरोगामी साहित्यिक. कालखंड, पूर्वा, ऑगस्ट १९८२.
४४. वैद्य, प्रभाकर 'सुर्वे-मर्ढेकर बातचीत' : केवळ एक निमित्त, पूर्वा, ऑगस्ट १९८२
४५. आवटे चंद्रकांत, 'नारायण सुर्वे यांची कविता', मनोजय, चंद्रपूर मार्च, - १९८२.
४६. Nerurkar P. S. 'Narayan Surve Pacesetter in Modern Marathi Poetry, New Age Weekly 22-9-1968

४७. Parpillewar Shantaram — 'Life & Literature: A unique Marathi poet Narayan Surve, Nagpur Times daily 11-4-1967 and Searchlight, Patna 1967.

४८. Choudhari Smti. Krishna — Poet Narayan Surve, Illustrated Weekly of India. 1973.

परीक्षणे :

'ऐसा गा मी ब्रह्म'

१. कुळकर्णी पद्माकर, वाचनालय, जुलै १९७१.
२. गाडगीळ सुधा, साहित्य सहकार, २७–११–१९६३.
३. चित्रे दि. पु., सत्यकथा, जून १९६४.
४. जोग ल. ग., आलोचना, ऑगस्ट १९६२.
५. नेरूरकर प्र. श्री. दीपावली, मे १९६४

माझे विद्यापीठ :

१. कार्व्हालो रॉक, 'शारदा मंदिराच्या महाद्वारातून मिरवत येणारी कविता, माझे विद्यापीठ', सोविएत देश, डिसेंबर १९६८.
२. कुसुमाग्रज, माझे विद्यापीठ, सत्यकथा, सप्टेंबर १९६८.
३. डहाके वसंत, युगवाणी, जानेवारी १९६८.
४. ढाले राजा, 'हजार कोलमडून कोसळणाऱ्या मालिकेत एक ग्रंथराज की शब्दांच्या नक्षत्रापलिकडची एक दुनिया' माझे विद्यापीठ, टिंब, अंक २७ मार्च १९६८, अंक ३ एप्रिल १९६७.
५. पाटील म. सु., प्रतिष्ठान, जानेवारी १९७४.
६. पोतदार अनुराधा, म. सा. प., जुलै, सप्टेंबर १९६७.
७. प्रभू आरती, 'हे विद्यापीठ आहे तरी कुणाचे,' महाराष्ट्र टाईम्स १६–४–१९६७.
८. चित्रे दि. पु., 'शैलीने पोखरलेली भाविष्कारी कविता माझे विद्यापीठ–आलोचना, मार्च १९६७.
९. राजवाडे राजा, 'सच्च्या अनुभवांचे विश्वरूप दर्शन–माझे विद्यापीठ' रविवार लोकसत्ता ४–५–१९६९.
१०. लोखंडे शशिकांत, शोधन (साप्ताहिक), १८–१०–१९७४.
११. वराडपांडे म. ल., 'रसिकांच्या मनात स्थान असलेला काव्यसंग्रह : माझे विद्यापीठ,' तरुण भारत, ५ जून १९६६,

१२. केसरी (दैनिक) २०–२–१९६७.
१३. 'अनुभवाचा आवेग-माझे विद्यापीठ' रविवार सकाळ, ४-६-१९६७.
१४. विवेक साप्ताहिक, २३ जुलै १९६७.

जाहिरनामा :

१. कांत वा. रा., महाराष्ट्र टाइम्स, ११–७–१९७६.
२. जोग वि. स., 'नव्या युगाचा नव्या दमाचा, सुर्वे नारायणाचा जाहिनामा' तरुण भारत, (नागपूर) ११–७–१९७६.
३. ठाकूर रवींद्र, प्रतिष्ठान, मार्च १९७८.
४. पानसे रमेश, ऋचा, जानेवारी १९७६.
५. भावे निलिमा, 'तिठ्यावर उभे असलेले नारायण सुर्वे' सत्यकथा, जून १९७७.

चर्चा :

१. कदम संभाजी, 'नारायण सुर्व्यांच्या कवितेविषयी काही विचार' सत्यकथा, एप्रिल १९६७.
२. चित्रे दि. पु., 'माझे विद्यापीठ, सहा मुद्यांसंबंधी', आलोचना, सप्टेंबर १९६७.
३. जोग वि. स., सत्यकथा, ऑगस्ट १९७८.
४. पारपिल्लेवार शांताराम, सत्यकथा, ऑगस्ट १९७८.
५. भावे निलिमा, सत्यकथा. १९७८.
६. राजवाडे अशोक, 'नारायण सुर्वे यांची कविता', सत्यकथा, मे १९७४ च्या विलास सारंगांच्या लेखाच्या संदर्भात सत्यकथा, ऑगस्ट १९७४.
७. सोमण सुभाष, 'माझे विद्यापीठच्या परीक्षणाच्या संदर्भात सहा मुद्दे' आलोचना, जुलै १९६७.

प्रबंध लेखन :

१. चौधरी मधुकर, 'कवी श्री. नारायण सुर्वे यांच्या काव्याचा चिकित्सक अभ्यास', विक्रम विश्वविद्यालय (मध्यप्रदेश), नोव्हेंबर १९८१.
२. शिंदे फ. मु., 'नारायण सुर्व्यांची कविता : आशय आणि अभिव्यक्ती' मराठवाडा विद्यापीठ.

इतर भाषेत अनुवादित कवितासंग्रह :

१. "On the pavements of Life", (इंग्रजी) अनुवादक : श्रीमती कृष्णा चौधरी, प्र. श्री. नेरुरकर, लोकवाङ्मयगृह प्रकाशन (१९७३).
२. 'नारायण सुर्वेंनी कविता' (गुजराथी), अनुवादक, वसंत जोशी,

2e04
23622
ग्रंथ विक्रय १५/३/९३
शाखा स्थल

गंगोत्री ट्रस्ट प्रकाशन, अहमदाबाद (१९७८).

३. 'मेरा विद्यापीठ', (हिन्दी) अनुवादक, मनोज सोनकर, शुभदा प्रकाशन, नवी दिल्ली (आगामी).

स्वतः नारायण सुर्वे :

१. 'मराठी वाङ्मयाला बंडखोरीची परंपराच नाही', मुलाखत, डॉ. एस. एस. भोसले, दैनिक समाज (कोल्हापूर), १ जुलै १९७३.

२. 'नेहरू गेले त्यावेळची गोष्ट', एका कवितेचे विवेचन, 'कविता फुलते अशी' या पुस्तकात संग्रहित.

३. 'जाहिरनामा', निवेदन, 'कविता आणि मी', प्रतिष्ठान, डिसेंबर १९६६ मधील मुलाखत पूरकासह.

४. 'शासन व साहित्यकार, संघर्षाऐवजी सांगड हवी,' साप्ताहिक 'तापी जल,' जळगाव १२-३-१९८१.

५. 'शासन व साहित्यिक,' राजस, परिसंवाद दिवाळी अंक १९७७.

६. 'आपणच आपला दिवा घेऊन चालले पाहिजे,' मुलाखत सुधा कुळकर्णी, पुस्तक पंढरी, दिवाळी १९८१.

७. 'दुःख देखणे करण्यापेक्षा त्याच्याशी बोलत रहावे, पाकळीसारखे एकेक दुःख गळून पडते,' स्त्री दिवाळी अंक, नोव्हेंबर १९७९.

८. 'माझ्या कवितेला कष्टाच्या घामाचा वास आहे!' मुलाखत : अनिल बळेल, साप्ताहिक मनोहर, २५ नोव्हेंबर १९७९.

९. 'चौकशा,' राजा राजवाडे यांनी घेतलेली मुलाखत, ललित, मार्च १९७२.

१०. 'साहित्याचे माझ्या जीवनांतील स्थान'- वार्शी येथील ५४ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनातील प्रकाशित केलेल्या स्मरणपत्रिकेमधील लेख.

११. 'नारायण सुर्व्यांशी एक बातचीत' दै. अजिंठा मुलाखत, रवींद्र चिंचाळकर, ३ जानेवारी १९८१.

१२. 'नारायण सुर्वे लिहितात,' महाराष्ट्र टाइम्स, १९८०.

१३. 'माझे लेखन कशासाठी,' मुंबई नभोवाणी, मार्च १९८२, प्रकाशित घरकुल, पुणे, मे १९८२.

१४. 'आपलेच लेखक त्यांच्याच शब्दांत,' नारायण सुर्वे, संयोजक, रमेश कुबल, मधुरा, दिवाळी अंक १९७८.

१५. 'कष्टकरी वर्गाची संस्कृती,' कलामाध्यमे, मुलाखतकार, छाया दातार, अशोक राजवाडे, मागोवा, मे १९७५.

१६. 'प्रस्तुत आणि अप्रस्तुत,' अबकडई वार्षिक, १९७३.

१७. 'साहित्यातून काव्य नाहीसे होत आहे.' परिसंवाद : नासिक, १९७७.

REFBK-0023788